# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार ३० जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४


# नराधम भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा

**पुणे / प्रतिनिधी-**नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (६५) याला विशेष न्यायालयाने गुरुवारी (दि. २५) दोषी ठरविले आहे. आरोपीने केलेले कृत्य अत्यंत घृणास्पद, क्रूर आणि समाजमन हादरविणारे असून, हा गुन्हा दुर्मिळातील दुर्मीळ स्वरूपाचा असल्याचे नमूद करत सरकारी पक्षाने आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा आल्याचे सांगण्यात आले होते आहे.

न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून खटल्याचा निकाल राखून ठेवला होता. येत्या सोमवारी (दि. २९) आरोपीला जन्मठेप की फाशी? यावर शिक्कामोर्तब होणार होता. अखेर राज्याच्या इतिहासामध्ये अवघ्या ५८ दिवसांत खटल्याची सुनावणी पूर्ण होउन निकालावर शिक्कामोर्तब झाला. आज अंतिम निकाल वाचून दाखवताना न्यायाधीशांनी काही महत्वपूर्ण मुद्दे मांडले. या प्रकरणात आरोपीविरोधात सबळ पुरावे आहेत.



सगळे बिंदू जोडण्यात तपास यंत्रणांना यश आले आहे. वयाव्यतिरिक्त त्याला माफी देण्याचे काही कारण नाही. त्याचा पूर्वइतिहास गंभीर आहे. स्वतःची वासना शमवण्यासाठी आरोपीने हे कृत्य केले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने आरोपीला भीतीही नव्हती. त्यामुळे अशा प्रकरणात फाशीच्या शिक्षेची तरतुदी असल्याचे सांगत नराधम भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

साडेतीन वर्षाच्या चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार आणि खून केल्याप्रकरणाचा खटल्याचा निकाल आज जाहीर झाला. न्यायालयाच्या परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिसांची फौज तैनात करण्यात आली होती. राज्यभर चर्चेत असलेल्या या प्रकरणामुळे न्यायालय परिसराला अक्षरशः छावणीचे स्वरूप आले होते.

## नसरापूर प्रकरण : निकाल ऐकताच पीडितेच्या कुटुंबियांना अश्रू अनावर

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या खटल्यात आज (सोमवार, २९ जून) ऐतिहासिक निकाल लागला आहे. पुणे जिल्हा सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी ६५ वर्षीय नराधम आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाचा हा ऐतिहासिक निकाल ऐकताच न्यायालयात उपस्थित असलेल्या पीडितेच्या कुटुंबियांना अश्रू अनावर झाले. हा खटला राज्यातील सर्वात जलदगतीने निकालात निघालेला पहिलाच खटला ठरला असून, गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आरोपीला फाशी सुनावण्यात आली आहे.विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी निकाल वाचन करताना अत्यंत कडक शब्दांत आरोपीच्या कृत्याचा निषेध केला. हा खटला दुर्मिळातील दुर्मिळ या श्रेणीत मोडतो. आरोपीने दाखवलेली क्रूरता आणि चिमुरडीला दिलेला त्रास अमानुष होता. मुलीच्या अंगावर तब्बल १८ जखमा होत्या.
















जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्मार्ट मीटर सक्ती थांबवा! नांदगावात माकप आक्रमक

# प्रतिकात्मक पोस्टर जाळून केला तीव्र निषेध



### शिवसेनेची महावितरण कार्यालयावर धडक

नांदगाव खंडेश्वर : शहरासह तालुक्यातील घरगुती ग्राहकांना स्मार्ट मीटर लादण्याच्या सक्तीचा तीव्र निषेध करत विज वितरण कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयावर धडक देऊन स्मार्ट मीटर लावण्यास जबरदस्ती केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी निवेदनाद्वारे वीज वितरण कंपनीला दिला.

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रासह नांदगाव खंडेश्वर तालुक्यात महावितरणकडून दि. १३ जून २०२६ रोजी वीज ग्राहकांना मोबाईलवर SMS किंवा व्हॉट्सअॅप द्वारे संदेश पाठवून हे सांगण्यात येत आहे की जुने मीटर बदलून 'स्मार्ट मीटर बसविण्यात येईल'. सदर प्रक्रिया पूर्णतः एकतर्फी, नियमबाह्य व दिशाभूल करणारी, लोकशाही आणि वीज ग्राहक हक्कांचे उल्लंघन करणारी आहे. याला फक्त मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाचाच विरोध नसून, स्मार्ट प्रीपेड मीटरला संपूर्ण विदर्भ , महाराष्ट्र राज्यात इतकेच नव्हे तर देशात विरोध आहे. हे प्रकार वेळीच थांबवावे. या विरोधात मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाच्या वतीने सोमवार दि. २९ जून २०२६ रोजी महावितरण कार्यालय समोर , नांदगाव खंडेश्वर येथे प्रतिकात्मक पोस्टर जाळून केला तीव्र निषेध

मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्षाची अशी गंभीर चिंता आहे की, भविष्यात स्मार्ट मीटर प्रणालीचे प्रीपेड स्वरूपात रूपांतर झाल्यास सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. अशा व्यवस्थेमध्ये वीज वापरापूर्वी रिचार्ज करणे आवश्यक ठरल्यास अनेक गरीब व निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांना अडचणी निर्माण होऊ शकतात. रिचार्जसाठी तत्काळ पैसे उपलब्ध नसल्यास वीज सेवेत व्यत्यय येण्याची शक्यता निर्माण होऊ शकते, असा आरोप करण्यात आला. यावेळी कॉ. श्याम शिंदे तालुका सचिव यांनी व्यक्त केला माकप, कॉ. मोहसिन शेख शहर सचिव, अशोक केसरखाने, कांतेश्वर पुंड, दिलीप महल्ले, रामदास मते, मारुती बंड, राजेंद्र राऊत, दीपक अंबाडरे, शहनशाह, लक्ष्मण झिमटे, शत्रुघ्न मगर, प्रतीक सुने, बाबा बाई, पुरुषोत्तम आंधळे, देविदास खडसे, प्रवीण गावनर, यांचे सह आदी नागरिक उपस्थित होते.

स्मार्ट मीटरची सक्ती केल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा देत उपकार्यकारी अभियंता श्याम येनगंठिवार यांना घेराव करून शिवसेनेने निवेदन सादर केले. यावेळी न.पं. चे गटनेते प्रकाश मारोटकर,बाळासाहेब राणे, विष्णू तिरमारे ,कृ.उ.बा.स. उपसभापती विलास पाटील ,सावदे संचालक प्रमोद ठाकरे ,डॉ. अरुण बेलसरे ,मधुकर कोठाडे ,दिलीप देवतळे ,निलेश इखार ,रवी ठाकूर, गोपाल बनकर, प्रकाश ब्राह्मणवाडे , नितीन दुधे ,सुनील गुरमुळे ,गुणवंत चांदुरकर, महिलाआघाडी छाया भारती ,रमाकांत मुरादे ,लोकेश उडबगले ,अक्षय राणे ,अक्षय काकडे ,लीलाधर चौधरी ,भागवत लाहे ,मनोज ढोके ,चेतन धवणे ,रवी दांडगे ,दिलीप ब्राम्हणवाडे ,हरिदास लिचडे ,शेख महेताब, बाळा सुने ,सुनिल थोरवे ,सतीश मोरे ,अक्षय तुपटकर, आकाश लोमटे ,पंकज ठाकरे ,नयन कापडे ,आवेज ,भावेश भांबूरकर, दिनेश रघुते ,विजय पेटले ,सुरज सोळंके ,सूरज लोमटे ,अरुण कापडे, विजय सुने ,अनिल मारोटकर, अक्षय हिवराळे ,भूमेश्वर गोरे प्रेम हिवराळे यांच्यासह अन्य शेतकरी उपस्थित होते.

# आ.प्रताप अडसड भाजपचे नवे जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष नितीन गुडदे

## नितीन धांडे व रविराज देशमुख यांना हटविले

**अमरावती/प्रतिनिधीः-** विधान परिषद निवडणुकीमध्ये भाजपाचे प्रवीण पोटे एकतर्फी विजयी झाले आहे. त्यांच्या विजयी होताच शहरातील भाजपाच्या संघटनात्मक पातळीवर मोठा बदल करण्यात आला आहे. विद्यमान शहराध्यक्ष नितीन धांडे यांना पदावरून हटविण्यात आले असून त्यांच्या जागी नितीन गुडदे पाटील यांची शहराध्यक्ष पदी तर जिल्हा अध्यक्ष रविराज देशमुख यांना हटवून आमदार प्रताप अडसड यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी केले आहे. यामुळे शहर आणि जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर





भाजपा कार्यकारणी मध्ये मोठे परिवर्तन करण्यात आले आहे. प्रवीण पोटे यांच्या सक्रिय राजकीय आगमनानंतर शहरातील राजकारणात मोठे बदल झाले आहे. नव्या नियुक्ती मुळे संघटन बळकटीसह आगामी स्थानिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची रणनीती अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# अचलपूर काँग्रेसची धुरा कायम

## तनपुरे ग्रामीण तर झोडपे शहराध्यक्षपदी पुन्हा विराजमान

**अचलपूर/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या 'सुजन संघटन' अभियानांतर्गत अचलपूर तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नामदेवराव तनपुरे तर अचलपूर शहर काँग्रेस अध्यक्षपदी श्रीकांत झोडपे यांची सलग दुसऱ्यांदा फेरनियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी दि. २७ जून रोजी ही घोषणा केली. प्रदेश निरीक्षकांनी जिल्ह्यातील वरिष्ठ नेते व कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा करून पाठवलेल्या शिफारशींच्या आधारे तनपुरे व झोडपे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या मागील कार्यकाळात तालुका व शहर पातळीवर बूथ स्तरापर्यंत संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेल्या कामगिरीची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली आहे.



संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क आणि निवडणुकांमधील प्रभावी कामगिरी यामुळे पक्षाने पुन्हा एकदा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही फेरनियुक्ती काँग्रेससाठी बळकटी देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, फेरनियुक्तीची घोषणा होताच युवक काँग्रेस, महिला काँग्रेससह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या निवडीबद्दल , सचिदानंद बेलसरे, अमोल चिमोटे, श्रीधरराव काळे,प्रशांत गोरले,राहुल गाठे, दिनेश वानखडे, विशाल खानझोडे, गजानन टापरे, प्रवीण हूड, जय घोरे, एहतेशाम भाई नबील, गुड्डू भाई, साईद भाई मौलाना आदींसह अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी तनपुरे व झोडपे यांचे अभिनंदन करून स्वागत केले.

# आयआयटी मद्रासकडून जिल्ह्यात 'डीडीएचआय' अंतर्गत रस्ता सुरक्षा प्रशिक्षण



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील रस्ता सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आयआयटी मद्रासच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर रोड सेफ्टी' (CoERS) तर्फे जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विशेष रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'डीडीएचआय' उपक्रमांतर्गत हे एकदिवसीय प्रशिक्षण आज नियोजन भवन येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणासाठी आयआयटी मद्रासचे प्रमुख प्रकल्प अधिकारी डॉ. रोशन जोस आणि प्रकल्प अभियंता प्रदीप कुमार एनव्हीके यांनी प्रशिक्षण दिले.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता आर. वाय. पाटील कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी यासह पोलीस, परिवहन, रस्ते विकास यंत्रणा, आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या सत्रामध्ये वर्गखोली प्रशिक्षणाद्वारे डीडीएचआय आणि एफपीएस ॲप्लिकेशन्स, रस्त्यावरील धोके ओळखणे, अहवाल यंत्रणा आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्या यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी ट्रॉमा केअर आणि आपत्कालीन वैद्यकीय प्रतिसादावर विशेष चर्चा करण्यात आली. अमरावतीमधील रस्त्यांचे जाळे अधिक सुरक्षित करण्यासाठी हे प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार जाहीर

## -'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'कडून ऑगस्टमध्ये गौरव



**अमरावती/प्रतिनिधीः-** महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील गेल्या ३७ वर्षांच्या योगदानाची दखल घेत 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेच्या वतीने त्यांना 'एमिनेंट इंजिनियर' हा देशपातळीवरील मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.अमरावती येथे येत्या २१ व २२ ऑगस्टला आयोजित 'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनामध्ये संचालक राजेंद्र पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या दोन दिवसीय अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. देशाच्या तांत्रिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत. राजेंद्र पवार यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी घेतल्यानंतर महावितरणमध्ये कनिष्ठ अभियंता ते मुख्य अभियंता पदापर्यंत काम केले आहे. या ३६ वर्षांच्या कालावधीत प्रामुख्याने ग्रामीण भागातील दऱ्याखोऱ्यांसह घरगुती, शेती, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात नवीन वीजयंत्रणा उभारणे, नवीन वीजजोडण्या आणि सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उल्लेखनीय कामे केली आहेत. एप्रिल २०२५ पासून पवार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) म्हणून कार्यरत आहे. विद्युत क्षेत्रात राजेंद्र पवार यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना आयईआय संस्थेकडून हा मानाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# साडेचार वर्षांच्या बालीके वर सुपर स्पेशालिटीत यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट

**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय संदर्भ सेवा (सुपर स्पेशालिटी ) रुग्णालयामध्ये साडेचार वर्षांच्या बालिकेवर अत्यंत महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. ही शस्त्रक्रिया सार्वजनिक आरोग्य विभागातील पाचवी यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट सर्जरी ठरली असून, बालिकेला नव्या ऐकू येण्याच्या जगाची दारे खुली झाली आहेत. सदर रुग्ण ही साडेचार वर्षांवरील असल्याने कुठल्याही योजने मध्ये बसत नसल्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी संपूर्ण निधी ची उपलब्धता अमरावती जिल्हा नियोजन समिती मार्फत केलेली आहे व शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी मध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पुढील एक वर्ष स्पीच थेरपी विनामूल्य करण्यात येणार आहे. या योजनेतून रुग्णाला दोन्ही योजनांच्या माध्यमातून शस्त्रक्रिया व स्पीच थेरपी याचा लाभ विनामूल्य मिळणार आहे.

# संपादक सुदेश चव्हाण यांना पितृशोक



**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील सांध्य दैनिक 'वऱ्हाडी समाचार'चे संपादक सुदेश चव्हाण यांचे वडील बबन नारायण चव्हाण यांचे आज, २९ जून २०२६ रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांची अंत्ययात्रा उद्या, मंगळवार दिनांक ३० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या नरसिंह सरस्वती नगर, जीवन विकास स्कूलच्या मागे, गोपाल नगर, अमरावती येथील निवासस्थानाहून निघणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

# ग्रामीण पोलीस दलात ११ महिन्यांच्या प्रशिक्षणाची संधी

## आज मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी रोजगार मेळावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींना आपले कौशल्य वाढवण्याची आणि शासकीय विभागात कामाचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि पोलीस अधीक्षक (ग्रामीण) कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जून २०२६ रोजी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी रोजगार मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून अमरावती ग्रामीण पोलीस विभागाच्या आस्थापनेअंतर्गत ११ महिन्यांच्या कार्य प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे.

हा मेळावा डेपो रोडवरील शासकीय तांत्रिक विद्यालय परिसरातील जिल्हा कौशल्य विकास केंद्रात आयोजित केला आहे. यासाठी वय किमान १८ ते ३५ वर्षे आणि शैक्षणिक पात्रता १२ वी पास, आयटीआय, पदविका, पदवीधर किंवा पदव्युत्तर उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सध्या शिक्षण सुरू असलेले उमेदवार यासाठी पात्र नसतील. इच्छुक उमेदवारांनी 'cmykpy' संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी तसेच बँक खाते आधार संलग्न असणे अनिवार्य आहे. पात्र उमेदवारांनी ३० जून रोजी स्वतःच्या खर्चाने बायोडाटा, फोटो व मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी ०७२१-२५६६०६६ या क्रमांकावर संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### कर्जमुक्ती योजनेसाठी ३ लाख

खात्यांच्या ५१३ कोटी रूपयांची रक्कम आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या २९ हजार ९८० खात्यांना ४८८ कोटी रुपये कर्जमाफीची रक्कम कळविण्यात आली आहे. तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे २९ हजार १० शेतकऱ्यांचे २९८ कोटी, बँक ऑफ बडोदाचे ३ हजार १०२ शेतकऱ्यांचे ४७ कोटी, बँक ऑफ इंडियाचे ७ हजार १८३ शेतकऱ्यांचे ८० कोटी, युनियन बँक ऑफ इंडियाचे ६ हजार १७० शेतकऱ्यांचे ७६ कोटी, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे २ हजार ८३ शेतकऱ्यांचे २९ कोटी, युको बँकेचे ५१८ शेतकऱ्यांचे ५ कोटी, पंजाब नॅशनल बँकेचे २ हजार १८२ शेतकऱ्यांचे ८ कोटी, कॅनरा बँकेचे १ हजार ९०२ शेतकऱ्यांचे ९ कोटी, इंडियन बँकेचे ७ हजार २४७ शेतकऱ्यांचे ८२ कोटी रूपयांच्या कर्जमाफीची रक्कम कळविण्यात आली आहे.

वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांना ५० हजार रूपयांचा लाभ देण्यात येणार आहे. प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्येही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सर्वाधिक ४८ हजार ८६९ शेतकरी पात्र ठरले आहेत. त्यांना २४४ कोटी रूपयांचे प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे १० हजार ३९० शेतकऱ्यांना ५१ कोटी, बँक ऑफ बडोदाचे २ हजार ६९१ शेतकऱ्यांना ४३ कोटी, बँक ऑफ इंडियाचे १ हजार ७३३ शेतकऱ्यांना १४ कोटी, युनियन बँक ऑफ इंडियाचे २ हजार ७५० शेतकऱ्यांना १३ कोटी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे ११ हजार ६७७ शेतकऱ्यांना ५८ कोटी, बँक ऑफ महाराष्ट्रचे ९ हजार ४८२ शेतकऱ्यांना ४७ कोटी, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे १ हजार ४८८ शेतकऱ्यांना ७ कोटी, युको बँकेचे ४११ शेतकऱ्यांना ४ कोटी, पंजाब नॅशनल बँकेचे २ हजार २६ शेतकऱ्यांना २५ कोटी, कॅनरा बँकेचे १९२ शेतकऱ्यांना २ कोटी, इंडियन बँकेचे १ हजार ४३० शेतकऱ्यांना ११ कोटी रूपयांचे प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने केली जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. सर्व बँकांना हा गोळा केलेला डेटा पोर्टलवर तातडीने अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे ही रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू करता येणार आहे.

### पानोरा फाट्यावर दुचाकीची ट्रॅक्टरला

दिली. धडक इतकी भीषण होती की दोघेही रस्त्यावर फेकले गेले. यात संतोष यांच्या डोक्याला गंभीर मार लागला असून अमोल यांच्या हात पाय फ्रॅक्चर झाले आहे.

पनोरा फाटा येथे झालेल्या अपघाताची माहिती गोपाल पाटील अरबट मित्र परिवाराला यांना मिळताच जखमीच्या मदतीला सचिन शेलार, हेमंत उमाळे, सागर गेठे, राहुल भुंबर, शिवा उंबरकर, आशिष उमाळे, यांनी तातडीने धाव घेत रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या दोन्ही युवकांना रुग्णवाहिकेतून दर्यापूर येथिल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. संतोष काकडे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावतीला हलविण्यात आले . दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. गोपाल अरबट मित्र परिवाराच्या या तातडीच्या मदतीमुळे जखमींना वेळेत उपचार मिळाल्याने नागरिकांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### पेपर फुटी थांबवा...विद्यार्थ्यांच्या

नितीन काळे, मयूर देशमुख, पियुष मालवीय, सागर गोडबोले, गौरव चौधरी यांच्यासह शेकडो युवक काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि पेपरफुटीच्या साखळीला कायमचा आळा घालण्यासाठी युवक काँग्रेसचा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील,असे सांगण्यात आले.

### एचएसआरपी नंबर प्लेटसाठी

नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. ही मुदत वाढवून ३० जून २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. विहित मुदतीनंतर नियमानुसार वायुवेग पथकाद्वारे दि. १ जुलै २०२६ पासून दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने किंवा बनावट एचएसआरपी असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तसेच अशा वाहनांचे परिवहन कार्यालयातील कामकाज थांबविण्यात येणार आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नंदकिशोर काळे यांनी कळविले आहे.

### ८८.११ लाख रुपयाच्या

करणाऱ्या शासनच्या मान्यता प्राप्त लेखा परीक्षक रोहनकर यांच्यावरही आरोप लावण्यात आला होता की, अनियमिततेची माहिती असल्यावरही त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ८१ अन्वये योग्य लेखापरीक्षण नाही केले. या प्रकरणात रोहनकर यांनी अटकपूर्व जामीनसाठी याचिका दाखल केली होती. यावर सुनावणी करताना एडवोकेट अनिल विश्वकर्मा यांनी त्यांचा पक्ष मांडताना स्पष्ट केले की, त्यांनी अहवाल स्पष्ट करताना व्हिडिओ करून मित्रांमध्ये अनियमितता, विवरण, अधिकारांचा दुरुपयोग, ऋण कर्जामध्ये कृती याचा उल्लेख केला होता. ऑडिट रिपोर्ट नंतर संबंधित पदाधिकाऱ्यांना तीन महिन्याच्या आत स्पष्टीकरण मागणे आवश्यक आणि कायदेशीर कार्यवाहीची शिफारशीही केली होती. अशात त्यांनी घोटाळा कसा लपवला हा प्रश्न विचारण्यात आला. सरकारी पक्षाच्या वतीने अटकपूर्व जामीनाचा विरोध करण्यात आला होता. तरीपण न्यायालयाने दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर ऑडिटर दिलीप रोहनकर यांना अटक पूर्ण जामीन मंजूर केली आहे. एड. अनिल विश्वकर्मा यांना एड. मनोज नरवाडे एड. नम्रता साहू,एड ऋतुराज मोरे ,एड आर्यन विश्वकर्मा,एड प्रतीक सगणे,एड.समृद्धी जाधव यांनी सहकार्य केले.

### पतीसोबत नंनदेकडे आलेली

वाजता मेमो ट्रेन ने ते मुर्तीजापुर कडे जाणार होते. पण सकाळी साडेआठ वाजता त्यांची पत्नी डिंपल रूगंटा अचानक ननंदेच्या घरातून बेपत्ता झाली.पती आणि कुटुंबातील इतर सदस्यांनी तिचा शोध सुरू केला पण तिचा काहीही ठिकाणा लागला नाही. यामुळे घाबरलेल्या कुटुंबीयांनी सायंकाळी राजापेठ पोलीस ठाण्यात तिच्या बेपत्ता होण्याची तक्रार दिली. माहितीनुसार, डिंपल ऑटो रिक्षामध्ये बसून पंचवटी चौकापर्यंत गेली होती. सीसीटीव्ही फुटेज मध्ये ती पंचवटी चौकात जाताना दिसत आहे. पोलीस तिचा युद्ध स्तरावर शोध घेत आहे. ही महिला कुठेही दिसल्यास पती राहुल रुंगटा (८८३०९०१५०७) व रोहित रूंगटा (९४२३०१७२०३) यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### चाकू घेऊन दहशत निर्माण

गोपनीय सूचना मिळाली होती की कपिल वस्तू नगर येथे राहणारा प्रफुल उर्फ दादू वानखडे त्याच्या हातामध्ये दोन लोखंडी चाकू घेऊन लक्ष्मी नगर मार्गावर दहशत पसरवित आहे. यावरून पथकाने तेथे कार्यवाही करून आरोपीला ताब्यात घेतले.गाडगे नगर पोलीस ठाण्यात त्याच्या विरुद्ध ४/२५ आर्म एक्ट, सहकलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मेळघाटातील २० गावे संपर्काच्या

योजनाचे पोर्टल वरील अहवाल, औषध साठ्याची माहिती, लसीकरण ऑनलाईन नोंद तसेच इतर शासकीय कार्यालयातील कामकाजही प्रभावित झाले आहे. मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे आपातकालीन परिस्थितीमध्ये रुग्णवाहिका, डॉक्टर किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करणे कठीण झाले आहे. आदिवासी भागातील नागरिकांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरत असून अनेकांना आवश्यक माहिती व शासकीय सेवा वेळेवर मिळत नाही. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही बीएसएनएल विभागाकडून अद्यापही कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आली नसल्याचे आरोप करण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागात नागरिकांना मोठी अडचणी येत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३० जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## AGRASEN NAGARI SAHAKARI BANK LTD AKOLA

(F.Y. 2025-2026)

01, GHARAK SEVA,, M.G ROAD, BEHIND BHIRAD COMPLEX, AKOLA-444001

**Balance Sheet as at 31st March 2026** ₹ in rupees

| Particulars | Note No. | As at 31st March 2026 | As at 31st March 2025 |
|---|---|---|---|
| **EQUITY AND LIABILITIES** | | | |
| **Shareholder's Funds** | | | |
| Share Capital | 1 | 1,99,38,875.00 | 1,78,42,500.00 |
| Reserves and surplus | 2 | 8,91,57,347.23 | 8,30,06,888.97 |
| | | **10,90,96,222.23** | **10,08,49,388.97** |
| **Non-current liabilities** | | | |
| Long-term borrowings | 3 | 78,79,58,326.58 | 66,15,44,957.05 |
| Deferred tax liabilities (Net) | | - | - |
| Other long term liabilities | | - | - |
| Long-term provisions | | - | - |
| | | **78,79,58,326.58** | **66,15,44,957.05** |
| **Current liabilities** | | | |
| Short-term borrowings | | - | - |
| Trade payables | 4 | | |
| (A) Micro,small and medium enterprises | | - | - |
| (B) Others | | 6,330.00 | 9,59,262.00 |
| Other current liabilities | 5 | 59,65,660,.81 | 57,64,463.63 |
| Short-term provisions | | - | - |
| | | **59,71,990.81** | **67,23,725.63** |
| **TOTAL** | | **90,30,26,539.62** | **76,91,18,071.65** |
| **ASSETS** | | | |
| **Non-current assets** | | | |
| Property,Plant and Equipment and Intangible assets | 6 | | |
| Property,Plant and Equipment | | 6,25,32,129.12 | 6,38,96,951.47 |
| Intangible assets | | - | - |
| Capital work-in-Progress | | - | - |
| Intangible assets under development | | - | - |
| | | | |
| Non-current investments | 7 | 23,01,31,088.00 | 16,47,90,616.00 |
| Deferred tax assets (net) | | - | - |
| Long-term loans and advances | 8 | 50,02,22,464.45 | 42,22,87,266.09 |
| Other non-current assets | 9 | 4,13,20,772.00 | 6,06,31,813.00 |
| | | **83,42,06,453.57** | **71,24,79,358.52** |
| **Current assets** | | | |
| Current investments | | - | - |
| Inventories | | - | - |
| Trade receivables | | - | - |
| Cash and Bank Balances | 10 | 5,55,03,595.81 | 4,60,26,102.30 |
| Short-term loans and advances | | - | - |
| Other current assets | 11 | 1,33,16,490.24 | 1,14,85,322.79 |
| | | **6,88,20,086.05** | **5,75,11,425.09** |
| **TOTAL** | | **90,30,26,539.62** | **76,91,18,071.65** |

**ASHISH R. GOENKA**
**CEO**

**CA PANKAJ SHAH**
**DIRECTOR**

AS PER REPORT OF EVEN DATE
P C BHANDARI AND CO.
CHARTERED ACCOUNTANTS
FRN :- 114079W

**VIJAY K. AGRAWAL**
**VICE CHAIRMAN**

**VASANT BACHHUKA**
**CHAIRMAN**

CA PRAKASHCHANDRA
C. BHANDARI
PARTNER
MEMBERSHIP NO. 039710

PLACE :- AKOLA
DATE :- 29/06/2026
UDIN :- 26039710VZKGCH3473

**AGRASEN NAGARI SAHAKARI BANK LTD AKOLA**
**01, GHARAK SEVA,, M.G ROAD, BEHIND BHIRAD COMPLEX,**
**AKOLA-444001**

(F.Y. 2025-2026)

**Statement of Profit and loss for the year ended 31st March 2026** ₹ in rupees

| Particulars | Note No. | 31st March 2026 | 31st March 2025 |
|---|---|---|---|
| **Revenue** | | | |
| Revenue from operations | 12 | 7,30,06,969.92 | 6,19,95,424.35 |
| Other income | 13 | 35,65,860.56 | 35,91,669.87 |
| **Total Income** | | **7,65,72,830.48** | **6,55,87,094.22** |
| **Expenses** | | | |
| Cost of material Consumed | | - | - |
| Purchase of stock-in-trade | | - | - |
| Changes in inventories | | - | - |
| Employee benefit expenses | 14 | 64,62,164.00 | 59,24,563.00 |
| Finance costs | 15 | 5,11,79,863.71 | 4,27,08,767.28 |
| Depreciation and amortization expenses | | 16,62,084.36 | 22,02,403.00 |
| Other expenses | 16 | 1,15,13,079.43 | 79,86,158.39 |
| **Total expenses** | | **7,08,17,191.50** | **5,88,21,891.67** |
| **Profit before exceptional, extraordinary items and tax** | | **57,55,638.98** | **67,65,202.55** |
| Exceptional items | | - | - |
| **Profit before extraordinary items and tax** | | **57,55,638.98** | **67,65,202.55** |
| Extraordinary items | | - | - |
| Prior period item | | - | - |
| **Profit before tax** | | **57,55,638.98** | **67,65,202.55** |
| **Tax expenses** | | | - |
| Current tax | | - | - |
| Deferred tax | | - | - |
| Excess/short provision relating earlier year tax | | - | - |
| **Profit(Loss) for the period** | | **57,55,638.98** | **67,65,202.55** |

**ASHISH R. GOENKA**
**CEO**

**CA PANKAJ SHAH**
**DIRECTOR**

AS PER REPORT OF EVEN DATE
P C BHANDARI AND CO.
CHARTERED ACCOUNTANTS
FRN :- 114079W

**VIJAY K. AGRAWAL**
**VICE CHAIRMAN**

**VASANT BACHHUKA**
**CHAIRMAN**

CA PRAKASHCHANDRA
C. BHANDARI
PARTNER
MEMBERSHIP NO. 039710

PLACE :- AKOLA
DATE :- 29/06/2026
UDIN :- 26039710VZKGCH3473

**THE AGRASEN NAGARI SAHAKARI BANK LTD, AKOLA**
**SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES AND NOTES ON ACCOUNTS**
**FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026**

PART-I

**Overview :**

The Agrasen Nagari Sahakari bank Ltd, Akola was established on 14th January, 1997. The bank is a Non- scheduled Co-operative bank having 5 branches including H.O as on 31st March, 2026.

**SIGNIFICANT ACCOUNTING POLICIES :**

**1. Basis of Accounting**

1.1 The financial statements are prepared and presented on historical cost convention and accrual basis of accounting unless otherwise stated and confirm with statutory provision under the banking Regulations Act 1949, The Maharashtra Co-operative societies Act 1960, circulars and guidelines issued by the Reserve Bank of India (RBI) from time to time and current practices prevailing within the banking industries in India.

1.2 The preparation of financial statements requires the management to make estimates and assumptions considered in reported amounts of assets and liabilities including contingent liabilities as of the date of financial statements and the reported income and expenses for the reporting period. Management believes that the estimates used in the preparation of the financial statements are prudent and reasonable. Future results could differ from these estimates.

**2. FIXED ASSETS (AS-10)**

2.1 Freehold land is stated at cost except Head office Building and Main Branch Building, which are revalued during the year and the corresponding revaluation reserve is created in the books of accounts. As other fixed assets other than Freehold land and revalued assets are stated at written down value. Cost includes installation, erection and related expense incurred on acquisition of assets.

2.2 Depreciation on computer and building are charged on Straight Line method whereas depreciation is charged on rest of the assets are charged at the different rates by using WDV method considered by management for different assets as under except computer and allied goods on which depreciation is charged as per RBI guidelines, the normal depreciation is charged to profit and loss account.

| Sr. | Assets | Rate of depreciation | |
|---|---|---|---|
| A | Building | 2.5% | SLM |
| B. | Furniture & Fixture | 10% | WDV |
| C | Computer & Mobile | 33.33% | SLM |
| D | Plant & Machinery | 15% | WDV |
| E | Dead Stock | 10% | WDV |
| F | Solar | 40% | WDV |
| G | Software | 40% | WDV |
| H | ATM at Bank Premises | 15% | WDV |
| I | Electric Equipment | 15% | WDV |

2.3 Assets acquired before 30th September 2025 are charged with depreciation for the entire year, otherwise assets are charged with 50% of normal depreciation. No depreciation is charged on fixed assets sold/disposed of during the year.

**3. INVESTMENTS:**

a) The entire investment portfolio of the bank is classified in accordance with Reserve Bank of India guidelines, into:

**i. Held to Maturity (HTM) :** Comprising investment acquired with the intention to hold them till maturity and it includes Central & State government securities.

**ii. Held for Trading (HFT) :** Comprising investments acquired with the intention to trade.

**iii. Available for Sale (AFS):** Comprising investment not covered by above two categories, i.e. those which are acquired neither for trading purpose nor being held till maturity.

Bank decides the category of each investment at time of acquisition and classifies them same accordingly. Valuation of Investment

**i. Held to Maturity (HTM) :** These are carried at acquisition cost unless it is more than Face value, in which case the premium is amortized over the remaining period of maturity on a straight-line method.

**ii. Held for Trading (HFT) :** These investments are marked to market scrip-wise and the resultant depreciation is recognized in such category in the profit and loss account while the appreciation, if any, is ignored.

**iii. Available for sale (AFS) :** These investments are marked to market scrip-wise and the resultant depreciation is recognized in such category in the profit and loss account while the appreciation, if any, is ignored.

**iv.** Cost of Acquisition of investment excludes commission, brokerage, and stamp duty if any, for the purpose of valuation of central government, the market rate/ quotes declared by " Fixed Income Money Market and Derivatives Association of India" (FIMMDA) are considered, while State Government Securities and other approved securities are valued as per methodology suggested by FIMMDA, which is valued applying the YTM method by making it up 25 basis above the yields of Central Government Securities of equivalent maturity put out by FDA/FIMMDA periodically. Valuation of shares of Co-operative is done at book value if dividend is received regularly. In case, if any Co-operative has either gone into liquidation or has not declared dividend at all, the shares are valued at cost and full provision is made for investment in shares of such cooperative society.

**V.** Profit / loss if any on sale of investment is recognized in the profit and loss Account.

**4. Loans & Advances :**

Advances are classified as Standard, Sub Standard, Doubtful or Loss Accounts and Provisions for losses are made on these categories as per the prudential norms of RBI. Provisions made for non-performing advances has been shown as "Bad and Doubtful Debt Reserves". There is no provision for unrealized interest on assets.

**5. Other Assets:**

5.1 All other assets are shown at cost including stock of stationery in hand so also items under the head of the assets including receivables.

**6. Impairment of Assets : (AS-28)**

As per requirement of Accounting Standard - 28 issued by ICAI, the bank assesses at each Balance Sheet date whether there is any indication that an asset may be impaired. Impaired loss, if any is provided in profit & loss account to the extent carrying amount assets exceeds their estimated recoverable amount.

**7. Retirement Benefits : (AS-25)**

7.1 The bank has opted for policy for Leave Encashment in case of leaves not encashed by the employees.

7.2 Bank's Contribution towards provident fund is charged to revenue every year.

**8. Treatment of Taxes : (AS-22)**

As required by RBI guidelines read with Accounting Standard - 22 issued by ICAI, the bank does not create deferred tax or deferred tax liability for the year ended on 31st march, 2026.

**9. Revenue Recognition :**

Items of Income and Expenditure are generally accounted for on an accrual basis, except as otherwise stated

**9.1** Interest on non-performing advances is recognized on realization basis, in terms of directives issued by RBI.

**9.2** Commission on Bank Guarantees are recognized in the year of receipt only for entire period, including the period which is yet to be expired.

**9.3** Dividend and Locker rent is recognized as income on receipt basis.

**10. Events occurring after balance sheet date :**

While classifying accounts as NPA due regard is given to the events occurring after the balance sheet date till the date of audit, like closure of NPA A/C, renewal of account or substantial recovery in the amount, which has the effect of altering status of the account.

**11. Segment Reporting : (AS- 17)**

In the operation of Management, Accounting Standard - 17 issued by ICAI on segment reporting is not applicable to bank, being as it operates as a single unit in India and is not subject to different risk & regards.

**12. Related Party Disclosures:**

| Sr | Name | Designation | From | To |
|---|---|---|---|---|
| 1 | Shri Ashish R. Goenka | C.E.O | 01/04/2025 | 31/03/2026 |

No further details are required to be disclosed in terms of circular of RBI dated 29th March, 2003

**13. Cash flow statement (AS-3):**

Sources and application of Fund:

**Sources of fund** (Rs. in La

| S.no | Particulars | As on 31/03/2026 | As on 31/03/2025 | Increase/(Decrease) |
|---|---|---|---|---|
| 1 | Share Capital | 199.39 | 178.42 | 20.97 |
| 2 | Reserve & Other Fund | 834.02 | 762.42 | 71.6 |
| 3 | Deposits | 7879.58 | 6615.45 | 1264.13 |
| 4 | Demand Liabilities | 0 | 0.24 | -0.24 |
| 5 | Interest Payable | 6.29 | 4.52 | 1.77 |
| 6 | Other Liabilities | 25.84 | 30.46 | -4.62 |
| 7 | Profit & Loss Accounts | 57.56 | 67.65 | -10.09 |
| | Total | **9002.68** | **7659.16** | **1343.52** |

**Application of Funds** (Rs. in L

| S.no | Particulars | As on 31/03/2026 | As On 31.03.2025 | Increase /(Decrease) |
|---|---|---|---|---|
| 1 | Cash In hand | 38.26 | 44.26 | -6 |
| 2 | Cash at bank | 516.78 | 416 | 100.78 |
| 3 | Investment including FDR & NON SLR Premium | 2714.52 | 2254.23 | 460.29 |
| 4 | Loans & Advances | 5002.22 | 4222.87 | 779.35 |
| 5 | Interest Receivable | 85.69 | 47.41 | 38.28 |
| 6 | Fixed Assets | 638.17 | 651.82 | -13.65 |
| **7** | Other Assets | 7.04 | 22.57 | -15.53 |
| | **Total** | **9002.68** | **7659.16** | **1343.52** |

**NOTES ON ACCOUNT :**

**1.1** There is no default in maintaining CRR & SLR as required by Banking Regulation Act read with RBI guidelines.

**1.2** There is no reported case of delay in payments to micro and small enterprises covered under micro, small and medium Enterprises Development Act, 2006 or of interest payments due to delay in such payments in such units.

**1.3** Confirmation/ Reconciliation of balances with other banks has been obtained and carried out.

**1.4** Advances shown in the Balance sheet are at gross value. Provision towards NPA is included in the Bad and Doubtful debts reserve.

**1.5** The investment in HTM categories as on 31st March, 2026 (Net amortization of premium paid on purchases) is Rs. 1,195.69 lakh

**1.6** Investment Fluctuation reserve (IFR) of the bank on 31st March, 2026 stands Rs. 22 lakh.

**NOTES:**

This statement of Significant accounting policies and notes on Accounts forms and Integral part of the balance sheet as at 31st March, 2026 and Annexed profit and loss account for the year ended on that day.

**INDEPENDENT AUDITOR'S REPORT**
(Under section 31 of the Banking Regulation Act. 1949)
(As Applicable to Co-operative Societies)

To,
The Members
The Agrasen Nagari Sahakari Bank Ltd.
Akola

**Report on The Financial Statements :**

1. We have audited the annexed Balance Sheet of The Agrasen Nagari Sahakari Bank Ltd, Akola as on 31st March 2026 which comprises the balance sheet as at 31st March 2026 and Profit and Loss account for the year ended on that date and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of 04 branches audited by us are incorporated in these financial statements.

**Management Responsibility for the Financial Statements :**

2. Management is responsible for the preparation of the financial statements that gives a true and fair view of financial position and financial performance of Bank in accordance with Banking Regulation Act, 1949 read with The Maharashtra Co-op Society Act 1960 and the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961, circulars and guidelines issued by Reserve Bank of India from time to time and accounting principles generally accepted in India. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to preparation and presentations of the financial statements that gives true and fair view and are free from material misstatements, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility :**

3. Our responsibility is to express an opinion on this financial statement based on our audit. We conducted the audit of bank in accordance with auditing standards issued by The Institute of Chartered Accountants of India. Those standards require that we comply with ethical requirements and planned and performed the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

4. An audit involves performing procedures to obtain evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment including the assessment of the risk of material misstatements, whether due to fraud or error. In making those risk assessments the auditor considers internal control relevant to Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedure that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and reasonableness of the accounting estimates made by the management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

5. We believe that audit evidences we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**Opinion :**

6. Further, at the Borgaon Manju Branch, a notable number of current accounts were opened during a concentrated period, with several accounts showing high-value transaction volumes during the year. While it was observed that CKYC compliance was not completed in the system for a number of these accounts, the necessary physical CKYC documents had already been collected from the customers and only the system data entry was pending. Although these observations initially point toward gaps in tracking high-value current account transactions and the customer due diligence process, the availability of physical records confirms that the base verification was done. Moving forward, the related internal control systems are being strengthened to ensure that all collected documents are updated in the system immediately to prevent any compliance lags.

During the process of dividend distribution pertaining to the Financial Year 2023-24, an operational error led to an instance of double debits (duplicate processing) in the bank accounts of certain shareholders. Upon immediate identification of this anomaly by the Bank, swift corrective action was initiated, and the inadvertently duplicated amounts were successfully and immediately recovered, ensuring that no financial loss was sustained by the bank. This issue occurred due to a temporary weakness in the internal controls; however, necessary steps are being taken to fix it to ensure that such an error does not happen again in the future.

We drew attention to the fact that the Bank's automated system had incorrectly classified certain Non- Performing Asset (NPA) advance accounts totaling Rs. 2,89,767/-, specifically certain accounts qualifying as Doubtful-1 (D1) were categorized under the Doubtful-2 (D2) category, and certain Doubtful-2 (D2) accounts were further misclassified under the Doubtful-3 (D3) category, whereas our audit verification and aging analysis revealed that these accounts legally qualified as Doubtful-1 and 2 assets as per the RBI Master Circular on Prudential Norms on Income Recognition, Asset Classification and Provisioning. Since the outstanding balance in these specific accounts was entirely unsecured, a mandatory provisioning of 100% was required and has been fully maintained by the bank under both categories; consequently, this system driven aging overstatement carries nil financial impact on the reported Profit for the year ended March 31, 2026, and the Net Advances of the bank.

The structural misclassification along with the precise category alignments has been duly identified, properly explained, and formally, reported by us in the Post Audit NPA Statements submitted to the management for rectification. However, until updated in the core banking system, this results in an inaccurate presentation of the sub-category wise Gross NPA breakup in the financial disclosures of the bank as of March 31, 2026.

**Report on Other Legal & Regulatory Requirements :**

7. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in Forms "A" and "B" respectively of the Third Schedule to the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961.

8. Further to our comments read with our detailed Audit Report in Part A, B & C with annexure thereto LFAR, Form No. 1, 7 and general report of even date, we report:

**a.** That we have obtained all the information and explanation, which to the best of our knowledge and beliefs were necessary for the purpose of our audit and found to be satisfactory.

**b.** That in our opinion proper books of accounts as required by M.C.S. Act. 1960 and rules made thereto under and bye-laws of the Bank have been kept by the Bank so far as it appears from the examination of these books.

**c.** That the Balance Sheet and Profit and loss Account audited by us are in agreement with the books of accounts and returns of the Bank.

**d.** That the Transactions of the Bank, which have come to our notice, are within the powers of the Bank.

**e.** In our opinion the accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable.

**9.** As per the information and explanations given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Cooperative Societies Rules 1961.

**10.** That on the basis of CAMELS rating, the Audit Classification of the Bank for the year 2025-2026 is **"A"**.

Place : - AKOLA
Date : - 29/06/2026
UDIN :- 26039710VZKGCH3473

As per our report of even date,
For PC Bhandari and Co.
Chartered Accountants
FRN: - 114079W

CA. Prakashchandra C. Bhandari
Partner
Membership No. 039710

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २१३ ■ मंगळवार, ३० जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मोबदला थकवला, थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर जप्तीची टांगती तलवार

### महामार्गासाठी जमीन अधिग्रहण प्रकरण; न्यायालयीन बेलीफ कार्यालयात धडकले, प्रशासनाच्या आश्वासनाने अखेर कारवाई टळली

**वर्धा जनमाध्यम :** महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा न्यायालयाने मंजूर केलेला वाढीव मोबदला वर्षानुवर्षे न दिल्याने जिल्हाधिकारी कार्यालयावर थेट जप्तीची कारवाई होण्याची नामुष्की ओढवली. सोमवारी न्यायालयीन बेलीफ आणि याचिकाकर्ते शेतकरी जप्तीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचताच प्रशासनात एकच खळबळ उडाली. अखेर निधी उपलब्ध होताच उर्वरित मोबदला अदा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर ही कारवाई टळली.



पुलगाव येथील शेतकरी सुधीरकुमार पांडे यांची जमीन नागपूर-औरंगाबाद महामार्गासाठी २००५ मध्ये संपादित करण्यात आली होती. २००७ मध्ये त्यांना केवळ ३६ हजार रुपयांचा मोबदला देण्यात आला. हा मोबदला अत्यल्प असल्याचा दावा करत त्यांनी वर्धा जिल्हा न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने पांडे यांच्या बाजूने निकाल देत वाढीव मोबदला मंजूर केला. त्यानुसार एकूण ७.४० लाख रुपयांपैकी ४ लाख २८ हजार ३३९ रुपये अदा करण्यात आले. मात्र, उर्वरित सुमारे २ लाख ७६ हजार रुपयांचा मोबदला प्रशासनाने अद्यापही दिला नव्हता.

मोबदल्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने पांडे यांनी पुन्हा एकदा न्यायालयाचे दार ठोठावले. न्यायालयाने या गंभीर दिरंगाईची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जंगम मालमत्तेवर जप्तीचे वॉरंट जारी केले.

या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी सोमवारी सकाळी सुमारे ११ वाजता न्यायालयीन बेलीफ व्ही. डी. महल्ले, यास्मिन अन्सारी आणि शेतकरी सुधीरकुमार पांडे जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. जप्तीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच भूसंपादन विभागाच्या अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करत शासनाकडून निधी उपलब्ध होताच उर्वरित रक्कम तत्काळ अदा करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर पांडे यांनी जप्तीची कारवाई स्थगित ठेवण्यास सहमती दर्शविली आणि जिल्हाधिकारी कार्यालयावरील जप्तीची नामुष्की ऐनवेळी टळली.

या प्रकारामुळे न्यायालयाच्या आदेशानंतरही शेतकऱ्यांना हक्काचा मोबदला मिळवण्यासाठी न्यायालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे जिल्हाधिकारी कार्यालयावरच जप्तीची वेळ येणे, ही यंत्रणेसाठी मोठी नाचक्की मानली जात आहे.

# कर आकारणीवर अमर काळेंनी सरकारला ठणकावणी

### प्रशासक काळातील करवाढीवर पुन्हा वाद पेटला; सुनावणीपूर्वी सर्व मालमत्ताधारकांना समान संधी देण्याची प्रधान सचिवांकडे मागणी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगर परिषदेच्या सन २०२३-२४ मधील मालमत्ता करआकारणीचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासक कार्यकाळात करण्यात आलेल्या करआकारणीविरोधात केवळ सात हजार मालमत्ताधारकांनी आक्षेप नोंदविले होते, तर तब्बल २३ हजारांहून अधिक नागरिकांनी विविध राजकीय आश्वासनांवर विश्वास ठेवत आक्षेपच दाखल केला नव्हता. आता नगर परिषद प्रशासनाने केवळ आक्षेप नोंदविणाऱ्यांची सुनावणी सुरू केल्याने हजारो नागरिकांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत खासदार अमर काळे यांनी प्रधान सचिव, नगर प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांच्याकडे धडक मागणी केली आहे.

वर्धा शहरात सुमारे ३० हजार मालमत्ताधारक आहेत. प्रशासक कार्यकाळात मालमत्तांचे सर्वेक्षण करून नव्याने करमूल्य निश्चित करण्यात आले. त्यानंतर नागरिकांना वाढीव कराच्या नोटिसा बजावण्यात आल्या. या अवाढव्य करवाढीमुळे शहरात तीव्र असंतोष निर्माण झाला होता. त्यावेळी स्थानिक नेतृत्वाने प्रशासकांना करवाढीचा अधिकार नसल्याचा मुद्दा उपस्थित केल्याने राज्य शासनाने या करआकारणीला स्थगिती दिली होती. त्यामुळे अनेक नागरिकांनी स्वतंत्रपणे आक्षेप नोंदविण्याची गरजच नसल्याचे गृहित धरले. मात्र आता नगर परिषद व विधान परिषद निवडणुका पार पडून नव्या कार्यकारिणीचे अस्तित्वात आल्यानंतर करआकारणीच्या सुनावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. परंतु आक्षेप नोंदविले नसल्यामुळे हजारो मालमत्ताधारकांना या प्रक्रियेत सहभागी होता येत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना सुनावणीपूर्वी आक्षेप नोंदविण्याची एकदाच विशेष संधी देण्यात यावी, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.

खासदार काळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, प्रशासक कार्यकाळात करवाढ करणे ही वर्धा नगर परिषदेच्या इतिहासातील पहिली घटना नाही. यापूर्वीही प्रशासकांच्या काळात करवाढ झाली असून ती स्वीकारण्यात आली होती. त्यामुळे प्रशासकांना करवाढीचा अधिकारच नसल्याचा दावा वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नगर परिषद निवडणुकीत विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी करवाढ तसेच दोन टक्के व्याजाबाबत नागरिकांना दिलासा देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र कार्यकारिणी स्थापन होऊनही हा विषय नगर परिषदेच्या सभागृहात चर्चेलाच न आल्याने नागरिकांची दिशाभूल झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

सध्या सुरू असलेल्या सुनावणी प्रक्रियेवरही खासदारांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सुनावणीसाठी कोणते अधिकृत पॅनल असावे याबाबत कोणताही ठोस निर्णय नसताना काही अधिकाऱ्यांकडून घाईघाईत सुनावण्या घेतल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. करआकारणीच्या सुनावणी समितीत जबाबदार पदाधिकारी, तांत्रिक अधिकारी, कर अधीक्षक, सर्व गटनेते आणि स्थायी समिती सदस्यांचा समावेश करून पारदर्शक प्रक्रिया राबविण्याची मागणी त्यांनी केली.

वर्ध्यातील २३ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांच्या न्यायाचा प्रश्न असल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करून सर्वांना आक्षेप नोंदविण्याची समान संधी द्यावी आणि नागरिकांच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.

# सभागृहात कचरा, राजकारणात ठिणगी: पुलगाव

## पालिका पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

**पुलगाव जनमाध्यम :** पुलगाव नगरपालिकेच्या विशेष सभेत सोमवारी अभूतपूर्व गोंधळ उडाला. शहरातील कचऱ्याची वेळेत विल्हेवाट लावली जात नसल्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी थेट नगराध्यक्षांच्या टेबलावर दोन पोती कचरा आणि नालीतील सांडपाणी टाकत प्रशासनाविरोधात जोरदार हल्लाबोल केला. या घटनेने पालिकेतील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची ठिणगी पडली आहे.



विशेष सभेचे कामकाज सुरू असताना विरोधी पक्षाचे गटनेते प्रवीण पनिया, नगरसेवक दुर्गेश यादव आणि आकाश कागडे यांनी शहरातील कचरा समस्येवर आक्रमक भूमिका घेतली. सभेच्या अजेंड्याबाहेरील मुद्दे उपस्थित करत त्यांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर व उपाध्यक्षांच्या आसनाजवळ जात त्यांच्या टेबलावर दोन पोती कचरा आणि नालीतील सांडपाणी टाकून निषेध व्यक्त केला. या प्रकारामुळे काही काळ सभागृहाचे कामकाज ठप्प झाले.

घटनेनंतर नगराध्यक्ष कविता ब्राह्मणकर यांच्या नेतृत्वाखाली सत्ताधारी पक्षाच्या नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेत निवेदन सादर केले.

सभागृहाची पवित्रता भंग करणे, कामकाजात अडथळा निर्माण करणे आणि लोकप्रतिनिधींशी गैरवर्तन केल्याप्रकरणी संबंधित नगरसेवकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. महिला नगरसेविकांशीही असभ्य वर्तन झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

दुसरीकडे, विरोधी पक्षाने आपल्या आंदोलनाचे समर्थन केले आहे. वारंवार सूचना देऊनही प्रशासनाने वॉर्डातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली नाही. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याने प्रशासनाला जागे करण्यासाठीच हा आक्रमक मार्ग स्वीकारावा लागल्याचे गटनेते प्रवीण पनिया यांनी स्पष्ट केले.

या घटनेमुळे पुलगावच्या राजकारणात नवे वादळ निर्माण झाले असून कचऱ्याचा प्रश्न आता थेट सत्ताधारी आणि विरोधकांच्या प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. या प्रकरणात जिल्हा प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आरक्षण बचाव'साठी वर्ध्यात मोर्चा; राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

## उपवर्गीकरण रद्द करण्याची मागणी

### बजाज चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**वर्धा जनमाध्यम :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात वर्ध्यात विविध आंबेडकरी सामाजिक संघटना व राजकीय पक्षांच्या वतीने सोमवारी मोर्चा काढण्यात आला. बजाज चौकातून निघालेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून शासनाने निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.



'उपवर्गीकरण हटाव', 'आरक्षण बचाव संविधान वाचवा, समानता वाचवा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. भंते राजरत्न यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. मात्र, मोर्चाला अपेक्षेप्रमाणे मोठा प्रतिसाद मिळाला नसल्याचे चित्र दिसून आले.

मोर्चात वर्धा, हिंगणघाट आणि देवळी परिसरातील आंबेडकरी कार्यकर्त्यांचा सहभाग होता. विशाल मानकर, अशोक रामटेके, निरज गुजर, किशोर खैरकार, विशाल रामटेके, अनिल जवादे, अमोनदर्शी भैसारे, महेंद्र मुनेश्वर, भास्कर भगत, शारदाताई झामरे, विद्याताई राईकवार, वसंत भगत, धर्मपाल शंभरकर, चिंतामण बुरबुरे, बंडू फुलमाळी, पंकज लभाणे, महिपाल रामटेके, अमित नाईक, प्रकाश कोरडे, राजू थूल, रमेश निमसडकर, सुनील ढाले यांच्यासह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपवर्गीकरणाला विरोध दर्शविण्यात आला असून, आरक्षणाच्या मूळ स्वरूपाला धक्का पोहोचू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला.

# रामनगर पोलिसांचा धडक छापा; गांजा सेवन करणारे तिघे रंगेहात जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** अमली पदार्थ सेवन विरोधी सप्ताह आणि जिल्हा पोलिसांच्या 'ऑल आउट' मोहिमेदरम्यान रामनगर पोलिसांनी सार्वजनिक ठिकाणी गांजा सेवन करणाऱ्या तिघांना रंगेहात पकडून त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

रामनगर पोलीस ठाण्याच्या दारूबंदी पथकाला गौरक्षण वार्डातील रेल्वे क्वार्टर परिसरातील सार्वजनिक वाचनालयाजवळ काही युवक गांजा सेवन करत असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार रविवारी दुपारी पोलिसांनी अचानक छापा टाकला. यावेळी राजेश नंदकिशोर बडसर (३४), कार्तिक दीपक सगळे (२७) आणि किसना अमर पसेरकर (२०) हे तिघे गांजा सेवन करताना आढळून आले.



पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातील २०० रुपयांचा गांजा, चिलम, कापडी चिंधी आणि माचिस असा एकूण ३५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५९८/२०२६ नोंदवून एनडीपीएस कायद्यातील कलम ८(क) व २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पौर्णिमा राखोंडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली असून पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत.

# पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणार - मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम :** श्रीक्षेत्र पंढरपूरचा आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वाकांक्षी विकास आराखडा हाती घेतला असून, हा संपूर्ण प्रकल्प नगरविकास विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वारकऱ्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच स्थानिक नागरिकांचे हित, पुनर्वसन आणि रोजगारनिर्मितीला प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विधान भवन येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या आराखड्याचा आढावा घेण्यात आला. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार समाधान आवताडे तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, 'श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्या'ला राज्यस्तरीय शिखर समितीच्या मान्यतेनंतर १८ जून २०२६ रोजी शासनाने ३ हजार ९९३.९० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. या आराखड्याअंतर्गत वारकऱ्यांसाठी आधुनिक सुविधा, पुरातन मंदिरे व मठांचे जतन, मंदिर परिसरात भव्य कॉरिडॉर, चंद्रभागा नदी घाटांचे सुशोभीकरण, नगर प्रदक्षिणा मार्गाचा विकास, आधुनिक वाहनतळ, व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते, पूल आणि पालखी तळांचा विकास करण्यात येणार आहे.

वारकऱ्यांसाठी विविध सुविधा उभारण्यासाठी २८८.६६ कोटी, पुरातन मंदिरांच्या संवर्धनासाठी ३६ कोटी आणि मंदिर परिसरातील कॉरिडॉरसाठी ५७९.२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर शहराच्या विविध विकासकामांसाठी १ हजार ३८७.९१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

# धनादेश बुडविणे भोवले; आरोपीला एक वर्षाचा कारावास, दीड लाखांचा दंड

**हिंगणघाट जनमाध्यम :** कर्जाची थकीत रक्कम फेडण्यासाठी दिलेला धनादेश वटला नाही आणि कायदेशीर नोटीस मिळूनही रक्कम अदा न केल्याने हिंगणघाट येथील एका आरोपीला न्यायालयाने एक वर्षाच्या साध्या कारावासाची तसेच एक लाख ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. द्वितीय सहदिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा मुख्य न्यायदंडाधिकारी सय्यद यांनी हा निकाल दिला.

प्रकरणातील आरोपी राहुल भांडे याने श्री गुरुदेव दत्त नागरी सहकारी पतसंस्था, हिंगणघाट येथून कर्ज घेतले होते. मात्र, त्याने नियमित हप्ते न भरल्याने कर्ज थकीत झाले. त्यानंतर थकबाकीची परतफेड करण्यासाठी त्याने पतसंस्थेला धनादेश दिला. बँकेत सादर केल्यानंतर तो धनादेश अनादरित झाला. धनादेश अनादरित झाल्यानंतर पतसंस्थेने नियमानुसार आरोपीला कायदेशीर नोटीस पाठवून रकमेची मागणी केली. मात्र, नोटीस मिळूनही आरोपीने निर्धारित मुदतीत रक्कम अदा केली नाही. त्यामुळे पतसंस्थेने २०२४ मध्ये त्याच्याविरुद्ध धनादेश अनादरप्रकरणी फौजदारी न्यायालयात दावा दाखल केला. सुनावणीदरम्यान फिर्यादी पक्षातर्फे पतसंस्थेचे अध्यक्ष संजय तराळे यांची साक्ष नोंदविण्यात आली. न्यायालयाने आरोपीला बचावाची संपूर्ण संधी दिल्यानंतर दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून त्याला दोषी ठरविले.

# आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने बळीराजाला दिला नवा आधार

**सेलू जनमाध्यम :** मृग नक्षत्र कोरडे गेल्याने चिंतेत सापडलेल्या बळीराजाला अखेर आर्द्रा नक्षत्राच्या आगमनाने मोठा दिलासा मिळाला आहे. परिसरात झालेल्या रिमझिम पावसामुळे शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरणीच्या कामांना वेग दिला असून शेतशिवारात पुन्हा एकदा लगबग सुरू झाली आहे.



यंदा पावसाने उशिरा हजेरी लावल्याने मृग नक्षत्रात अपेक्षित पाऊस झाला नव्हता. त्यामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरण्या रखडल्या होत्या. पावसाअभावी शेतकरी चिंताग्रस्त होता. मात्र आर्द्रा नक्षत्राच्या सुरुवातीलाच झालेल्या पावसाने वातावरणात आशेचा नवा किरण निर्माण केला आहे.पाऊस पडताच शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, बैलगाड्या आणि शेतीची अवजारे घेऊन शेतांकडे धाव घेतली. अनेक ठिकाणी मशागतीची कामे पूर्ण करून पेरणी सुरू झाली असून काही भागांत मोठ्या प्रमाणावर पेरण्या वेगाने सुरू आहेत. वेळेत पाऊस झाल्यास खरिपाचे उत्पादन चांगले येईल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. निसर्गाच्या लहरीपणामुळे गेल्या काही वर्षांत अनेक संकटांचा सामना करावा लागलेल्या बळीराजाने यंदाही नव्या आशेने शेतीची वाट धरली आहे. आर्द्रा नक्षत्राच्या सरींमुळे शेतशिवार पुन्हा हिरवाईच्या दिशेने वाटचाल करू लागले असून, आता संपूर्ण हंगामात समाधानकारक पाऊस व्हावा, अशी प्रार्थना शेतकरी करत आहेत.


### नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर P1035876 वरील माझे **FIROZA BEGAM** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **FIROJA BEGAM FAZLU RAHEMAN SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :-पटेल चौक जामा मस्जिद ज महादेवपुरा वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी मार्कशीट वरील **SHEIKH SHIREEN NAAZ SHABBIR** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **SHIRIN ADIB SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- वॉर्ड नं १८,गोंड प्लॉट वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी मार्कशीट वरील **SHEIKH ADIB SHEIKH HAMID** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **ADIB HAMID SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- वॉर्ड नं १८, गोंड प्लॉट वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी मार्कशीट वरील **MOHD AYAZ MOHD IQBAL** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **MOHAMMAD AYAZ MOHAMMAD IKBAL SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- बोरगाव मेघे वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी मार्कशीट वरील **SHEIKH SHAHRUKH MO ISRAR** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **SHEIKH SHAHRUKH MOHAMMAD ISARAR SHEIKH** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- खडकी पोस्ट केळझर ता.सेलू जिल्हा वर्धा ४४२१०४

### महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: conteeg.mlwb-mh@gov.in, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

**नोटीस**

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६–अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थेमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या **दिनांक ३१ डिसेंबर २०२२** पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२६** पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६–अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा. संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्त्यावर दोन प्रतींमध्ये अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नाव | रक्कम |
|---|---|
| **CHANDRAPUR** | |
| M S R T CORPN CHANDRAPUR | 13704.00 |
| **NAGPUR** | |
| AUTOMOTIVE MANUFACTURERS PVT LTD (BR-1) | 63700.00 |
| HNI OFFICE INDIA LTD | 18962.00 |
| AUTOMOTIVE MANUFACTURERS | 878460.00 |
| INDIAN HUME PIPE CO. LTD. | 12315.00 |
| NOTRA LTD | 5.00 |
| **WARDHA** | |
| WHEELS INDIA LTD | 3538.00 |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे **दिनांक ३१ मार्च २०२३** पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६–अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये **दिनांक १.०४.२०२३ ते ३१.०३.२०२६** या तीन वर्षांच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राम को लूटा, देश को लूटा, अच्छे दिन का नारा झूठा

## राम मंदिर देणगी घोटाळ्यावरून कपिल सिब्बल यांची मोदी सरकारवर टीका



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भाजपा सरकारला पराभूत करण्याचे आवाहन राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी सोमवारी केले. सरकारने देशाला लुटले असून प्रभू रामालाही सोडले नाही, असा आरोप खासदार सिब्बल यांनी केला. मोदी सरकारने दिलेली अच्छे दिनची घोषणा देखील थाप होती, अशी टीका सिब्बल यांनी केली. कपिल सिब्बल यांनी एक्स आणि फेसबुकवर एक यमक जुळणारी कविता शेअर केली असून, या कवितेच्या माध्यमातून सरकारवर टीका केली आहे.

**कपिल सिब्बल यांची टीका -** राज्यसभा खासदार सिब्बल यांनी, या सरकारचा पराभव करा, प्रभू रामाला लुटले, देशाला लुटले, असा आरोप करत अच्छे दिनची घोषणा थाप होती, अशी टीका केली. अयोध्येतील राम मंदिरात देण्यात आलेल्या देणगीत कथित गैरव्यवहारावरुन आरोप- प्रत्यारोप होत आहेत. उत्तर प्रदेश सरकारने या गैरव्यवहारप्रकरणी एसआयटी स्थापन केली आहे. देणगीतील या गैरव्यवहार प्रकरणावरुनच कपिल सिब्बल यांनी सरकारवर टीका केली आहे. कपिल सिब्बल यांनी सोशल मीडियावर याबाबत एक हिंदी कविता शेअर केली आहे.

**या सरकारचा पराभव करा**
**प्रभू श्रीरामाला लुटले**
**देशाला लुटले**
**अच्छे दिन ची घोषणा थाप**
**अशा सरकारला हटवुया**
**मिळून देशाला जोडूया**
**मनं कधीच तुटणार नाहीत**
**आपला देश सर्वांचा आहे**

**विरोधकांची सरकारवर टीका**

राम मंदिर देणगीत झालेल्या कथित गैरव्यवहारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अद्याप कोणतेही वक्तव्य केलेले नाही. पंतप्रधान मोदींच्या या मौनावरुन विरोधकांनी सवाल उपस्थित करत, दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. कथित गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसने सरकारकडून उत्तर मागितले असून, हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नाही तर नागरिकांच्या विश्वासाशी विश्वासघात केल्याचा आरोप केला. दरम्यान, उत्तर प्रदेश सरकारने या गैरव्यवहारप्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटीची स्थापना केली आहे.

**आठ जणांना अटक-**एसआयटीच्या अहवालानुसार, राम मंदिर देणगीतील गैरव्यवहारप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. अयोध्येतील स्थानिक न्यायालयाने आठही जणांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

## ‘मन की बात’मधून मोदींचे आवाहनः
# कारपूलिंगचा वापर वाढवा



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी प्रसारित झालेल्या मन की बातच्या १३५ व्या भागातून देशवासियांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी इंधन बचत, सोन्याची खरेदी मर्यादित ठेवणे आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने नागरिकांनी योगदान देण्याचे आवाहन केले. विशेषतः पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती आणि जागतिक उर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दाखवलेल्या सहकार्याबद्दल पंतप्रधानांनी देशवासियांचे आभार मानले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, काही दिवसांपूर्वी मी नागरिकांना काही काळ सोन्याची खरेदी टाळण्याचे तसेच पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला देशभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून अनेक कुटुंबांनी स्वतःहून इंधन बचतीचे विविध उपाय स्वीकारले आहेत. कारपूलिंगच्या वाढत्या वापराचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. एकाच दिशेने प्रवास करणारे अनेक नागरिक आता स्वतंत्र वाहनांऐवजी एकत्रितपणे प्रवास करत आहेत. यामुळे इंधनाची बचत, वाहतूक कोंडी कमी होणे आणि पर्यावरण संरक्षणालाही मदत होत असल्याचे मोदींनी सांगितले. दरम्यान, लोक आता बस आणि मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतूक सुविधांचा अधिक वापर करत आहेत, हे एका सकारात्मक बदलाचे लक्षण आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये नैसर्गिक शेती आणि सेंद्रिय खतांची मागणी वाढली आहे. आपण भारतीय या जागतिक संकटाचा एकत्रितपणे सामना करत आहोत याचा मला आनंद आहे. लोकसहभागाची ही शक्ती आपल्याला अधिक मजबूत करेल आणि यशस्वी करेल असा विश्वस पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला.

**भारत आत्मनिर्भर-**मन की बात कार्यक्रमात पंतप्रधानांनी संरक्षण क्षेत्रातील भारताच्या आत्मनिर्भरतेचाही उल्लेख केला. कोलकात्यात नुकत्याच भारतीय नौदलात दाखल झालेल्या स्वदेशी युद्धनौका, त्याशिवाय भारतात तयार होत असलेल्या सी-२९५ विमानांचा मोदींनी उल्लेख केला. डीआरडीओने विकसित केलेल्या स्वदेशी लाँग-रेंज लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीबद्दलही पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केले. समुद्रापासून आकाशापर्यंत भारत अधिक सुरक्षित आणि आत्मनिर्भर होत आहे. नागरिकांच्या सहभागामुळेच मोठ्या राष्ट्रीय उद्दिष्टांना गती मिळते असे सांगत पंतप्रधानांनी लोकांचे आभार मानले.

# 8 आरोपींना 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी

## राममंदिर देणगी चोरी

**अयोध्या/लखनउ-**अयोध्या राम मंदिरात अर्पण केलेल्या देणग्यांच्या चोरीप्रकरणी चंपत राय, अनिल मिश्रा आणि गोपाल राव या माजी पदाधिका-यांची चौकशी करण्यात आली आणि त्यांचे जबाब




नोंदवण्यात आले. त्यानंतर चंपत राय दिल्लीला रवाना झाले. दरम्यान, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले आहे. सीबीआय चौकशीची मागणी करणारे वकील अनूप अवस्थी यांच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार देताना, न्यायालयाने या प्रकरणातील तातडीबद्दल प्रश्न उपस्थित केला आणि सुनावणी सुट्ट्यांनंतरच होईल असे स्पष्ट केले. दुसरीकडे, सध्या तुरुंगात असलेल्या आठ आरोपींच्या बँक खात्यांची तपासणी करण्यासाठी पोलिसांनी सोमवारी सकाळी १०:३० वाजता एसबीआय च्या अयोध्या धाम शाखेला भेट दिली; यातील सात आरोपींची खाती याच शाखेत आहेत. पोलिसांनी बँकेचे विवरणपत्र (स्टेटमेंट्स) मिळवले असून, संबंधित व्यक्तींनी मंदिरात काम करण्यास सुरुवात केल्यापासून या खात्यांमध्ये किती रक्कम जमा झाली आहे, याची आता ते तपासणी करतील. तसेच, बँकेच्या दोन कर्मचा-यांनाही नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

सर्व आठ आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले जाईल आणि पोलीस त्यांची पोलीस कोठडी (रिमांड) मागू शकतात. मात्र, त्याआधीच अयोध्येतील वकिलांनी एक महत्त्वाची बैठक घेतली आणि चोरीच्या या प्रकरणात आरोपींची बाजू कोणताही वकील मांडणार नाही, असा निर्णय घेतला. तसेच, चंपत राय, गोपाल राव आणि अनिल मिश्रा यांनी अयोध्या सोडून जावे अशी मागणीही त्यांनी केली आणि तसे न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला.

चोरीचा प्रकार पहिल्यांदा ७ जून रोजी समोर आला. यूपी सरकारने १३ जून रोजी एसआयटी स्थापन केली. एसआयटीने २३ जून रोजी अतिरिक्त मुख्य सचिव संजय प्रसाद यांना अहवाल सादर केला. २५ जून रोजी ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून एफआयआर (दाखल करण्यात आला. यात रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांच्यासह ८ जणांना आरोपी करण्यात आले. मात्र, चंपत राय, अनिल मिश्रा यांच्यासह मोठ्या पदाधिका-यांची नावे नाहीत. एफआयआर दाखल झाल्यानंतर काही तासांतच पोलिसांनी टिन्नू यांच्यासह ८ आरोपींना अटक केली. २६ जून रोजी सीजेएम न्यायालयाने सर्व आरोपींना ३ दिवसांसाठी तुरुंगात पाठवले. त्याच दिवशी मंदिर ट्रस्टचे महासचिव चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामा दिला. दुस-या दिवशी ट्रस्टने सांगितले की, ११ जुलै रोजी होणा-या बैठकीत यावर निर्णय घेतला जाईल.

**अयोध्या येथे ६ जुलै रोजी राम मंदिर ट्रस्टची बैठक होणार-**अयोध्या येथील राम मंदिर ट्रस्टची बैठक आता ६ जुलै रोजी होणार आहे. यापूर्वी ही बैठक ११ जुलै रोजी होणार असल्याचे प्रस्तावित होते. सूत्रांच्या माहितीनुसार, यावेळी ही बैठक 'मणी रामदास जी की छावणी' ऐवजी 'कारसेवक पुरम' येथे होण्याची शक्यता आहे.

**जबाबदार व्यक्तींनी राजीनामा द्यावाः एसपी खासदार सनातन पांडे-**

सोमवारी समाजवादी पक्षाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत, बलियाचे एसपी खासदार सनातन पांडे यांनी अयोध्या राम मंदिरातील दान-दक्षिणेच्या चोरीबाबत आणि त्यानंतरच्या तपास प्रक्रियेबाबत गंभीर आरोप केले. ते म्हणाले, ‘सर्वप्रथम, मी माझे नेते अखिलेश यादव यांचे आभार मानतो. त्यांनीच या प्रकरणाची दखल घेतली. भाजप सरकारचे मुख्यमंत्री, त्यांची सीबीआय , सीबीसीआयडी आणि संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा या प्रकरणाचे सत्य शोधण्यात अपयशी ठरली. आम्हाला कदाचित मंदिराशी संबंधित एखाद्या व्यक्तीकडून माहिती मिळाली आणि त्यानंतर अखिलेश यादव यांनी हे प्रकरण उघडकीस आणले. ही माहिती देशभर प्रसारित आणि प्रकाशित करण्यात प्रसारमाध्यमांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. परिणामी, सरकारला एसआयटी चौकशीचे आदेश देणे भाग पडले.‘

# पगार 12 हजार, आरोपीने 25 लाखांचे घर बांधले, घरात सापडले 12 लाख

**अयोध्या/लखनउ-**अयोध्येतील प्रभु श्रीराम मंदिरात भाविकांकडून दिल्या गेलेल्या देणग्यांचे पैसे चोरल्याचे प्रकरण समोर आले. या प्रकरणाने देशभरात खळबळ माजली असून, दररोज नवीन खुलासे होत आहेत. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक असलेल्या लवकुश मिश्रा याने मंदिर ट्रस्टमध्ये रुजू झाल्यानंतर काही महिन्यांनी एक प्लाट खरेदी केला.



त्यानंतर लाखो रुपये किमतीचे घर बांधण्यास सुरुवात केली. मिश्राच्या आर्थिक व्यवहारांची आणि त्याने खरेदी केलेल्या मालमत्तेची चौकशी जसजशी पुढे सरकत आहे, तसतशी ही माहिती समोर येउ लागली आहे. महिन्याल १२ हजार पगार मिळणा-या मिश्राची कमाई आणि त्याच्याकडील संपत्ती याच्यात मोठी तफावत दिसून आली आहे. 'इंडिया टुडे'च्या रिपोर्टनुसार जी कागदपत्रे समोर आली आहेत, त्यात सुमारे एका वर्षापूर्वी राम मंदिर प्रशासनात नोकरी सुरू केल्यानंतर मिश्रा याने आपली पत्नी सुप्रिया मिश्रा हिच्या नावावर ही जमीन खरेदी केली होती.

**मिश्राने महामार्गालगत ८ लाखात घेतला प्लाट**

अयोध्या-लखनउ महामार्गाजवळ शहादतगंज-बनबीरपूर भागात असलेला हा भूखंड ८.८ लाख रुपयांना खरेदी करण्यात आला होता. या जमिनीची आणि सध्या बांधकामाधीन असलेल्या घराची सद्य बाजारातील किंमत सुमारे २५ लाख रुपये असल्याचा अंदाज आहे.सुमारे १,००० चौरस फूटाच्या या भूखंडावर दोन मजली घर बांधले जात आहे. घराचे बांधकाम मुख्यत्वे पूर्ण झाले असून, सध्या वीजजोडणीचे काम सुरू आहे. परिसरातील रहिवाशांनी सांगितले की, हे बांधकाम गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये सुरू झाले होते. रहिवाशी म्हणाले की, बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यात मिश्रा आणि त्याचे कुटुंब वारंवार या ठिकाणी येत असत आणि बांधकाम सुरू होण्यापूर्वी झालेल्या भूमीपूजन समारंभालाही ते उपस्थित होते.ही मालमत्ता मिश्रा याच्या कुटुंबाची असल्याचे सांगणारे शेजारी राजकुमार पांडे म्हणाले की, आरोपी नियमितपणे या ठिकाणी येत असे. पांडे म्हणाले, ‘हे लवकुश मिश्रा याचे घर आहे. गेल्या वर्षी फेब्रुवारीच्या सुमारास बांधकाम सुरू झाले होते. आम्ही वेळोवेळी त्याला येथे भेटायचो.‘ स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वीपर्यंत या ठिकाणी मजूर काम करत होते. मात्र, राम मंदिर देणगी चोरीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आणि मिश्राच्या अटकेची बातमी जाहीर झाल्यानंतर बांधकामाचे काम अचानक थांबले आहे.एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, ‘दोन दिवसांपूर्वीपर्यंत मजूर येथे होते. रविवारी सकाळपासून या ठिकाणी मजूर किंवा कुटुंबातील कोणताही सदस्य दिसलेला नाही.‘या घडामोडीमुळे स्थानिकांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे, विशेषत? मिश्राला राम मंदिर ट्रस्टमध्ये काम करताना दरमहा केवळ १२,००० ते १५,००० रुपये पगार मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे. शेजा-यांनी मिश्रा आणि त्याच्या कुटुंबाचे वर्णन सामान्य लोक म्हणून केले, जे सहसा मोटारसायकलवरून प्रवास करायचे आणि त्यांच्याकडे जास्त संपत्ती असल्याचे दिसत नव्हते. एका रहिवाशाने सांगितले, ‘त्यांच्या जीवनशैलीवरून त्यांच्याकडे इतका पैसा असेल असे कधीच वाटले नाही. त्यांनी हे घर कसे बांधले, हे तेच सांगू शकतात.

**‘मिश्रा राम मंदिरात करायचा पैसे मोजण्याचे काम**

२७ वर्षीय लवकुश मिश्रा हा भाविकांनी दिलेले दान आणि रोख रक्कम मोजणा-या कर्मचा-यांपैकी एक होता. पोलिसांनी या प्रकरणी मिश्रा आणि इतर आरोपींना आधीच अटक केली असून, नुकत्याच टाकलेल्या छाप्यात तपासकर्त्यांनी त्याच्या घरातून सुमारे १२ लाख रुपये जप्त केले आहेत.अयोध्या राम मंदिरातील देणगी अपहाराची माहिती नुकतीच समोर आली असून, भाविकांनी अर्पण केलेली किमान ७ कोटी रुपयांची रोख रक्कम आणि दागिने यांचा गैरव्यवहार झाल्याचा संशय आहे, तर काही दाव्यांनुसार ही रक्कम यापेक्षा खूप जास्त असू शकते. या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले असून, आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे आणि सुमारे ८० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

# कलिंगडानंतर आता मटणाची दहशत!

**नाशिक / प्रतिनिधी-**काही दिवसांपूर्वी कलिंगड खाल्ल्यामुळे एकाच कुटुंबातील चार जाणांचा मृत्यू झाला. त्यानंतर नागरिकांमध्ये कलिंगड खाण्याबाबत



दहशत निर्माण झाली होती. त्यापाठोपाठ आता नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील आखतवाडे येथे मटण खाल्ल्यानंतर विषबाधेची घटना घडली आहे. रात्री मटण खाल्ल्यानंतर थोड्याच वेळात दही खाल्ल्याने शेतकरी दाम्पत्याची प्रकृती अचानक बिघडली. यात पत्नीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला असून, नवरा गंभीर स्थितीत आहे.द्वारकाबाई शांताराम ह्याळीज (वय ५५) असे मृत महिलेचे नाव आहे. तर शांताराम ह्याळीज (वय ६०) यांच्यावर मालेगाव येथील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती अजूनही चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. रात्री दाम्पत्याने मटणाचे जेवण केले. त्यानंतर काही वेळाने त्यांनी दही खाल्ले. थोड्याच वेळात दोघांची प्रकृती बिघडू लागली. कुटुंबीयांनी तातडीने त्यांना नामपूर ग्रामीण रुग्णालयात नेले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच द्वारकाबाई यांचा मृत्यू झाला. शांताराम यांची प्रकृती अधिक गंभीर असल्याने त्यांना मालेगाव येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. बागलाण पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. नेमकी विषबाधा मटणामुळे की दह्यामुळे झाली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. यासंदर्भातील आवश्यक नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. अहवाल आल्यानंतरच खरी कारणे समोर येणार आहेत. ही घटना समजताच परिसरात एकच खळबळ उडाली आहे. काही दिवसांपूर्वी कलिंगड खाल्ल्यानंतर विषबाधेच्या घटना घडल्या होत्या. त्यानंतर आता मटणामुळे ही घटना घडल्याने नाशिक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उपसभापतीपदासाठी निवडणूक जाहीर, एकनाथ शिंदे पुन्हा मोठे सरप्राईज देण्याच्या तयारीत

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी अखेर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. विधान परिषदेचे सभापतीराम शिंदे यांनी निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं असून १ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता उपसभापतीपदासाठी मतदान होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीत माजी उपसभापती नीलम गो-हे या सर्वात प्रबळ दावेदार मानल्या जात असल्या, तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा धक्कातंत्राचा



वापर करत नवा चेहरा पुढे करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार, ३० जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत इच्छुकांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. त्यानंतर दुपारी १ वाजता अर्जांची छाननी होईल. आवश्यक असल्यास माघारीनंतर १ जुलै रोजी मतदान होणार असून, बिनविरोध निवड झाल्यास त्याच दिवशी उपसभापतीची घोषणा होण्याची शक्यता आहे.विधान परिषदेत भाजपची सदस्यसंख्या सर्वाधिक असली, तरी महायुतीतील सत्तावाटपाच्या सूत्रानुसार उपसभापतीपद पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडेच जाण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे या पदासाठी शिंदे गटातच मोठी चुरस निर्माण झाली आहे.माजी उपसभापती नीलम गो-हे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत त्या शिवसेना शिंदे गटाकडून बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा त्यांच्याच गळ्यात उपसभापतीपदाची माळ पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, पक्षांतर्गत चर्चेत कृपाल तुमाने, चंद्रकांत रघुवंशी आणि मनीषा कायंदे यांचीही नावे पुढे आली आहेत. त्यामुळे अंतिम क्षणापर्यंत उत्सुकता कायम राहणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपसभापतीपदासाठीही शेवटच्या क्षणी नवा चेहरा पुढे करून राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नीलम गो-हे यांची पुन्हा वर्णी लागणार की शिंदे आणखी एखाद्या नेत्याला संधी देणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीकडे विधान परिषदेत आवश्यक संख्याबळ नसल्याने विरोधक उमेदवार देणार की निवडणूक बिनविरोध होणार, याबाबतही उत्सुकता आहे.

# उपवर्गीकरणाविरोधात आमदारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## 2 मंत्र्यांसह 27 आमदारांच्या स्वाक्षरींचे दिले पत्र

**नागपूर** : अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. उपवर्गीकरणासंदर्भात न्या. अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबतचा अहवालही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे. हा अहवाल सार्वजनिक न करताच त्यावर सूचना व हरकती मागवण्यात आल्यात. ५० हजारांवर नागरिक, संघटनांनी या उपवर्गीकरणाबाबत सूचना व आक्षेप नोंदवले आहेत. मातंग समाजाकडून उपवर्गीकरणाचे जोरकसपणे समर्थन करण्यात येत आहे. तर महार, चर्मकार समाजाचा विरोध आहे. दोन्ही वर्गाकडून आरोप, प्रत्यारोप होत असून आंदोलन करण्यात येत आहे. उपवर्गीकरणामुळे मागास मातंग समाजाला फायदा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तर हे उपवर्गीकरण संविधान विरोधी असून आरक्षण संपवण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप होत आहे.या उपवर्गीकरणाच्या विरोधात सोमवारी दोन मंत्र्यांसह २७ आमदारांच्या स्वाक्षरींचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

**मुख्यमंत्री घेणार बैठक-**आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात अनुसूचित जातीतील आमदारांनी मुख्यमंत्र्यांची सोमवारला त्यांच्या दालनात भेट घेतली. तसेच आपल्या भूमिकेची मांडणी केली. तसेच या आमदारांनी आपल्या सह्यांचे पत्र मुख्यमंत्र्यांना देउन या निर्णयाला आपला ठाम विरोध असल्याचे ठणकावून सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर बैठक घेण्याचे मान्य केले.

**मंगळवारला मोर्चा-**या प्रश्नावर उद्या मंगळवारला मुंबईत मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाचे नेतृत्व रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, बौद्ध महासभेचे भीमराव आंबेडकर , माजी सामाजिक न्यायमंत्री आ.राजकुमार बडोले, माजी मंत्री व चर्मकार समाजाचे नेते बबनराव घोलप आदी करणार आहेत. मोर्चात सहभागी होण्यास महाराष्ट्रभरातून महिला,पुरूष रवाना झाले आहेत. या मोर्चात उपवर्गीकरणाला विरोध करणारे बहुतेक सर्व आमदार सहभागी होणार आहेत. या प्रश्नावर उद्या ३० जूनला विरोधी पक्षांकडून विधानसभेत स्थगन प्रस्ताव आणि ६ जुलै रोजी अल्पकालिन चर्चा होणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे या प्रश्नावर सभागृह गाजणार असल्याचे दिसते. जाती-जातींमध्ये फूट पाडण्याचा आणि समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप यावेळी आमदारांनी केला.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार?; हवामान खात्याचा येलो अलर्ट जारी

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यभर समाधानकारक पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे.



यातच आजपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सोमवारी मध्यरात्रीपासून मुंबईत पुन्हा एकदा दमदार पावसाने हजेरी लावली.मुंबईसह कोकणपट्टीत आणि घाटमाथ्यावर मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम किनारपट्टी, संपूर्ण कोकण आणि सह्याद्रीच्या घाटभागात २९ जून ते २ जुलै या काळात पावसाचा जोर वाढेल.बंगालच्या उपसागरात तयार होणा-या हवामान प्रणालीमुळे १ आणि २ जुलै या कालावधीत तळकोकण, गोवा तसेच मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाचा जोर वाढलेला असेल.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज मुंबईसह कोकण विदर्भात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर विदर्भातील अमरावती जिल्ह्यासाठी जोरदार पावसाचा अंदाज व्यक्तकरत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. राज्यातील इतर भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वा-यांसह पावसाची शक्यता असल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे.मध्य महाराष्ट्रातील लोणावळा येथे गेल्या २४ तासांत राज्यातील सर्वाधिक ६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. इतर भागांतही हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावर, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांतही जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचा जोर जास्त राहणार असल्याचा अंदाज आहे. काही दिवसांपूर्वी नैऋत्य मोसमी वा-यांनी काही दिवसांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्र व्यापला असला तरी त्यानंतर मान्सूनची पुढील वाटचाल मंदावली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन ते तीन दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांत मान्सून पुढे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातही पावसाचा जोर वाढण्याची अपेक्षा आहे.

# महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकवणे अनिवार्य- शिक्षण मंत्री दादा भुसे यांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी** -महाराष्ट्रातील सगळ्या शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकवली जाणे हे अनिवार्य असेल अशी घोषणा शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली. दादा भुसे यांनी असंही सांगितलं की या नियमाचं कुणी उल्लंघन केलं तर त्या शाळेवर कारवाई करण्यात येईल असंही दादा भुसे यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र विधानसभेचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. यावेळी



दादा भुसे यांनी मराठी भाषेबाबत जो प्रश्न विचारण्यात आला त्याला उत्तर देत असताना ही घोषणा केली. मराठी भाषा शिकवणं हे प्रत्येक शाळेसाठी अनिवार्य असेल. जर कुणीही हा नियम मोडला तर त्यांच्यावर सरकार कारवाई करणार हे नक्की. भाजपाचे आमदार अतुल भातखळकर यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी असं म्हटलं होतं की महाराष्ट्रात अनेक शाळा अशा आहेत ज्या मराठी विषय शिकवणं हा ऐच्छिक विषय आहे असं मानतात आणि मराठी भाषा शिकवत नाहीत. त्यावर उत्तर देताना दादा भुसे यांनी घोषणा करत राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणं अनिवार्य असेल अशी घोषणा केली. महाराष्ट्राचं सरकार हे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि मराठी भाषेला प्रोत्साहन मिळावं यासाठी तसंच प्रसारासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. मराठी भाषा ही सर्व शाळांमध्ये शिकवणं अनिवार्य करण्यात आलं आहे. मराठी भाषा सर्व शाळांमध्ये योग्य पद्धतीने पहिली ते दहावी या वर्गांना शिकवली जाते आहे की नाही? हे तपासण्यासाठी एक विशेष तपास पथक मोहीम राबवली जाणार आहे. मराठी भाषा सरकारने अनिवार्य केल्यानंतरही जर शाळा हा नियम धुडकावणार असतील तर त्या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येईल. एनडीटीव्हीने याबाबतचं वृत्त दिलं आहे. शालेय अभ्यासक्रमातील इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा विस्तृत स्वरुपात देण्यात आला आहे. यापूर्वीच्या शिक्षण मंडळांच्या पाठ्य पुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास एक किंवा दोन क?लम इतकाच मर्यादित होता. मात्र केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर आपण छत्रपती शिवरायांच्या इतिहासाची २२ पानं ही अभ्यासक्रमात समाविष्ट केली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यानंतरचे मराठा शासक यांची माहिती मुलांना विस्तृत स्वरुपात मिळण्यासाठी आपण हा निर्णय राबवला आहे अशीही माहिती दादा भुसेंनी विधानसभेत दिली.

# आधीच तरुण आपल्यावर ओरडतोय

## भर अधिवेशनात सुधीर मुनगंटीवारांचा सरकारला घरचा आहेर

**मुंबई/प्रतिनिधी :** आज भर अधिवेशनात भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी TET पेपरफुटीच्या मुद्द्यावरून आपल्याच सरकारला खडेबोल सुनावले. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी च्च्क पेपरफुटीवर अधिवेशनात निवेदन दिले, यानंतर मुनगंटीवर यांनी थेट सरकारवरच निशाणा शाधला. आधीच राज्यातील तरुण आपल्यावर प्रचंड ओरडतोय, जर पोलीस इन्स्पेक्टरने वेळीच कारवाई केली नसती तर परीक्षा झाल्यावर मोठी बोंबाबोंब झाली असती, अशी थेट कबुली त्यांनी दिली. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी च्च्क पेपरफुटीवर अधिवेशनात निवेदन दिल्यानंतर यानंतर सुधीर मुनगंटीवर यांनी भाष्य केलं. ते म्हणालेत की, पैसे ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या नाशिकची निवड करतात आणि



प्रश्नपत्रिका छापतात त्या आग्र्याला, हे बंद करून राज्यातच प्रश्नपत्रिका छापाव्यात. या गुन्ह्यात किंवा पेपर फोडण्यात महाराष्ट्राचा माणूस नाही. याचा अर्थ असाही झाला की तिजोरीत पैसा ठेवले आणि तिजोरीला चावीच नाही. आता त्या इन्सपेक्टरचं अभिनंद. कारण त्याने लगेच कारवाई केली. अन्यथा, परीक्षा झाल्यावर जर बोंबाबोंब झाली असती तर आधीच आपल्यावर तरूण ओरडतो नंतर आणखी ओरड झाली असतं, असं भाजपचे ज्येष्ठ नते सुधीर मुनगंटीवर भर अधिवेशनात म्हणालेत आणि आपल्याच सरकारला घरचा आहेर दिला.महायुतीचे नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. ते भाजपचे अत्यंत ज्येष्ठ नेते, माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी अर्थमंत्री राहिलेले आहेत. अशा वजनदार नेत्याला मंत्रिमंडळाबाहेर ठेवल्याने ते नाराज असल्याचे बोलले जाते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## श्रद्धास्थानातील चोर

देशातील कोट्यवधी जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्येतील श्री प्रभू राम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्या आणि मौल्यवान वस्तूंमध्ये मोठा घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने हे असे झालेच कसे, असा प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होणे साहजिक आहे. अयोध्येतील राम जन्मभूमी मुक्त करण्यासाठी कारसेवकांनी केलेल्या आंदोलनात बाबरी मशीद १९९२ मध्ये उद्ध्वस्त झाली. या घटनेपूर्वीपासून गेली कित्येक वर्षे बाबरी मशीद-राम जन्मभूमीचा वाद न्यायालयात प्रलंबित होता; पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यावर या विषयाला गती मिळाली. अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले गेले. २०२४ पासून प्रभू रामचंद्राचे दर्शन आम जनतेसाठी खुले झाले. अशा श्रद्धास्थानावर भाविकांनी दिलेल्या देणग्या व अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तू यांत घोटाळा होईल, याची कोणी स्वप्नातही कल्पना केली नसावी.भक्तांनी दिलेल्या देणग्यांमध्ये घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर भाजप सरकारने तत्काळ विशेष तपास पथकाची (एसआयटी) नेमणूक केली. एसआयटीने दिलेल्या प्राथमिक अहवालानंतर क्षणाचाही विलंब न लावता पोलिसांनी मंदिरातील आठ जणांना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी केली. आजवर ८० लाख रुपये छाप्यातून वसूल झाले असले, तरी ही रक्कम खूप मोठी असू शकते. या कर्मचाऱ्यांच्या मागे नेमके मोठे मासे कोण आहेत, याचा एसआयटी शोध घेत आहे. गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य, विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामे दिले. घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढली आहे. चंपत राय व अनिल मिश्रा यांचा या घोटाळ्यात किती सहभाग व संबंध होता, हे सखोल चौकशीनंतर स्पष्ट होईल. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय असल्याचे मान्य केले व श्रीरामाचे भव्य मंदिर उभारण्याचा मार्ग मोकळा झाला.श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी २०२० मध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना करण्यात आली. त्याचे संस्थापक सरचिटणीस म्हणून चंपत राय यांची नेमणूक करण्यात आली. मंदिराची उभारणी व देणग्यांचे व्यवहार हाताळणीत चंपत राय यांची सुरुवातीपासूनच महत्त्वाची भूमिका राहिली. त्यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर न्यासाच्या एकूण कारभाराविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. चंपत राय यांचा माजी वाहनचालक रामशंकर यादव ऊर्फ टिन्नू यालाही पोलिसांनी अटक केली. देणग्या हताळणाऱ्या सात हिशेब कर्मचाऱ्यांना अटक झाली. एसआयटीने नऊ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असला, तरी आठ जणांना अटक केली आहे. अज्ञात आरोपी आणखी कोण-कोण आहेत, हे लवकरच पुढे येईल. देणगी घोटाळा प्रकरणाची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावी, अशी मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे. तसेच, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास बरखास्त करावा, अशीही मागणी पुढे येत आहे.देणग्यांमध्ये अपहार झाला, हे उघड आहे. हा प्रकार केंद्रात व राज्यात असलेल्या भाजप सरकारने वेळीच उघड केला, तत्काळ एसआयटी नेमून आठ जणांची रवानगी तुरुंगात केल्याने हे प्रकरण तडीस जाण्याची आशा निर्माण झाली आहे. न्यासाच्या मुख्य पदाधिकाऱ्यांचे राजीनामे घेऊन त्यांना तेथून हटवण्यात आल्याने चौकशीचा मार्ग बराचसा मोकळा झाला. वास्तविक, या आर्थिक घोटाळ्याला राजकीय रंग देणे चुकीचे आहे. त्यामुळे घोटाळ्याचे गांभीर्य कमी होण्याचा किंवा मूळ मुद्दा बाजूला पडण्याचा धोका आहे. काँग्रेस व समाजवादी पक्षाने त्यात राजकारण सुरू केल्याचे दिसते. एसआयटी चौकशी चालू असताना राम मंदिराची कोणी बदनामी करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले असले, तरी त्याबद्दलची मोठी जबाबदारी खुद्द त्यांच्यावरच असल्याने ते प्रकरण कसे हाताळतात, हे स्पष्ट होईलच. देणग्यांची रोख रक्कम मोजणाऱ्या प्रमुख कर्मचाऱ्यांनाही अटक झाली. देणगी घोटाळ्याचा तपास तत्परतेने व पारदर्शक व्हावा, अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. एसआयटी तपास हा काही राजकारणाचा विषय होऊ नये. जे दोषी आहेत, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. देणग्या व मौल्यवान वस्तू ज्या मंदिरात अर्पण होतात, त्यांची नोंद व हिशेब अचूक व रोजच्या रोज असला पाहिजे. रोख रक्कम जमा करण्याच्या प्रक्रियेतील घोटाळ्यात कोणी बँक कर्मचारी असतील, तर त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.राम मंदिराच्या उद्घाटनाचा भव्य-दिव्य सोहळा २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडला होता. राम मंदिराची उभारणी हा त्याकडे आस लावून बसलेल्या जनतेच्या आनंदाचा व अभिमानाचा क्षण होता. म्हणूनच मंदिरात दिलेल्या देणग्यांमधे घोटाळा होत असेल, तर राम भक्तांना, भाविकांना, मंदिरासाठी छोटे-मोठे योगदान देणाऱ्या प्रत्येकाला दुःख होणे स्वाभाविक आहे. अटक केलेल्या सर्वांवर चोरी, फसवणूक, गुन्हेगारीचा कट असे गंभीर गुन्हे नोंदवले आहेत; मात्र अटक केलेल्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे, वडिलांचे नाव, घरचे पत्ते आदी तपशिलाची न्यासाकडे नोंदच नव्हती, यावरून या विषयाचे नसलेले गांभार्य लक्षात येतेच. आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष केले गेले, हेही तितकेच गंभीर. देणग्यांमध्ये नेमका कसा घोटाळा झाला, किती रकमेचा झाला व अटक केलेल्यांचा त्यात वाटा किती होता, हे लवकरच स्पष्ट होईल; पण त्याची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता वर्तवण्यात येते, ती भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर दिल्या गेलेल्या देणग्या आणि दिले जाणारे दान यामुळे. शिवाय, मंदिर उभारणीपासूनच झालेले सर्व आर्थिक व्यवहार स्पष्ट झाले पाहिजेत, ही मागणीही रास्त आहे. देणगी घोटाळा प्रकरणात संशयाचे धुके दूर करताना जे कुणी गुंतले असतील त्यांना कठोर शिक्षा होणे आणि मंदिर व्यवस्थापनाचा गमावलेला विश्वास पुन्हा मिळवणे, पावित्र्य राखणे, त्यासाठी पारदर्शी व्यवस्था निर्माण करणे महत्त्वाचे. अर्थात, देशभरातील मंदिरांच्या आर्थिक व्यवस्थापनाकडेही या घटनेने दिशानिर्देश केला आहे. त्याची नोंदही सरकारला घ्यावी लागेल. आजच्या डिजिटल युगात मंदिरांमधील देणग्यांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. प्रत्येक देणगीची ऑनलाईन नोंद, नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण, सीसीटीव्ही देखरेख आणि वेळोवेळी सार्वजनिक आर्थिक अहवाल प्रसिद्ध केल्यास भाविकांचा विश्वास अधिक दृढ होईल. श्रद्धा आणि उत्तरदायित्व यांचा समतोल राखणे, हीच प्रत्येक धार्मिक संस्थेची खरी परीक्षा आहे. राम मंदिरासारख्या राष्ट्रीय श्रद्धास्थानाने या बाबतीत आदर्श निर्माण करणे अपेक्षित आहे.

# कापूस, कडधान्यांची कोंडी कशी फुटेल ?

**देशात एल निनो'मुळे कमी पाऊस राहून यंदा शेतीमालाच्या उत्पादनात घट येण्याचे संकेत मिळत आहे. त्यातही कापूस आणि तुरीसारख्या जास्त कालावधीच्या पिकांसह रब्बी पिकांच्या उत्पादनाविषयी काहीशी जास्त चिंता आहे. याचे पडसाद बाजारात दिसत आहेत. पण दुसरीकडे सरकारच्या आयातजीवी धोरणांची टांगती तलवार आहे.**





देशातील कापूस, कडधान्य तेलबिया पुरवठ्याचा प्रश्न केवळ आयातीने सुटणार नाहीत. आयातीमुळे प्रश्न तात्पुरता सोडवता येतो; पण शेतीमालाच्या मूल्यसाखळीवर त्याचा दीर्घकालीन परिणाम होतो, ही मांडणी आता सर्वच पातळ्यांवर केली जात आहे. याला सरकारच्या धोरणांची साथ मिळणे आवश्यक आहे.

### कापसातील गुंतागुंत

कापसाचा प्रश्न यंदा गुंतागुंतीचा बनला आहे. एककीकडे देशात कापसाचा पुरवठा चांगला आहे. तर दुसरीकडे उद्योगांनी कापूस आयातीवरील शुल्क काढण्याची मागणी करून ती मान्य करून घेतली. एरवी देशात पुरवठा कमी असल्यानंतर कापूस आयातीचा निर्णय सरकार घेते. पण यंदा देशात कापसाचा पुरवठा जास्त आहे. त्यामुळे हंगामाच्या शेवटी ८० लाख गाठीच्या दरम्यान कापूस शिल्लक राहील, असा अंदाज उद्योगांनी व्यक्त केला आहे. म्हणजेच देशात कापसाचा पुरवठा चांगला असल्याचा उद्योगांचा दावा आहे. पण तरीही उद्योग आयातीची मागणी का करतात, हा प्रश्न आहे. त्यामुळे उद्योगांच्या देशातील शिल्लक कापसाच्या अंदाजावर शंकाही उपस्थित केली जाते.

उद्योगांच्या मते देशातील कापसाची गुणवत्ता कमी आहे. आयात कापसाची गुणवता चांगली असते. सूतगिरण्यांनी दिलेल्या माहितीनुसार देशातील रुईकर प्रक्रिया करून सूत निर्मिती केल्यास खराब रुईचे प्रमाण अधिक आहे. त्याउलट ब्राझील, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतून आयात केलेल्या रुईवर प्रक्रिया केल्यास सुताचा उतारा चार टक्क्यांनी अधिक येतो. त्यामुळे सध्या देशात कापसाची उपलब्धता जास्त असली, तरी वेस्टेज जास्त जात आहे. म्हणजेच आयात कापसाच्या तुलनेत सूत निर्मितीचा खर्च वाढत आहे. यामुळे आयात कापूस देशातील कापसापेक्षा काहीसा महाग असता, तरी उद्योगांकडून आयात कापसाला मागणी आहे. उद्योग आयात कापूस खरेदी करत आहेत. कारण निर्यातीसाठी स्पर्धा करताना कापड आणि सुताचा भाव काय आहे, हे बघितले जाते. देशात कापूस असला, तरी प्रक्रियेचा खर्चः जास्त येत आहे. यामुळे देशात कापूस असूनही निर्यातीतील स्पर्धेत टिकता यावे, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणीप्रमाणे कापड आणि सूत निर्मिती करता यावी, यासाठी आयात कापसाला उठाव मिळत असल्याचे उद्योगांनी सांगितले.

म्हणजेच एकीकडे देशातील शेतकरी कापसाचे उत्पादन घेत आहेत. पण गुणवत्ता कमी असल्याने उद्योग आयात मालाला पसंती देत आहेत. तर दुसरीकडे कमी उत्पादकता आणि उत्पादन खर्च वाढल्याने शेतकऱ्यांना पुरेसा भावही मिळत नाही, अशा कात्रीत देशातील कापूस क्षेत्र सापडले आहे. आयात कापसाचा वापर प्रक्रियेसाठी वाढत असताना देशातील कापूस मात्र पडून राहत असल्याचे दिसत आहे. यामुळे देशातील कापूस उत्पादकांना चांगला भाव मिळत नाही. यातुन मार्ग काढण्यासाठी देशातील उत्पादकता वाढवणे, कचरामुक्त कापसाची वेचणी, कापूस प्रक्रियेचे सक्षमीकरण आणि कापूस उत्पादकांना चांगला परतावा देणे या पातळ्यांवर काम करावे लागणार आहे.

अनुत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना आत्याधुनिक बियाणे तंत्रज्ञान पुरविणे आवश्यक आहे. ते सध्या सरकार करत नाही. यंदाही कीड-रोगांना पोषक ठरणारे कापूस वाणच शेतकऱ्यांच्या माथी सरकार मारत आहे. सध्या भारत जगातील सर्वाधिक कापूस लागवड करणारा देश आहे. पण कापूस उत्पादकता मात्र कमी आहे. अमेरिका, ब्राझील, ऑस्ट्रेलिया या देशांच्या तुलनेत भारताची उत्पादकता अनेक पटींनी कमी आहे. भारतात हेक्टरी ४५० ते ५०० किलो रुई मिळते. तर जागतिक सरासरी उत्पादकता ८०० किलो आहे. भारत उत्पादकतेच्या बाबतीत या प्रगत देशांच्याच नाही तर पाकिस्तान आणि बांगलादेशच्याही मागे आहे. बांगलादेशात ७०० ते ७५० किलो प्रति हेक्टर रुईची उत्पादकता आहे. तर पाकिस्तानमध्येही ५५० किलोच्या दरम्यान उत्पादकता आहे. चीन ३० ते ३५ लाख हेक्टरवर कापसाची लागवड करतो आणि आपल्याएवढे किंवा कधी आपल्यापेक्षा जास्तही कापसाचे उत्पादन घेतो. भारतात जगाच्या एकूण लागवड क्षेत्रापैकी ३५ टक्क्यांच्या दरम्यान क्षेत्र आहे. मात्र जागतिक कापूस उत्पादनात भारताचा वाटा केवळ ३० ते ३५ टक्के आहे. सीनमध्ये जागतिक कापूस लागवड क्षेत्राच्या तुलनेत केवळ १२ ते १५ टक्के क्षेत्र असते आणि चीन एकूण जागतिक उत्पादनाच्या २३ ते ३० टक्क्यांच्या दाम्यान उत्पादन घेतो. यावरून देशातील कापूस उत्पादकतेची अवस्था काय आहे, हे आपल्या लक्षात येते. यात सुधारणा करणे आता गरजेचे बनले आहे. कारण देशातील शेतक-यांना एकरी उत्पादकता कमी मिळत असल्याने त्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे. शिवाय या कापसाची गुणवत्ता कमी असल्याचे उद्योगांचे म्हणणे आहे. त्यामुळे उद्योग दुसऱ्या देशातील कापसाला पसंती देत आहेत. त्यामुळे सरकारने उद्योगांसोबत धोरण ठरवून त्याची शेतकऱ्यांच्या पातळीवर अंमलबाजावणी करावी.

देशात यासंदर्भात काही प्रयोग सुरूही आहेत. महाराष्ट्रात सचन कापूस लागवडीचा प्रयोग अकोला आणि इतर काही जिल्ह्यांमध्ये घेतला जात आहे. त्यातून उत्पादकता चांगली आल्याचे निष्पन्न झाले आहे. शिवाय कापसाची गुणवत्ताही चांगली आली आहे. हा प्रयोग देशपातळीवर सर्वच कापूस उत्पादकांच्या पातळीवर राबवणे गरजेचे आहे. पण याही शेतकऱ्यांना आधुनिक बियाणे तंत्रज्ञान मिळत नाही. तसेच सध्याचा प्रयोग सरकारच्या अनुदानावर सुरू आहे. सरकारने हे अनुदान मोजक्याच शेतकऱ्यांना न देता सर्वच शेतकऱ्यांना द्यावे. कापसाचे कमी कालावधीचे आणि एकाच वेळी वेचणीला येणारे वाण दिल्यास खर्च कमी होईल, हे या प्रयोगातून सिद्ध झाल्याचे काही शेतकऱ्यांचा अनुभव आहे. देशातील शेतकऱ्यांना हेक्टरी उत्पादन चांगले मिळाले तर त्यांना परतावा मिळण्यास मदत होईल. कापसात काडी कचरा कमी आता तर उद्योगांना गुणवत्तापूर्ण कापूस मिळण्यास मदत होईल. देशातील कापसाचा पुरेपूर वापर होण्यास अडचण येणार नाही. पण हे सर्व करण्यासाठी केवल शेतकन्यांच्या खांद्यावर भार देऊन चालणार नाही. यासाठी सरकार आणि उद्योगांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

### कडधान्याचा प्रश्न गंभीर होणार?

देशातील कडधान्य बाजारपेठेची वाटचाल हळूहळू खाद्यतेलाप्रमाणे आयातजीवी अवस्थेकडे सुरू आहे. भारताची कडधान्य आयात २०१०-११ मध्ये २६ लाख टनांच्या दरम्यान होती. त्यानंतर कडधान्य आयात दरवर्षी देशातील उत्पादनानुसार कमी जास्त होत राहिली. २०१५ च्या 'एल निनो' वर्षात उत्पादन घटल्याने २०१६-१७मध्ये आयात वाढून ६६ लाख टनांवर पोचली होती. तर २०२३ च्या एल निनो वर्षातर २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात उत्पादन विक्रमी ७३ लाख टनांवर पोहोचले होते. गेल्या आर्थिक वर्षातील आयात ५९ लाख टन झाली होती. म्हणजेच एल निनो वर्षात देशातील उत्पादन घटल्यानंतर सरकारने दुष्काळाचा ताण सहन करणाऱ्या वाणांचा विकास करून उत्पादन वाढविण्यावर भर न देता आयात करून देशातील पुरवठा वाढविण्यावर भर दिला. यामुळे पाऊस चांगला असतानाही देशातील आयात वाढलेली राहिली. २०२५-२६ या वर्षात पाऊस चांगला होता. तरीही कडधान्य आयात ५९ लाख टनांच्या दरम्यान राहिली. विशेष म्हणजे देशातील कडधान्याचे भाव दबावात होते. तूर, मूग, उडीद, मसूर आणि हरभरा या सर्वच मालाचे भाव हमीभावापेक्षा १५ ते २५ टक्के कमी होते. तरीही सरकारने आयात शुल्क काढलेले होते त्यामुळे आयात वाढली होती. आयात वाढल्याने देशातील शेतकऱ्यांरा चांगला भाव मिळाला नाही. एखाद्या वर्षी उत्पादन कमी होऊन भाव वाढले तर सरकार आयात वाढवून पुढचे दोन-तीन वर्षे भाव वाढू देत नाही. हे चक्र असेच सुरू आहे. यामुळे देशातील कडधान्य उत्पादन कमी होऊन आयात वाढत आहे. शेतक-यांना योग्य परतावा मिळत नाही म्हणून इतर पिकांकडे वळत आहेत.

सरकारचे कडधान्य मिशन केवळ घोषणेपुरते राहीले आहे. सरकार हमीभावाने खरेदीचे घोषणा करते पण खरेदीची प्रक्रिया अशी राबवली जाते, की ज्यामुळे खरेदी होणारच नाही. आता यंदा कमी पाऊला असल्याने देशातील कडधान्य उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पण एल निनोची चर्चा सुरू होण्याच्या आधीच आयातीला पोषक धोरण सुरू ठेवलेले आहे. तूर आयातमुक्त आहे. मसूर आणि हरभरा आयातीवर केवळ १० टक्के शुल्क आहे. पिवळा वाटाना धोरणही आयात वाढीस पोषक आहे. या पुढील काळात उत्पादनात घटीची चिन्हे स्पष्ट दिसून लागल्यास किंवा देशातील भाव वाढु लागल्यास सरकार आयातीला आणखी मोकळीक देईल. मागील काही दिवसांमध्ये हरभरा, तूर यांच्या भावात सुधारणा झाली आहे. पुढील काळात बाजारातील आवक कमी झाल्यानंतर भाव आणखी वाढतील. त्यामुळे सरकारच्या आयातजिवी धोरणाची कु-हाड बाजारावर कोसळणार याची भिती आजच बाजारात आहे. सरकारच्या याच धोरणांमुळे देशातील कडधान्य उत्पादन वाढलेले नाही. त्यामुळे सरकारने देशातील कडधान्याचे भाव हमीभावापेक्षा खाली जाणार नाही असे आयात धोरण राबवावे अशी मागणी उद्योगांनी केली आहे. असे केल्यास शेतक-यांना किमान हमी भावाची शाश्वती राहील. शेतकरी देशातील उत्पादन वाढवतील पण यासोठी सरकार धोरणात्मक दुरदृष्टी दाखवणे गरजेचे आहे. सरकारने प्रत्येक शेतीमालाच्या बाबतीत असे धोरण राबविल्यास शेतक-यांना योग्य परतावा मिळण्यास मदत होईल आणि ते उत्पादन वाढवतील. (साभार ॲग्रोवन)

**अनिल जाधव**

# पिकाचा विमा नाही... विम्याचे पीक घेत आहेत शेतकरी!

'शेती ही निसर्गाशी चाललेली लढाई आहे,'असे आपण अनेकदा म्हणतो. परंतु आजच्या काळात ही लढाई फक्त निसर्गाशी राहिलेली नाही.आजचा शेतकरी निसर्गाशी, बाजारपेठेशी,सरकारी धोरणांशी,वाढत्या उत्पादन खर्चाशी, कर्जाच्या ओझ्याशी आणि प्रशासनाच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियांशी एकाच वेळी झुंज देत आहे.ही परिस्थिती इतकी भयावह झाली आहे की आज अनेक शेतकरी पेरणी करताना भरघोस उत्पादनाचे स्वप्न पाहत नाहीत,तर विमा मिळेल का?याचा विचार करतात. म्हणूनच आज ग्रामीण भागात एक कटू पण वास्तववादी वाक्य ऐकायला मिळते.'पिकाचा विमा नाही..विम्याचेच पीक घेत आहेत शेतकरी!'ही केवळ भावनिक घोषणा नाही, तर देशातील कृषी व्यवस्थेचे अपयश दाखवणारा आरसा आहे.

एकेकाळी शेतकऱ्याची ओळख त्याच्या भरघोस उत्पादनामुळे व्हायची. तो चांगल्या बियाण्याचा शोध घ्यायचा, योग्य वेळी पेरणी करायचा, शेतात रात्रंदिवस कष्ट करायचा आणि भरघोस पीक घेऊन बाजारात जायचा. त्याला आपल्या मेहनतीवर विश्वास होता. आजही शेतकरी तेवढ्याच जिद्दीने कष्ट करतो, पण त्याच्या मेहनतीला न्याय मिळत नाही.

आज शेतकरी पेरणीपूर्वीच चिंतेत असतो. बियाणे महाग, खते महाग, औषधे महाग, मजुरी महाग,वीज अनियमित,डिझेल महाग, सिंचनाची समस्या वेगळी आणि त्यानंतर निसर्गाचा लहरीपणा. एवढ्या अडचणींवर मात करून पीक उभे राहिले तरी बाजारात योग्य भाव मिळेल याची खात्री नसते. उलट भाव पाडले जातात.व्यापारी,दलाल,आयात-निर्यात धोरणातील बदल आणि सरकारी निर्णय यांचा सर्वात मोठा फटका शेतकऱ्यालाच बसतो.

यामुळे आज शेतकऱ्याच्या मनात एक भयंकर मानसिकता निर्माण झाली आहे.'पीक चांगले आले तर भाव मिळणार नाही... पीक खराब झाले तर कदाचित विमा मिळेल.' म्हणजे शेतीचा केंद्रबिंदू उत्पादन राहिलेला नाही, तर नुकसानभरपाई बनली आहे.

पीक विमा योजना शेतकऱ्याला आधार देण्यासाठी सुरू झाली. यामागील उद्देश चांगला होता. नैसर्गिक आपत्तीत शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त होऊ नये म्हणून विमा योजना आवश्यक आहे.परंतु अनेक शेतकऱ्यांच्या अनुभवात वेळेवर पंचनामे होत नाहीत, नुकसानाचे योग्य मूल्यमापन होत नाही, ऑनलाइन प्रक्रियेमुळे अडचणी निर्माण होतात, अनेक महिने भरपाई मिळत नाही किंवा नुकसानाच्या तुलनेत अत्यल्प रक्कम मिळते. त्यामुळे विमा हा शेतकऱ्याचा विश्वासू आधार न राहता अनिश्चिततेचे प्रतीक बनतो.परंतु या सर्व चर्चेत एक मूलभूत प्रश्न कायम दुर्लक्षित राहतो.शेतकऱ्याला विम्याची गरजच का पडावी?

जर शेतीला उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाला असता, जर बाजारात मुक्त स्पर्धा असती, जर शेतमाल निर्यातीवर अनावश्यक निर्बंध नसते, जर शेतकऱ्याला आपल्या मालाचा ग्राहक स्वतः निवडण्याचे स्वातंत्र्य असते, तर तो विम्यावर अवलंबून राहिला असता का?याच प्रश्नावर शेतकरी संघटनेचे संस्थापक पद्मभूषण शरद जोशी यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी शेतकऱ्यांना कधीही दयेचे पात्र मानले नाही. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले..'शेतकऱ्याला अनुदान नको... कर्जमाफी नको... दान नको... शेतकऱ्याच्या घामाचा योग्य दाम द्या.'

शरद जोशी यांचा लढा कधीही मोफत सुविधा मिळवण्यासाठी नव्हता. त्यांचा संघर्ष शेतकऱ्याला आर्थिक स्वातंत्र्य मिळावे, शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा आणि शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित न्याय्य किंमत मिळावी यासाठी होता.शरद जोशी यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा सन्मान जाहीर केला. मात्र, शेतकरी संघटना आणि त्यांच्या मुलींनी हा सन्मान स्वीकारला नाही. त्यामागे भूमिका स्पष्ट होती.देशातील शेतकरी अजूनही अन्याय सहन करत असताना केवळ वैयक्तिक सन्मान स्वीकारणे योग्य ठरणार नाही. हा निर्णय व्यक्तीपेक्षा विचार मोठा असल्याचे प्रतीक होता. शरद जोशी यांचा वारसा म्हणजे स्वाभिमान, तत्त्वनिष्ठा आणि शेतकऱ्याच्या न्याय्य हक्कासाठी अखंड संघर्ष.आज जर त्यांची कृषीविषयक धोरणे गंभीरपणे राबवली गेली असती, तर कदाचित आज शेतकऱ्याला विम्याच्या भरवशावर जगण्याची वेळ आली नसती.

आज शेतकरी केवळ नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात नाही. तो चुकीच्या बाजारव्यवस्थेमुळे संकटात आहे. उत्पादन खर्च वाढतो, पण भाव वाढत नाही.ग्राहक महाग खरेदी करतो, पण शेतकऱ्याला त्याचा फायदा मिळत नाही. मध्ये दलाल आणि साखळीतील अनेक घटक नफा कमावतात; मात्र अन्न निर्माण करणारा शेतकरी तोट्यात राहतो.आज अनेक शेतकरी कर्जबाजारी आहेत. काही जण शेती सोडत आहेत. अनेक तरुण शेतीकडे पाठ फिरवत आहेत. कारण त्यांना त्यांच्या आई-वडिलांचा संघर्ष दिसतो. वर्षभर कष्ट करूनही हातात काहीच राहत नाही. ही परिस्थिती देशासाठी अत्यंत धोकादायक आहे. कारण शेतकरी संपला तर अन्नसुरक्षा धोक्यात येईल.

आज सरकारने, प्रशासनाने आणि समाजाने एक मूलभूत निर्णय घ्यायला हवा. शेतकऱ्याला कायम नुकसानभरपाई देत राहायचे की त्याला सक्षम बनवायचे?त्यासाठी उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, मुक्त




बाजारपेठ, निर्यात स्वातंत्र्य, प्रक्रिया उद्योग, साठवणूक सुविधा, सिंचन, दर्जेदार बियाणे, संशोधन आणि शेतीला उद्योगाचा दर्जा देणे आवश्यक आहे.

शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे. तो कोणावर उपकार करत नाही; तो संपूर्ण समाजाचे पोट भरतो. त्यामुळे त्याला दयेची नव्हे, न्यायाची गरज आहे.आज प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारावे.देशात अशी परिस्थिती का निर्माण झाली की शेतकरी पिकासाठी नव्हे, तर विम्यासाठी शेती करू लागला?हा प्रश्न फक्त शेतकऱ्यांचा नाही. हा देशाच्या कृषी धोरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि शासन व्यवस्थेचा प्रश्न आहे.

जर आजही आपण या वास्तवाकडे दुर्लक्ष केले, तर उद्या शेती टिकणार नाही, शेतकरी टिकणार नाही आणि अन्नसुरक्षा टिकणार नाही.म्हणूनच आज एकच आवाज बुलंद झाला पाहिजे...

'पिकाचा विमा नव्हे... पिकाला योग्य भाव द्या!नुकसानभरपाई नव्हे... घामाचा योग्य दाम द्या!अनुदान नव्हे... आर्थिक स्वातंत्र्य द्या!शेतकऱ्याला दयेचा विषय बनवू नका, देशाच्या अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवा!'शेतकरी वाचला तरच शेती वाचेल...शेती वाचली तरच देश वाचेल...आणि शेतकरी स्वाभिमानी झाला तरच भारत खऱ्या अर्थाने समृद्ध होईल.

**विलास ताथोड**
राज्य कार्यकारणी सदस्य
शरद जोशी द्वारा स्थापित
शेतकरी संघटना, अकोला
मो. नं. ७०२०५८५२६१

# Jijau Commercial Co-Operative Bank Ltd. Amravati

## JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD. AMRAVATI

### FORM- A

### BALANCESHEET AS ON 31st MARCH 2026

| PARTICULARS | SCHEDULE | AS ON 31-03-2026 | AS ON 31-03-2025 |
|---|---|---|---|
| **CAPITAL & LIABILITIES** | | | |
| Capital | 1 | 175988600.00 | 158002150.00 |
| Reserve & Surplus | 2 | 740581455.31 | 680228462.22 |
| Deposits | 3 | 4973724699.48 | 4452805771.92 |
| Borrowings | 4 | 0.00 | 0.00 |
| Other Liabilities and provisions | 5 | 521130480.89 | 440223962.45 |
| **Total** | | **6411425235.68** | **5731260346.59** |
| ASSETS | | | |
| Cash and Balances with Reserve Bank of India | 6 | 29926299.00 | 26494838.00 |
| Balance with Banks and money at call and short notice | 7 | 335140455.78 | 190278261.13 |
| Investments | 8 | 2316356919.00 | 1977666334.00 |
| Advances | 9 | 3260334442.07 | 3086209667.40 |
| Fixed Assets | 10 | 148521837.65 | 139028061.65 |
| Other Assets | 11 | 313115358.36 | 295866681.59 |
| **Total** | | **6403395311.86** | **5715543843.77** |
| Contingent Liabilities | 12 | **8029923.82** | **15716502.82** |
| Bank Gurantee | | 7694972.00 | 15410452.00 |
| DEAF ACCOUNT | | 334951.82 | 306050.82 |
| **TOTAL** | | **6411425235.68** | **5731260346.59** |

Shri.Harish R.Nashirkar | Shri. Anil Band | Shri. Pradip Chaudhari | Shri. Baharao Aware | Statutory Auditor

I.CEO | Director | Vice Chairman | Chairman | M/s RSVA & Co.

Chartered Accountant C.A.Jagdish B. Shetty M. No. 048042 UDIN: -

## JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD. AMRAVATI

### FORM -B

### PROFIT & LOSS ACCOUNT AS ON 31st MARCH 2026

| S.No | PARTICULARS | SCHEDULE | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | **INCOME** | | | |
| | Interest earned | 13 | 516626197.18 | 452608255.95 |
| | Other Income | 14 | 13971711.51 | 34627569.95 |
| | **Total** | | **530597908.69** | **487235825.90** |
| II | **EXPENDITURE** | | | |
| | Interest expences | 15 | 322174251.64 | 289516653.42 |
| | Operating expences | 16 | 92754815.62 | 86806993.39 |
| | Provisions & contingencies | 17 | 84244289.00 | 79626736.00 |
| | **Total** | | **499173356.26** | **455950382.81** |
| III | PROFIT Net Profit/Loss(-)for the year | | 31424552.43 | 31285443.09 |
| | Add :Transfer from IFR | | | |
| | Profit carried to Balancesheet | | 31424552.43 | 31285443.09 |
| | Profit/Loss brought forward | | | |
| | **Total** | | **530597908.69** | **487235825.90** |
| IV | **APPROPRIATION (Subject to AGM Approval)** | | | |
| | Transfer to Statutory Reserves | | 78,56,138.11 | 78,21,361.09 |
| | Transfer to Other Reserves | | 59,69,554.32 | 76,63,867.00 |
| | Transfer to proposed dividend | | 175,98,860.00 | 158,00,215.00 |
| | Balancesheet carried over to balancesheet | | 0.00 | 0.00 |
| | **Total** | | **314,24,552.43** | **312,85,443.09** |

Shri.Harish R.Nashirkar | Shri. Anil Band | Shri. Pradip Chaudhari | Shri. Baharao Aware | Statutory Auditor

I.CEO | Director | Vice Chairman | Chairman | M/s RSVA & Co.

Chartered Accountant C.A.Jagdish B. Shetty M. No. 048042 UDIN: -

## SCHEDULES

### SCHEDULE-1 CAPITAL

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| | **Authorised Capital** | अधिकृत भाग भांडवल | 250000000.00 | 150000000.00 |
| | (250000/- shares of Rs. 1000/- each) | | | |
| | Subscribe & Paid -up Share Capital :- 1401 Share of Rs. 25/ each & 175954 share of Rs. 1000/- each | वसूल भाग भांडवल | 35025.00<br>175953575.00 | 158002150.00 |
| | **Total** | एकूण | **175988600.00** | **158002150.00** |

### SCHEDULE-2 Reserve & Surplus

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | **Statutory Reserves** | राखीव निधी | **107261399.46** | **97268603.37** |
| | Opening Balance | सुरुवातीची शिल्लक | **97268603.37** | 89975364.20 |
| | Addition during the Year | वर्षभरातील वाढ | 9992796.09 | 7293239.17 |
| | Deductions during the Year | वर्षभरातील कमी | 0.00 | 0.00 |
| II | **Capital reserves** | भांडवल राखीव निधी | **248657664.85** | **216392383.85** |
| | Opening Balance | सुरुवातीची शिल्लक | **216392383.85** | 194791656.85 |
| | Addition during the Year | वर्षभरातील वाढ | 32265281.00 | 4286696.00 |
| | Deductions during the Year | वर्षभरातील कमी | 0.00 | 0.00 |
| III | **Share Premium** | भागावरील प्रीमियम | **0.00** | **0.00** |
| | Opening Balance | सुरुवातीची शिल्लक | 0.00 | 0.00 |
| | Addition during the Year | वर्षभरातील वाढ | 0.00 | 0.00 |
| | Deductions during the Year | वर्षभरातील कमी | 0.00 | 0.00 |
| IV | **Revenue & Other Reserves** | राखीव व इतर निधी | **384662391.00** | **366567475.00** |
| | Opening Balance | सुरुवातीची शिल्लक | **366567475.00** | 326100815.00 |
| | Addition during the Year | वर्षभरातील वाढ | 21157498.00 | 40736660.00 |
| | Deductions during the Year | वर्षभरातील कमी | 3062582.00 | 270000.00 |
| | **(Total- I,II,III & IV)** | एकूण | **740581455.31** | **680228462.22** |
| V | **Balance in Profit & Loss Account** | नफा तोटा पत्रकाची शिल्लक | **31424552.43** | **31285443.09** |
| | **(Total- I,II,III,IV & V)** | एकूण | **772006007.74** | **711513905.31** |

### SCHEDULE-3 Deposits

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| A(I) | **Demand Deposits** | मागणी ठेव | **1091151056.17** | **999637217.76** |
| | (i) From Banks | बँकेचे | 209267648.51 | 205319097.84 |
| | (ii) From Others | इतर बँकेचे | 0.00 | 0.00 |
| II | **Saving Bank Deposits** | बचत ठेवी | 881883407.66 | 794314119.92 |
| III | **Term Deposits** | मुदती ठेवी | | |
| | (i) From Banks | बँकेचे | 3882573643.31 | 3453168554.16 |
| | (ii) From Others | इतर बँकेचे | | |
| | **(Total -I,II & III)** | एकूण | **4973724699.48** | **4452805771.92** |
| B(I) | Deposits of branches in India | भारतातील शाखांचे ठेवी | 4973724699.48 | 4452805771.92 |
| (ii) | Deposits of branches outside India | भारताबाहेरील शाखांचे ठेवी | 0.00 | 0.00 |
| | Total | एकूण ठेवी | **4973724699.48** | **4452805771.92** |

### SCHEDULE-4 Borrowings

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Borrowing in India | भारतातील कर्ज | 0.00 | 0.00 |
| | (a) Reserve Bank of India | रिझर्व बँकेचे कर्ज | 0.00 | 0.00 |
| | (b) Other Banks | इतर कर्ज | 0.00 | 0.00 |
| | © Other Institutional & agencies | इतर संस्थांचे कर्ज | 0.00 | 0.00 |
| II | **Borrowing outside India** | भारताबाहेरील कर्ज | **0.00** | **0.00** |
| | **(Toal - I & II)** | एकूण | 0.00 | 0.00 |
| | **Secured Borrowings included in I & II above** | | | |

### SCHEDULE- 5 OTHER LIABILITIES & PROVISIONS

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Bills Payable | बिल्स पेयेबल | **0.00** | **0.00** |
| II | Inter -Office adjustment (net) | आंतर कार्यालय समायोजन | 0.00 | 0.00 |
| III | **Interest Payable** | देणारे व्याज | **163855887.14** | **110370016.04** |
| | Interest Payable | | 155313877.14 | 101810267.04 |
| | Prov for Excess Priciple Loan | | 2042010.00 | 2059749.00 |
| | Prov for Special Reserve (DTL) | | 6500000.00 | 6500000.00 |
| IV | Others (including provisions) | इतर | **357274593.75** | **329853946.41** |
| i | Income Tax Provision | | 38000000.00 | 18000000.00 |
| ii | Overdue Interest Reserve | | 228799338.66 | 207649366.66 |
| iii | Payslips Payble | | 1259495.00 | 2939548.00 |
| iv | other Liabilities | | 25135562.36 | 30507096.36 |
| v | Sundry | | 24960673.30 | 24062040.30 |
| vi | Bank Guarantee | | 7694972.00 | 15410452.00 |
| vii | Profit | | 31424552.43 | 31285443.09 |
| | **Total** | एकूण | **521130480.89** | **440223962.45** |

### SCHEDULE- 6 CASH & BALANCES WITH RESERVE BANK OF INDIA

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Cash in Hand (Including Foreign current notes) | रोख शिल्लक | 29926299.00 | 26494838.00 |
| II | Balance with Reserve Bank of India | रिझर्व बँकेतील शिल्लक | 0.00 | 0.00 |
| | (a) In current Account | चालू खात्यातील शिल्लक | 0.00 | 0.00 |
| | (b) In Other Account | इतर खात्यातील | 0.00 | 0.00 |
| | **Total (I & II)** | एकूण | **29926299.00** | **26494838.00** |

### SCHEDULE- 7 BALANCE WITH BANKS & MONEY AT CALL & SHORT NOTICE

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | In India | भारतातील | 0.00 | 0.00 |
| (i) | Balance with Banks | बँकेतील शिल्लक | 0.00 | 0.00 |
| | (a) In current Account | चालू खात्यातील शिल्लक | **335140455.78** | **190278261.13** |
| | (b) In Other Deposit Accounts | इतर खात्यातील | 0.00 | 0.00 |
| (ii) | Money at call & short Notice | मनी अॅट कॉल आणि शॉर्ट नोटिस | 0.00 | 0.00 |
| | (a) With Banks | बँकेचे | 0.00 | 0.00 |
| | (b) With Other institutions | इतर संस्थेतील | 0.00 | 0.00 |
| | | एकूण | **335140455.78** | **190278261.13** |
| II | Outside India | भारताबाहेरील | 0.00 | 0.00 |
| | (i) In current Accounts | चालू खात्यातील शिल्लक | 0.00 | 0.00 |
| | (ii) In Other Deposit Accounts | इतर खात्यातील | 0.00 | 0.00 |
| | (iii) Money at call & short Notice | मनी अॅट कॉल आणि शॉर्ट नोटिस | 0.00 | 0.00 |
| | | एकूण | 0.00 | 0.00 |
| | **Total (I & II)** | एकूण | **335140455.78** | **190278261.13** |

### SCHEDULE- 8 INVESTMENTS

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | **Investments in India** | भारतातील गुंतवणूक | | |
| (i) | Government Securities | शासकीय कर्जरोखे | 1359630334.00 | 1162087834.00 |
| (ii) | Other Approved Securities | इतर मंजूर गुंतवणूक | 0.00 | 0.00 |
| (iii) | Shares | भाग | 20000.00 | 20000.00 |
| (iv) | Debentures & Bonds | डिबेंचर्स आणि बॉन्ड | 0.00 | 3958500.00 |
| (v) | Subsidiaries and / or joint Ventures | सहव्यवसायीक किंवा संयुक्त | 0.00 | 0.00 |
| (vi) | Other Investment (Fixed Deposit with Banks) | इतर ठेवी | 956706585.00 | 811600000.00 |
| | Application Money | अॅप्लिकेशन मनी | | |
| | **Total** | एकूण | **2316356919.00** | **1977666334.00** |
| II | Investments outside India | भारताबाहेरील गुंतवणूक | | |
| (i) | Government Securities (including local authorities) | शासकीय कर्जरोखे | | |
| (ii) | Subsidiaries and / or joint Ventures | सहव्यवसायीक किंवा संयुक्त | | |
| (iii) | Other Investment (to be specified) | इतर गुंतवणूक | | |
| | Total | एकूण | | |
| | **Total (I & II)** | एकूण | **2316356919.00** | **1977666334.00** |

### SCHEDULE- 9 ADVANCES

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| A | (i) Bills purchased & discounted | बिल्स परचेस | 0.00 | 0.00 |
| | (ii) Cash credits, overdrafts & loan repayable on demand | रोख मर्यादा, अधिविकर्ष मर्यादा | 592483040.06 | 552222447.36 |
| | (iii) Term Loans | मुदती कर्ज | 2096664057.27 | 2116997569.79 |
| | Other | इतर | 498603843.74 | 351195249.97 |
| | **Total** | एकूण | **3187750941.07** | **3020415267.12** |
| B | (i) Secured by tangible assets | | 23893264.00 | 26096664.00 |
| | (ii) Covered by Bank / Government Guarantees | | 0.00 | 0.00 |
| | (iii) Unsecured | | 48690237.00 | 39697736.28 |
| | Total | | **3260334442.07** | **3086209667.40** |
| C (i) | **Advances in India** | | | |
| (i) | Priority Sectors | | 2259669000.00 | 2175539000.00 |
| | Public Sector | | | |
| (iii) | Banks | | | |
| (iv) | Others | | 1000665442.07 | 910670667.40 |
| | **Total** | | **3260334442.07** | **3086209667.40** |
| C (ii) | **Advances outside India** | | | |
| | (i) Due from Banks | | 0.00 | 0.00 |
| | (ii) Due from Others | | 0.00 | 0.00 |
| | (a) Bills purchased & discounted | | 0.00 | 0.00 |
| | (b) Syndicated Loans | | 0.00 | 0.00 |
| | © Others | | 0.00 | 0.00 |
| | Total | | 0.00 | 0.00 |
| | **Total (C-I & II)** | | **3260334442.07** | **3086209667.40** |

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Premises | | | |
| | At cost as on 31 March of the preceding year | | 80569790.00 | 80569790.00 |
| | Addition during the Year | | 0.00 | 0.00 |
| | Deduction during the Year | | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | | | |
| | Total | | **80569790.00** | **80569790.00** |
| II | **Other Fixed Assets (Including Furniture & Fixtures)** | | | |
| | At cost as on 31 March of the preceding year | | **88458271.68** | 55619801.65 |
| | Addition during the Year | | 9493776.00 | 2838470.00 |
| | Deduction during the Year | | 0.00 | 0.00 |
| | Depreciation to date | | | |
| | Total | | **67952047.68** | **88458271.68** |
| | Total (I & II) | | **148521837.68** | **139028061.68** |

### SCHEDULE- 11 OTHER ASSETS

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Inter - office adjustments (net) | | 0.00 | 0.00 |
| II | Interest accrued | | 36457288.00 | 36824485.00 |
| III | Tax paid in advance & sundry | | 13974840.89 | 14228490.89 |
| IV | Stationary & Stamps | | | |
| V | Non- banking assets acqired in satisfaction of claims | | | |
| VI | Others | | 228803864.66 | 208300256.66 |
| VII | Deferred tax assets | | 33879364.81 | 36513449.04 |
| | **Total** | | **313115358.36** | **295866681.59** |

### SCHEDULE- 12 CONTINGENT LIABILITES

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Claims against the bank not acknowledged as debts | | 0.00 | 0.00 |
| II | Liability for parity paid investments | | 0.00 | 0.00 |
| III | Liability on accounts of outstanding forword exchange contracts | | 0.00 | 0.00 |
| IV | Guarantees given on behalf of constitutes | | 0.00 | 0.00 |
| | (a) In India | | 7694972.00 | 15410452.00 |
| | (b) Outsides India | | 0.00 | 0.00 |
| V | Acceptances, endoresements and other obligations | | 0.00 | 0.00 |
| VI | Other items for which the bank is contingently liable (DEAF) | | 334951.82 | 306050.82 |
| | **Total** | | **8029923.82** | **15716502.82** |

### SCHEDULE- 13 INTEREST EARNED

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Interest on advances | | 382449731.98 | 321282738.64 |
| II | Income on investments | | 134176465.20 | 131325517.31 |
| III | Interest on balances with RBI and others inter- bank funds | | | |
| IV | Others | | | |
| | **Total** | | **516626197.18** | **452608255.95** |

### SCHEDULE- 14 OTHER INCOME

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Commission, exchange & brokerage | कमिशन एक्सचेंज व ब्रोकरेज | 257722.94 | 248917.00 |
| II | Profit on Sale of investements | गुंतवणुकीवरील विक्रीचा नफा | 2647500.00 | 2291250.00 |
| | Loss:-Loss on sales of investments | गुंतवणूक विक्रीवरील तोटा | 0.00 | 0.00 |
| III | Profit on revaluation of investements | गुंतवणूक पुनर्मूल्यांकनावरील नफा | 0.00 | 0.00 |
| | Loss:- Loss on revaluation of investments | गुंतवणूक पुनर्मूल्यांकनावरील तोटा | 0.00 | 0.00 |
| IV | Profit on Sale of land, buildings and others assets. | संपत्ती विकून झालेला नफा | 0.00 | 0.00 |
| | Loss :- Loss on Sale of land, buildings and others assets. | संपत्ती विकून झालेला तोटा | 0.00 | 0.00 |
| V | Profit on exchange transactions | एक्सचेंज व्यवहार नफा | 0.00 | 0.00 |
| | Loss:- Loss on exchange transactions | एक्सचेंज व्यवहार तोटा | 0.00 | 0.00 |
| VI | Income earned by way of dividents, etc from subsidiaries / companies and/o r joint ventures abroad in india | लाभांश द्वारे मिळालेला नफा | 0.00 | 0.00 |
| VII | Miscellaneous income | किरकोळ उत्पन्न | 11066488.57 | 32087402.95 |
| | **Total** | एकूण | **13971711.51** | **34627569.95** |

### SCHEDULE- 15 INTEREST EXPENDED

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | interest on deposits | ठेवीवरील व्याज | 322174251.64 | 289516653.42 |
| II | Interest on Reserve Bank of India / Inter bank borrowings | रिझर्व बँक/आंतर बँक कर्जावरील मिळालेले व्याज | 0.00 | 0.00 |
| III | others | इतर | 0.00 | 0.00 |
| | Total | एकूण | **322174251.64** | **289516653.42** |

### SCHEDULE- 16 OPERATING EXPENCES

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Payments to and provisions for employees | कर्मचाऱ्यांसाठी तरतूद | 47874249.00 | 45075042.00 |
| II | Rent, taxes & lighting | भाडे कर आणि विद्युत खर्च | 14072276.22 | 12179535.69 |
| III | Printing & Stationary | छपाई आणि स्टेशनरी | 895122.26 | 1035350.18 |
| IV | Advertisement and Publicity | जाहिरात आणि प्रसिद्धी | 118860.00 | 108065.00 |
| V | Depreciations on banks property | बँकेच्या मालमत्तेवर घसारा | 0.00 | 0.00 |
| VI | Directors fees, allowances and expenses | संचालकांची फी व भत्ते | 290000.00 | 285000.00 |
| VII | Auditors fees and expenses (Including branch auditors fees) | ऑडिटर फी आणि खर्च | 431238.00 | 834138.00 |
| VIII | Law charges | कायदा खर्च | 1311988.00 | 108537.00 |
| IX | Postage Telegrams telephones etc | टपाल,टेलिग्राम,टेलीफोन | 591257.84 | 649844.54 |
| X | Repairs and Maintenance | दुरुस्ती आणि देखभाल | 345419.00 | 1178453.00 |
| XI | Insurance | विमा | 6579675.80 | 5056938.00 |
| XII | Other Expenditure | इतर खर्च | 20244729.50 | 20296089.98 |
| | **Total** | एकूण | **92754815.62** | **86806993.39** |

### SCHEDULE- 17 PROVISIONS & CONTINGENCIES

| SN | PARTICULARS | विवरण | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|---|
| I | Earn Leave Provision | अर्जित रजा तरतूद | 0.00 | 0.00 |
| II | provision for Standard Assets | उत्कृष्ट जिंदगीवरील तरतूद | 0.00 | 0.00 |
| III | Provision for Reserve for BDDR + BDDR2024 | बीडीडीआर तरतूद | 19157498.00 | 32725071.00 |
| IV | Provision U/S 36 (1) (viii) as per IT | लॉन्ग टर्म फायनान्स तरतूद | 3000000.00 | 4500000.00 |
| V | Provision U/S 36 (1) (viia) as per IT | डीफर्ड टॅक्स तरतूद | 0.00 | 0.00 |
| VI | Investement Depreciation Fund | गुंतवणुकीवरील घसारा तरतूद | 0.00 | 0.00 |
| | **Other** | इतर | **62086791.00** | **42401665.00** |
| | Prov for Income Tax | इन्कम टॅक्स तरतूद | 30500000.00 | 18000000.00 |
| | Prov for Audit Fee | ऑडिट फी तरतूद | 1600000.00 | 1400000.00 |
| | Prov for Bonus | बोनस तरतूद | 3200000.00 | 4500000.00 |
| | Prov for Other Exp | इतर खर्च तरतूद | 1800000.00 | 4920000.00 |
| | Depreciation on Assets | मालमतेवरील घसारा तरतूद | 7261893.00 | 9489481.00 |
| | Provision for Investment Fluctuation Fund | गुंतवणूक चढउतार निधी | 6589200.00 | 1823650.00 |
| | Prov. For Amortised Investment | अमोरटायझेशन निधी | 1622418.00 | 2268534.00 |
| | Prov. For Investment Depreciation Reserve | गुंतवणूक घसारा निधी | 9513280.00 | 0.00 |
| | **Total** | | **84244289.00** | **79626736.00** |

# Jijau Commercial Co-Operative Bank Ltd. Amravati

**Independent Statutory Auditor's Report**
**For the year ended 31st March, 2026**
(Under sec. 31 of the Banking Regulation Act, 1949and Maharashtra Co-Operative Societies Act, 1960, Maharashtra Co-Operative Societies Rules)

**To,**
**The Members, Jijau Commercial Co-operative Bank Ltd.,**
**Amravati.**

**Report on the Financial Statements**

**1.** We have audited the accompanying financial statements of Jijau Commercial Co-Operative Bank Ltd. ('the Bank') as at 31 March 2026, which comprise the Balance Sheet as at 31st March 2026, the Profit and Loss Account for the year then ended, a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of branches and Head Office audited by us are incorporated in these financial statements.

**Management's Responsibility for the Financial Statements**

**2.** The Bank's management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position and performance of the Bank in accordance with:
The Maharashtra Co-operative Societies Act, 1960;
The Banking Regulation Act, 1949 (as applicable to co-operative societies);
Guidelines issued by the Reserve Bank of India;
The accounting principles generally accepted in India including the Accounting Standards issued by the Institute of Chartered Accountants of India, so far as applicable to the Bank.
This responsibility also includes the maintenance of adequate accounting records, safeguarding the assets of the Bank, preventing and detecting frauds and other irregularities, internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error and ensuring compliance with the provisions of the Acts

**Auditor's Responsibility**

**3.** Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

**4.** An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

**Opinion**

**5.** In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us the aforesaid financial statements together with the Notes thereon, subject to our comments and observations given in Appendix I attached and further remarks in

all above and also subject to the remarks of our detailed Audit report (Part A,B,C & Form No., Form No.7 and Long Form Audit Report (LFAR)) of even dated gives the information required by the Banking Regulation Act, 1949 (as applicable to cooperative societies), the Maharashtra Cooperative Societies Act, 1960, the Maharashtra Cooperative Societies Rules, 1961 and guidelines issued by Reserve Bank of India and Registrar of Cooperative societies, Maharashtra in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:
**(a)** In the case of the Balance Sheet, of state of affairs of the Bank as at 31st March-2026;
**(b)** In the case of the Profit and Loss Account, of the profit for the year ended on that date;

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

**6.** The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in accordance with the provisions of section 29 of the Banking Regulation Act, 1949 and provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and the Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

**7.** Subject to the limitations of audit indicated in paragraph 1 to 6 above and subject also the limitation of disclosure required therein, we report that;

**(a)** We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory;

**(b)** In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches;
**(c)** The transactions of the Bank which have come to our notice are within the powers of the Bank;
**(d)** The Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of accounts;
**(e)** The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to Banks except for the following Accounting Standards:
**1.** AS 3 Cash Flow statement prepared by the Bank.
**2.** AS 5 Regarding Discloser of Prior Period Items.
**3.** AS 10 Regarding disclosure of Gross Block of Fixed Assets.
**4.** AS 17 - Segment Reporting.
**5.** AS.22 -Accounting for Taxes on Income.

**8.** The details as required by the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rules 1961 are given in the audit memorandum separately.

**10.** We further report that for the year under audit; the Bank has been awarded 'A' classification.

FOR M/s RSVA & Co.
Chartered Accountants
FRN No.110504W
C.A. Jagdish B. Shetty
Partner
Mem. No.048042
UDIN: - 26048042FYTTCW7742
DATED-22/06/2026
Place: Mumbai

JIJAU COMMERCIAL CO-OPERATIVE BANK LTD. AMRAVATI

NOTES ON ACCOUNTS AS ON 31.03.2026 DISCLOSURE as per RBI Guidelines

| Sr.No | PARTICULARS | AS ON 31.03.2025 | AS ON 31.03.2026 |
|---|---|---|---|
| 01. | Capital to Risk Assets Ratio | 15.71 | 14.20 |
| 02. | Investment in (Govt. Securities /Bonds' Fixed Deposits & Co-op Banks Share) | 19776.66 | 23163.57 |
| 03. | Advance Against | | |
| | a) Real Estate | 5894.84 | 4070.34 |
| | b) Construction Business | | |
| | c) Housing | 3582.13 | 6077.73 |
| 04. | Advance Against Share & Debenture | Nil | Nil |
| | Advance to Directors, Their relatives | Nil | Nil |
| 05. | a) Fund bases | Nil | Nil |
| 06. | Cost Of Deposits | 6.50 | 6.48 |
| 07. | NPA (Audited) | 3645.46 | 4093.47 |
| | a) Gross NPA Amount Percentage | 11.81% | 12.55% |
| | b) Net NPA Percentage | 1.00% | 1.83% |
| 08. | Movement in NPA'S | | |
| | a) Gross NPA | -1.98 | 0.74 |
| | b) Net NPA | -1.69 | 0.83 |
| 09. | Profitability | | |
| | a) % of interest income to working fund | 8.22 | 8.06 |
| | b) % of Non-interest income to working fund | 0.63 | 0.23 |
| | c) % of Operating profit to working fund | 1.84 | 1.76 |
| | d) Return on Assets | 0.58 | 0.49 |
| | e) Business Per Employee (Deposits + Advances) | 739.11 | 791.74 |
| | f) Profit per Employee | 3.06 | 3.02 |
| | g) Cost Of Management | 1.84 | 1.62 |
| | h) CD Ratio | 69.30 | 65.55 |
| 10. | Provision made towards | | |
| | a) NPA'S | 3370.00 | 3561.57 |
| | b) Depreciation in investment | 155.51 | 95.13 |
| 11. | Movement in Provisions | | |
| | a) Towards NPA'S | 327.25 | 191.57 |
| | b) Towards Depreciation on Investment | 0.00 | 0.00 |
| | c) Towards Standard Assets | 0.00 | 0.00 |
| 12. | Foreign Currency Assets & Liabilities | 0.00 | 0.00 |
| 13. | Deposit Insurance Premium paid to DICGC up to | 50.96 | 56.57 |
| 14. | Bank Guarantee (Letters of Credit) Etc. | 154.11 | 76.94 |
| 15. | Net worth | 4017.95 | 3857.54 |

**INVESTMENT PORTFOLIO 2025-26**

| A. Composition of SLR Securities | | B. Composition of Non-SLR Securities | |
|---|---|---|---|
| Details of Securities | Amount | Details of Securities | Amount |
| Govt. Securities | 13596.30 | M.S.CO-OP. BANK MUMBAI (SHARES) | 0.10 |
| | | A.D.C.C. BANK AMT.(SHARES) | 0.10 |
| | | FDR WITH MSC BANK | 500.00 |
| | | FDR WITH HDFC BANK | 16.00 |
| | | FDR WITH BOB | 1451.07 |
| | | FDR WITH IDBI BANK | 100.00 |
| | | FDR WITH INDUSIND BANK | 1400.00 |
| | | FDR WITH SARASWAT CO-OP BANK | 300.00 |
| | | FDR WITH PNB BANK | 1800.00 |
| | | SBI MUTUAL FUND | 400.00 |
| | | AADITYA BIRLA SUNLIFE MUTUAL FUND | 400.00 |
| | | UTI MUTUAL FUND | 400.00 |
| | | ICICI PRU. MUTUAL FUND | 400.00 |
| | | HDFC MUTUAL FUND | 400.00 |
| | | KOTAK MUTUAL FUND | 400.00 |
| | | TATA MUTUAL FUND | 400.00 |
| | | DSP MUTUAL FUND | 400.00 |
| | | AXIS MUTUAL FUND | 400.00 |
| | | BANDHAN MUTUAL FUND | 400.00 |
| | 13596.30 | | 9567.27 |

**Maturity Pattern of Deposit vs Loans and Advances as on balance sheet date(31.3.2026)(Amt in ₹ Lakhs)**

| | | 1 to 14 days | 15 to 28 days | 29 days to 3 mths | 3 mths to 6 mths | 6 mths to 1 year | 1 to 3 years | 3 to 5 years | Above 5 years | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (A) | Liabilities payable | | | | | | | | | |
| 1. | Deposits | 7097.98 | 1670.86 | 7000 | 2000 | 6000 | 16968.40 | 5000 | 4000 | 49737.25 |
| (i) | Fixed Deposit including RD & SSS | 5900 | 1670.86 | 7000 | 2000 | 6000 | 7001.50 | 5000 | 4000 | 38572.36 |
| (ii) | Savings Deposits | 953.50 | | | | | 8581.48 | | | 9534.98 |
| (iii) | Current Deposits including Credit balance in Loan a/c | 244.48 | | | | | 1385.41 | | | 1629.89 |
| (iv) | Other Deposits/Liabilities | | | | | | | | | |
| 2. | Borrowings | 000 | 000 | 000 | 000 | 000 | 000 | 000 | 000 | 000 |
| 3. | Total of 1+2 | 7097.98 | 1670.86 | 7000 | 2000 | 6000 | 16968.40 | 5000 | 4000 | 49737.25 |
| (B) | AssetsRealiable | | | | | | | | | |
| 1. | Loans and advances | 1684.61 | 393.48 | 1158.92 | 2578.09 | 5277.12 | 5810.27 | 3700.82 | 12000 | 32603.34 |
| 2. | Investments in SLR Securities | 000 | 000 | 7183.10 | 000 | 000 | 773.66 | 3021.97 | 2617.56 | 13596.30 |
| 3. | Investments in Non-SLR Securities | | | | | | | | | |
| 4. | Other investment(including FD with other banks) | 4000.20 | 300 | 1631.06 | | 3636 | | | | 9567.26 |
| | Total of 1+2+3+4 | 5684.81 | 693.48 | 9973.08 | 2578.09 | 8913.12 | 6583.93 | 6722.79 | 14617.56 | 55766.90 |
| | Difference in B-A | 1413.17 | 977.38 | 2973.08 | 578.09 | 2913.12 | 10384.47 | 1722.79 | 10617.56 | 6029.65 |

STATEMENT 3
NAME OF THE BANK -JIJAU COMMERCIAL CO-OP BANK AMRAVATI
AUDITED CLASSIFICATION OF EXISTING NON PERFORMING ASSETS
AS ON 31/03/2026
CLASSIFICATION OF ASSETS PROVISIONING MADE AGAINST NPA AS ON MARCH 31,2026

| CLASIFICATION OF ASSE | | NO OF A/C | AMOUNT OUTSTANDING | PERCENTAGE OF COL.3TO TOTAL LOAN OUTSTANDING | PROVISION REQUIRD TO BE MADE % AMOUNT | | EXISTING PROVISION AT THE BEGINNING OF THE YEAR | PROVISIONING MADE DURING THIS YEAR UNDER REPORT | PROVISION AS AT THE END OF THE YEAR | REMARK |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| ADVANCES OF WHICH | | 4774 | 32603.34 | 100 | | | 3370.00 | 191.57 | 3561.57 | |
| A | STANDARDS A | 4492 | 28509.87 | 87.44 | 0.40 | 114.04 | | | | |
| B | NON-PERFORMING ASSETS | | | | | | | | | |
| 1 | SUB-STANDARD | 86 | 1888.72 | 5.79 | 20 | 377.74 | | | | |
| | SECURED | 73 | 1878.02 | 5.76 | | 375.60 | | | | |
| | UNSECURED | 13 | 10.70 | 0.03 | 100 | 10.70 | | | | |
| 2 | DOUBTFUL | | | | | | | | | |
| i | UPTO 1 YEAR | 27 | 800.06 | 2.45 | 30 | 240.01 | | | | |
| | A.SECURED | 23 | 798.54 | 2.45 | | 239.56 | | | | |
| | B.UNSECURED | 4 | 1.52 | 0 | 100 | 1.52 | | | | |
| ii | ABOVE 1 YEAR | 54 | 592.2 | 1.82 | 30 | 177.66 | | | | |
| | A.SECURED | 45 | 578.08 | 1.77 | | 173.42 | | | | |
| | B.UNSECURED | 9 | 14.12 | 0.04 | 100 | 14.12 | | | | |
| iii | ABOVE 3 YEAR | 115 | 812.49 | 2.49 | 100 | 812.49 | | | | |
| | A.SECURED | 80 | 784.04 | 2.40 | | 784.04 | | | | |
| | B.UNSECURED | 35 | 28.45 | 0.09 | | 28.45 | | | | |
| TOTAL DOUBTFULL ASSESTS(i+ | | 196 | 2204.75 | 6.76 | | | | | | |
| | A.SECURED | | | | | | | | | |
| | B.UNSECURED | | | | | | | | | |
| 3 | LOSS ASSETS | 4 | 216.11 | 0.66 | 100 | 216.11 | | | | |
| GROSS NPA &GROSS PROVISIO | | 282 | 4093.47 | 12.55 | | 1239.71 | 3370.00 | 191.57 | 3561.57 | |
| NET NPA | | | 531.90 | 1.83 | | | | | | |
| 4.INTT NOT COLLECTED | | | | | | | | | | |
| GROSS NPA AS(1+2+3) | | 282 | 4093.47 | 1.83 | | 1239.71 | 3370.00 | 191.57 | 3561.57 | |
| FOR | | | | | | | | | | |

# भटक्या-विमुक्ताच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने अधिक जबाबदारी वाढली-मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड



'**ही** केवळ नियुक्ती नाही, तर देशभरातील २५ कोटी विमुक्त, भटक्या व अर्धभटक्या समाजाच्या न्याय, हक्क आणि सक्षमीकरणासाठीची मोठी जबाबदारी आहे,' अशा शब्दांत नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष तथा मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांनी आपले मत व्यक्त केले.

शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व शिवसेना युवा नेते खासदार श्रीकांत शिंदे यांनी देशभरात खितपत पडलेल्या व अजूनही राहायला घर नसलेल्या भटक्या व विमुक्त जातीच्या उत्थानासाठी भरीव कार्य करण्याची इच्छा बोलून दाखवली. 'मी त्या समाज घटकातून येत असल्यामुळे आणि त्या प्रश्नाची जाण असल्यानेच माझ्यावर मोठ्या विश्वासाने जबाबदारी टाकली असावी. माझी ही नियुक्ती अभिमानाची असली तरी कर्तव्य पूर्ण करण्याची आहे,'असे ना. राठोड यांनी नियुक्तीनंतर झालेल्या मुलाखतीत सांगितले.

'आज हा समाज देशभर झोपड्या व पालांमध्ये राहतो. अजूनही बहुतांश लोकांकडे साधे ओळखपत्र नाही. त्यामुळे सर्वांना सोबत घेऊन आमच्या नेत्यांना अभिप्रेत असे काम करायचे आहे,' अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

**'शिंदे साहेबांच्या मनात दुर्लक्षित समाज मुख्य प्रवाहात आला पाहिजे'**

नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना ना. राठोड म्हणाले, 'मा. एकनाथराव शिंदे साहेबांच्या मनात हा दुर्लक्षित समाज मुख्य प्रवाहात आला पाहिजे व त्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, ही अत्यंत स्पष्ट आणि ठाम भूमिका आहे. मी स्वतः बंजारा समाजातून येत असल्यामुळे माझ्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.'

**२५ कोटींचा समाज, पण वंचितच**

देशात भटक्या-विमुक्त समाजाची संख्या अंदाजे २५ कोटी तर महाराष्ट्रात सुमारे २ कोटी आहे. बंजारा, पारधी, बेरड,बेस्तर, भामटा,कंजारभाट, पालपारधी, राजपारधी, रामोशी, वाघरी, छप्परबंद, वडार, कैकाडी, गोसावी, भराडी, भुते,चित्रकथी,गोंधळी, गोपाळ, हेळवे,जोशी,काशीकापडी ,मसनजोगी, मैराळ, पांगूळ, रावळकोल्हाटी, डोंबारी, नंदीवाले, वैदू, वासूदेव, भोई, बहुरूपी, ओतारी, मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले, गिहरा/गहरा,गुसाई/गोसाई, मदारी, गारूडी, सापवाले व जादूगर, गवळी, दरवशी, अस्वलवाले, बागडी, बेलदार, शिकलगार यांसह अनेक जाती जमातींचा या प्रवर्गात समावेश होतो.

मुलाखत

'हा समाज केवळ संख्येने मोठा नाही, तर देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक संरचनेतील महत्त्वाचा घटक आहे. मात्र आजही हा समाज शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवास, जातप्रमाणपत्र आणि मूलभूत सुविधांपासून वंचित आहे,' अशी खंत ना. संजय राठोड यांनी व्यक्त केली.

**इतिहास आणि संघर्ष**

'१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांविरुद्ध लढल्यामुळे ब्रिटिशांनी १८७१ मध्ये `Criminal Tribes Act' लावून या समाजाला जन्मजात गुन्हेगार ठरवले. १९५२ मध्ये पंडित नेहरूंनी हा काळा कायदा रद्द केला. तोच आमच्या समाजाचा दुसरा स्वातंत्र्य दिन आहे,' असे ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रमुख हेर बहिर्जी नाईक, चित्रकथी समाजाचे दौलतराव भोसले, तसेच मुख्यमंत्रीपदी पोहोचलेले वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक यांच्या कार्याचा उल्लेख करत राठोड यांनी, 'त्यांनी आश्रम शाळा सुरू केल्या नसत्या तर आपण इथपर्यंत आलोही नसतो,' अशी कृतज्ञता व्यक्त केली.

**पुढील दिशा: संघटन, सक्षमीकरण, प्रतिनिधित्व**

नियुक्तीनंतरचा रोडमॅप स्पष्ट करताना ना. राठोड म्हणाले,'माझी पहिली प्राथमिकता म्हणजे विमुक्त-भटके समाजाचे संघटन मजबूत करणे. प्रत्येक राज्य, जिल्हा आणि तालुक्यात संघटन उभे करून युवक,महिला व सुशिक्षित वर्गाला नेतृत्वात आणणार.'

'शिक्षण, रोजगार, आरक्षण, जातप्रमाणपत्र आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांवर शासन स्तरावर पाठपुरावा करावा लागेल. घरांसाठी स्वतंत्र गृहनिर्माण योजना, वसतिगृहे, शिष्यवृत्ती वाढवू आणि जात प्रमाणपत्राची प्रक्रिया सोपी करू,' असे ठोस आश्वासन त्यांनी दिले.

**'ही नियुक्ती निवडणुकीसाठी नाही'**

राजकीय हेतूबद्दल विचारलेल्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडताना ते म्हणाले, 'ही नियुक्ती कोणत्याही निवडणुकीसाठी नाही. अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या विमुक्त व भटक्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही जबाबदारी दिली आहे. विरोधकांचे काम बोलणे आहे, आमचे काम परिणाम देणे आहे. आम्ही कामातून उत्तर देऊ.'

**'मी सर्वांचा प्रतिनिधी'**

'बंजारा समाजाला जास्त प्राधान्य मिळेल का?' या प्रश्नावर ते ठामपणे म्हणाले, 'तसे काही नाही. भटक्या-विमुक्त जातीमधील प्रत्येक समाज माझ्यासाठी समान आहे. मी संपूर्ण विमुक्त, भटक्या आणि अर्धभटक्या समाजाचा प्रतिनिधी म्हणून काम करणार आहे.'

**'स्वातंत्र्यसैनिकांचे वंशज आहोत'**

'आम्ही गुन्हेगार नाही, आम्ही स्वातंत्र्यसैनिकांचे वंशज आहोत. आम्ही भटके नाही, आम्ही भारत घडवणारे आहोत,' असे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, 'ब्रिटिश काळात आमच्या समाजाने ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते. म्हणूनच त्याकाळी १८७१ चा गुन्हेगारी कायदा लावून सेटलमेंटमध्ये ठेवले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी आम्ही विमुक्त झालो, परंतु त्यावेळी या समाजाचे पाहिजे तसे पुनर्वसन झाले नाही.'

'नंतर १९६५ मध्ये मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या काळात 'टीएनटी'साठी प्रवेश व नोकरीमध्ये ४ टक्के राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या. पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या कार्यकाळात 'ओबीसी 'संवर्गासाठी मंडल आयोग नेमला.त्या आयोगातील एक सदस्य श्री. एल. आर. नाईक यांनी या समाजासाठी स्वतंत्र राखीव जागा ठेवल्या पाहिजे. भटक्या-विमुक्त समाज ध्ँ मधील जातींबरोबर स्पर्धा करू शकणार नाही, असे या अहवालात त्यांनी 'डिसेंट नोट' लिहिली आहे.''यानंतर बाळकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. त्यानंतर भिकू इधाते आयोग नेमला. दोन्ही आयोगांनी केंद्र सरकारला अहवाल सुपूर्द केला, परंतु शिफारशी स्वीकारल्या नाहीत. नंतर रोहिणी आयोग नेमला गेला. याबाबत सर्वसमावेशक बैठक घेऊन भूमिका ठरवू. भटके-विमुक्त समाजातील ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, विचारवंत यांच्याशी विचारविनिमय करू,' असेही ना. संजय राठोड यांनी सांगितले.

**-मोहन राठोड**
निवृत माहिती संचालक,पुणे

# कल्पक्कम येथील हायड्रोजन निर्मिती केंद्र:क्रांतीकारी

**पा**ण्यातून वीज न वापरता फक्त उष्णतेच्या जोरावर इंधन तयार करणे शक्य आहे का? भारताने कल्पक्कमच्या समुद्रकिनाऱ्यावर नेमकी अशीच एक अशक्य वाटणारी किमया करून दाखवली आहे.जगाच्या पाठीवर आजवर जे कोणालाच जमले नाही, ते भारताच्या अणू वैज्ञानिकांनी प्रत्यक्षात आणले आहे. तामिळनाडूतील कल्पक्कम येथे जगातील पहिल्या अणू ऊर्जेच्या उष्णतेवर चालणाऱ्या हायड्रोजन निर्मिती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले आहे. या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण जगात भारताची मान अभिमानाने उंच झाली आहे.पण हे नेमके कसे घडले? पाणी आणि अणूभट्टीच्या उष्णतेतून हे स्वच्छ इंधन कसे तयार झाले? चला, ही रंजक गोष्ट समजून घेऊया.

आजच्या घडीला हायड्रोजन हे भविष्यातील सर्वात स्वच्छ इंधन मानले जाते, कारण जेव्हा हायड्रोजन जळतो, तेव्हा प्रदूषणाऐवजी फक्त पाणी बाहेर पडते. पण आजवर हा हायड्रोजन तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विजेचा वापर करावा लागायचा. या पद्धतीला इलेक्ट्रोलिसिस म्हणतात. यामध्ये पाण्यातून वीज प्रवाहित करून हायड्रोजन आणि ऑक्सिजन वेगळे केले जातात. परंतु ही पद्धत अत्यंत महागडी आहे आणि यासाठी प्रचंड वीज लागते.

भारताने या पारंपरिक वाटेला फाटा देत एक पूर्णपणे नवीन मार्ग निवडला. कल्पक्कम येथील आपल्या वैज्ञानिकांनी पाण्याच्या रेणूंना थेट विजेचा झटका न देता, अणूभट्टीच्या प्रचंड उष्णतेचा वापर करायचे ठरवले.पण पाण्याच्या जिद्दी स्वभावामुळे हे काम सोपे नव्हते. पाण्याला थेट उष्णतेने वेगळे करायचे तर ८०० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची भट्टी लागते. मग आपल्या वैज्ञानिकांनी यावर काय तोडगा काढला असेल?



येथेच काम आले भाभा अणुसंशोधन केंद्राने (BARC) विकसित केलेले कॉपर-क्लोरीन सायकल नावाचे अनोखे तंत्रज्ञान. कल्पक्कमच्या शास्त्रज्ञांनी कॉपर (तांबे) आणि क्लोरीनच्या संयुगांना मध्यस्थ म्हणजेच मदतीसाठी वापरले. हे रासायनिक मध्यस्थ पाण्याचे थेट विभाजन न करता, काही सोप्या टप्प्यांमध्ये एका बाजूला हायड्रोजन आणि दुसऱ्या बाजूला ऑक्सिजन अगदी अलगदपणे वेगळे करतात. यामुळे कमी तापमानात आणि जास्त कार्यक्षमतेने हायड्रोजन तयार होतो.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारी अणू उष्णता पुरवली भारताच्या गेल्या ४० वर्षांपासून कार्यरत असलेल्या फास्ट ब्रीडर टेस्ट रिएक्टरने (FBTR). या अणूभट्टीत पाण्याचा वापर न करता द्रवरूप सोडियम धातूचा वापर केला जातो, जो ही प्रचंड उष्णता हायड्रोजन प्लांटपर्यंत पोहोचवतो.तुम्हाला वाटेल की हे तंत्रज्ञान कागदावर किंवा लॅबमध्ये आधीही उपलब्ध असेल, तर मग हा जगातील पहिलाच प्रयोग कसा ठरला?

कागदावर किंवा प्रयोगशाळेत एखादी गोष्ट करणे आणि ती प्रत्यक्षात एका मोठ्या कार्यरत अणूभट्टीला जोडून कारखाना चालवणे, यात अथांग समुद्राएवढे अंतर असते. लॅबमध्ये यशस्वी झालेले प्रयोग मोठ्या प्रमाणावर करताना पाईप्स गंजणे, उष्णतेचे योग्य वहन न होणे आणि रसायनांचे बदलते वर्तन अशा अनेक इंजिनिअरिंग आव्हानांचा सामना करावा लागतो. भाभा अणुसंशोधन केंद्र (BARC) आणि इंदिरा गांधी सेंटर फॉर ॲटॉमिक रिसर्च (IGCAR) च्या भारतीय अभियंत्यांनी ही सर्व आव्हाने लीलया पेलत हा कारखाना यशस्वीपणे सुरू करून दाखवला. हाच तो इंजिनिअरिंगचा चमत्कार आहे ज्यामुळे भारत जगात पहिला ठरला.

आता विचार करा, या एका यशामुळे भारताचे आणि जगाचे भविष्य कसे बदलणार आहे? याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सातत्य. सूर्य मावळला की सौर ऊर्जा थांबते, वारा थांबला की पवन ऊर्जा थंडावते; पण आपली अणूभट्टी २४ तास अविरत चालते. याचा अर्थ आपल्याला अखंडपणे स्वच्छ हायड्रोजन मिळत राहील. भविष्यात जेव्हा हे तंत्रज्ञान व्यावसायिक पातळीवर वापरले जाईल, तेव्हा पोलाद (Steel), खते (Fertilizers) आणि तेल शुद्धीकरण यांसारख्या प्रचंड प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना कार्बनमुक्त करणे भारताला सहज शक्य होणार आहे. आपली एक संपूर्ण हैड्रोजनवर चालणारी ट्रेन नुकतीच धावली हे लक्षात असेलच .

भारताच्या तीन टप्प्यांच्या अणू ऊर्जा कार्यक्रमात आजवर आपण फक्त वीज निर्मितीचा विचार करत होतो. परंतु कल्पक्कमच्या या प्रकल्पामुळे अणू ऊर्जेचा वापर आता थेट देशाच्या इंधन स्वातंत्र्यासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी होणार आहे. हा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेला एक क्रांतीकारी टप्पा आहे.

**संतोष कारखानीस**

# भारतीय विवाहसंस्थेसमोर आव्हानाचा काळ

**हे** किती जणांच्या पचनी पडेल माहिती नाही मात्र लिहिले पाहिजे.सिया गोयलने तिच्या वाग्दत्त वराचा खून केला त्याचे मुख्य कारण सांगितले की, केतनला टक्कल होते.तो विग घालायचा.शिवाय बोलताना तो हकलायचा. तिची लाईफस्टाईल आणि सेलिब्रेशन पार्टीजकडे असणारा कल ह्यात केतनचे कुटुंब मेळ खात नव्हते. त्याच्या आईने तिला बजावले होते की लग्नानंतर पार्टीज बंद! त्याचे फिजिक आणि त्याचे दिसणे, त्याचे फिचर्स ह्यांचा तिला प्रॉब्लेम होता असे म्हणण्यापेक्षा या बाबतीत तिच्या काही अपेक्षा होत्या ज्यात तो फिट बसत नव्हता.

दोन्ही कुटुंबे चिक्कार श्रीमंत होती तरीही तिचे कुटुंब आणि त्याचे कुटुंब ह्यात आर्थिक तफावत अफाट होती, केतनचे कुटुंब सियाच्या कुटुंबापेक्षा दसपटीने श्रीमंत होते!तिच्या वडिलांना, आर्थिक आधार आणि सर्कल ह्यांचे वेध होते तर तिला त्यात शून्य इंटरेस्ट होता. तिचे अफेयर ज्याच्यासोबत होते, तो तिच्या कुटुंबाच्या समान पातळीवरचा होता; तिला जे मेल फिचर्स हवे होते ते त्याच्यात होते. आपण आई वडिलांना आपल्या नाराजीविषयी सांगितले तर त्यांची स्वप्ने तुटतील, ते दुःखी होतील आणि आयुष्यभर त्याचे खापर आपल्यावर फुटेल हे तिला नको होते.

कालपरवा पर्यंत अनेक जणांनी लिहिले की,ती खून करायला तयार झाली मात्र आईवडिलांना सांगायची तिची हिंमत झाली नाही; असे काहीही नव्हते!तिची हिंमत कुठेही कमी पडली नाही, तिने आपल्यावर आईवडिलांच्या दुःखाचे ब्लेम येऊ नयेत म्हणून थंड डोक्याने त्याला संपवले.आता ती आणि तिचा प्रियकर एकमेकावर सूत्रधार असल्याचा आरोप करत आहेत. ती स्वतःला सूत्रधार म्हणवत नसली तरी तिचे स्टेटमेंट्स बोल्ड आहेत,तिने चौकशीत जे काही सांगितले आहे ते धक्कादायक आहे! तिच्यासाठी त्याचे मन, त्याच्या भावना अथवा प्रेम इतके महत्वाचे नव्हते! त्याचे बाह्यरूप त्याचे फिजिक आणि त्याची पर्सनॅलिटी तिला महत्वाची होती.

आजकाल मोठ्या शहरातल्या कमावत्या स्त्रिया, मुली ह्यांच्या आपल्या जोडीदाराविषयीच्या ज्या अपेक्षा आहेत त्यात काही ॲडिशन्स बोल्डली ॲड झाल्या आहेत त्या म्हणजे पार्टनर स्ट्रॉंग असला पाहिजे, त्याचा परफॉर्मन्स चांगला असला पाहिजे.त्याचे दिसणे आणि त्याचे व्यक्तिमत्व उठून दिसणारे असले पाहिजे. बाकी गोष्टी काय कधीही कमावता येतील मात्र ह्या गोष्टी एखाद्याच्या स्ट्रक्चरमध्ये घालता येत नाहीत असे त्या स्पष्ट सांगतात. ह्या मुद्याविषयी ज्या अतिशय टोकाला जाऊन कठोर ठाम असतात त्या सियासारखी कृती करतात.

मागील दशकात स्त्रियांनी, मुलींनी आपल्या नवऱ्याचे, प्रियकराचे मित्राचे खून करण्याच्या जितक्याही घटना उघडकीस आल्या आहेत त्यातील बहुतांश प्रकरणाच्या मुळाशी ह्या भावना दिसतात. हवा तसा आणि हवे ते सुख देणारा जोडीदार हवाय असे आता त्या उघड उघड सांगू लागल्यात. साधारणपणे मेट्रो सिटीजमध्ये जे घडते ते मध्यम आकारांच्या शहरात दशकात रुजलेले असते आणि मध्यम शहरांमधून लहान शहरांत हे लोण अवघ्या दोन पाच वर्षात पसरते. तेच लोण खेड्यापाड्यात झिरपायला आणखी पाचेक वर्षे लागतात. म्हणजेच आवडीच्या जोडीदारासाठी नात्यातल्या पुरुषाला मारायची ही प्रवृत्ती गावाकडे येत्या दशकात दिसू लागेल.

खरेतर अनादी काळापासून पुरुषांनी ह्याच कारणावरून अगणित स्त्रियांना संपवले आहे, स्त्रियांनीही ह्यापूर्वी खूनखराबे केले आहेत,कारस्थाने केली आहेत,आवडत्या पुरुषासाठी वैर पत्करले आहे; मात्र आताची गोष्ट वेगळी आहे.आता त्यांच्या काही गोष्टी क्लिअर झाल्यात. त्या बाबतीत नवी पिढी तर अगदीच ठाम आहे. पार्टनर बेडमध्ये किती टाइम तग धरतो इथंपर्यंत ही पिढी स्पष्ट आहे. अशी आईवडिलांनी ठरवलेली लग्ने आता कालबाह्य होत जातील हे मी वेगळे सांगायला नको.

'आमचे आम्ही बघून घेऊ आणि निस्तरू',ही वृत्ती वाढताना दिसते.भारतीय विवाहसंस्थेसाठी हा मोठा आव्हानाचा काळ ठरेल. ड्रम, फ्रिज, विहीर, धारदार हत्यार, नदी, विष, समुद्र, लेथ मशीन, पर्वतकडा अशी साधनांची यादी वाढतच चाललीय.अशा घटना नकळत नव्या पिढीला दोन्ही बाजूंचे मुद्दे ध्यानात आणून देत असतात. पर्यायाने निश्चय निर्धार आणखी ठाम होत जातील आणि हा मार्ग आपणही वापरून बघायला हरकत नाही हा विचार बळावत जाईल.

एकवेळ अशी येईल की, आता जी पिढी दोन चार वर्षांची आहे ती जेव्हा विशीत असेल तेव्हा त्यांचे पालक आताच्या जेन झेड पिढीपैकीच असतील! जे आता ह्या मार्गाची मेढ रोवत आहेत, ते आपल्या इतके आकांडतांडव करणार नाहीत. ते इझीली एक्सेप्ट करतील, खळखळ न करता!तेव्हा आपल्या मतांना कालबाह्य ठरवत त्यांना काडीची किंमत नसेल हे आताच गृहीत धरलेले बरे! काळाचे हे चक्र आहे, त्याची दिशा ठरवणाऱ्या ह्या घटना सोशल टर्माँईलच्या नोंदी म्हणून टिपल्या जातील इतकेच ह्यांचे महत्व असेल. मुक्त स्वातंत्र्य असणाऱ्या देशात कसे बदल घडत गेले आणि दर दोन पिढ्यांच्या अंतराने तिथल्या लोकांनी त्याला कसे आपलेसे केले हे पाहणे हितावह ठरेल. त्यातून काही बोध घेतला तर समाजाचे थोडे तरी भले होईल!डिजिटल युगाचे फायदे तोटे केवळ डिजिटल मानकात मोजून चालणार नाही; बदलत्या काळासोबत येणाऱ्या सामाजिक परिवर्तनाच्या काही अनिवार्य लाटांसाठी दारे बंद करता येणार नाहीत कारण ही दारे आपण पूर्वीच सताड उघडी ठेवली आहेत!

**समीर गायकवाड**

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग:पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

**रा**ज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे.सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (DLC) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये




वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे.

कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे.आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे.लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल,या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**-काशीबाई थोरात-धायगुडे**(वरिष्ठ सहायक संचालक)
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला
जिल्हा विशेष

# दलित वस्ती निधीवरून मनपा पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

## 'पूर्ण २२.५० कोटी खर्च करा ; अन्यथा मनपाला 'ताला ठोको' आंदोलन'

● गजानन कांबळे यांचा इशारा
● स्थायी समिती सभापतींवर गंभीर आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेला दलित वस्ती सुधार योजनेसाठी शासनाकडून मंजूर झालेला संपूर्ण २२ कोटी ५० लाख रुपयांचा निधी संबंधित दलित वस्तींवर खर्च करण्यात यावा. निधीत कोणतीही कपात अथवा अन्यायकारक वाटप झाल्यास महानगरपालिकेविरोधात तीव्र 'ताला ठोको' आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा समाजसेवक तथा नगरसेविका पती गजानन कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

कांबळे यांनी स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांच्यावर गंभीर आरोप करत, दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीत कपात करण्यात आल्याचा दावा केला. या संदर्भात जाब विचारण्यासाठी सभागृहात गेल्यानंतर समाधानकारक उत्तर देण्याऐवजी सभापतींकडून अर्वाच्य भाषेचा वापर करण्यात आला, असा आरोपही त्यांनी केला. स्थायी समितीचे सभापती हे संवैधानिक पद



असून त्या पदाला अशा प्रकारची भाषा शोभणारी नसल्याची टीकाही त्यांनी केली.

मागासवर्गीय समाजासाठी आरक्षित असलेल्या प्रभाग क्रमांक १८ मधून त्यांच्या पत्नी नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. या प्रभागात २९ हजार १८९ नागरिक वास्तव्यास असून त्यापैकी ५ हजार ७१२ नागरिक अनुसूचित जातीचे आहेत. या प्रभागासाठी १ कोटी ४१ लाख २९ हजार १२८.९४ रुपयांचा निधी मंजूर असून शासनाच्या निकषानुसार समान व न्याय्य निधीचे वाटप होणे आवश्यक असल्याची मागणी त्यांनी केली. शासनाने मंजूर केलेला संपूर्ण निधी दलित वस्तींवर खर्च न झाल्यास व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी युवराज भागवत, रोहित वानखडे, विनोद गोपनारायण, निल इंगोले, राहुल इंगोले, हर्षदीप कांबळे, संकेत कांबळे, राहुल म्हस्के आदी उपस्थित होते.

### दोन निलंबित सुरक्षा रक्षकांना सेवेत घ्या

स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनी दोन सुरक्षा रक्षकांना तातडीने निलंबित केल्याचा आरोप करत, त्यांचे निलंबन त्वरित मागे घेण्याची मागणीही कांबळे यांनी केली. यासंदर्भात मनपा आयुक्तांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले असून, निलंबनाचा निर्णय मागे न घेतल्यास या प्रश्नावरही जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

# पावसाळी आपत्तीला तोंड देण्यासाठी मनपाची रणनिती तयार

## निष्काळजी अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■



पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिका प्रशासनाने सज्जतेचा बिगुल वाजविला आहे. महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्या पुढाकाराने आणि मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या उपस्थितीत सोमवारी विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी झोननिहाय चार स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन पथके २४ तास कार्यरत ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला.

पावसाळ्यात शहरात पाणी साचणे, झाडे कोसळणे, पथदिवे बंद पडणे, पाणीपुरवठा विस्कळीत होणे अशा समस्यांवर तातडीने मात करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये स्वतंत्र पथक कार्यरत राहणार आहे. या पथकांना आवश्यक असलेले सर्व साहित्य तातडीने खरेदी करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील साचलेले पाणी उपसण्यासाठी जनरेटरवर चालणारे पंप उपलब्ध करून देणे, पडलेली झाडे हटविण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये ट्री कटरची व्यवस्था करणे, विहिरींवर संरक्षणात्मक जाळ्या बसविणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी शहरातील पाणी साचणाऱ्या रस्त्यांचे तातडीने सर्वेक्षण करून स्क्रॅपिंगसाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले. 'आपत्ती व्यवस्थापनात निष्काळजीपणा अथवा कामचुकारपणा करणाऱ्या कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याची गय केली जाणार नाही,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना नागरिकांच्या तक्रारींची वाट न पाहता स्वतः दररोज क्षेत्रभेटी घेण्याचे आदेश दिले. बंद पथदिवे, अरुंद नाले, धापे तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा अडविणारे अडथळे तातडीने दूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्व स्वच्छता निरीक्षकांनी नाल्यांची साफसफाई आणि शहर स्वच्छतेची कामे युद्धपातळीवर राबवावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.या बैठकीस उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेते पवन महल्ले, नगरसेवक नितीन ताकवाले, प्रशांत जोशी, अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिवृष्टीचा तडाखा; चरणगावची शेती खरडली, शेतकरी संकटात



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चरणगाव परिसरात २७ जून रोजी सायंकाळी झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फेरले आहे. मुसळधार पावसामुळे अनेक शेतांतील पेरलेली शेती खरडून गेली असून बियाणे वाहून गेल्याने दुबार पेरणीचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पातूर तहसीलदारांकडे निवेदन सादर करून तातडीने पंचनामे करण्यासह नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांनी बँका व खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे उचलून सोयाबीन, कापूस आणि अन्य पिकांची पेरणी केली होती. मात्र अवघ्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने शेतांतील माती वाहून गेली, बियाणे पाण्याबरोबर वाहून गेले आणि उगवणीपूर्वीच अनेक शेतांतील पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे पुन्हा पेरणी करण्यावाचून पर्याय नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.

वाढते उत्पादन खर्च, महागडी बियाणे, खतांच्या वाढलेल्या किमती आणि कर्जाचा बोजा यामुळे आधीच अडचणीत असलेल्या

### दुबार पेरणीचे संकट गडद; पंचनामे व तातडीच्या मदतीसाठी तहसीलदारांना निवेदन

शेतकऱ्यांवर आता दुबार पेरणीचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. त्यामुळे शासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकाकडून त्वरित पंचनामे करून प्रत्यक्ष नुकसानाची नोंद घ्यावी, शासनाकडून तातडीची आर्थिक मदत मंजूर करावी तसेच दुबार पेरणीसाठी विशेष अनुदान देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. चरणगाव परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने प्रशासनाने विलंब न करता मदत प्रक्रिया सुरू करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# दुचाकीच्या अपघातात युवकाचा जागीच मृत्यू

## सावरगाव झरंडी मार्गावरील घटना : दोघे गंभीर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत सावरगाव झरंडी मार्गावरील वळणावर दुचाकी चालकाचा नियंत्रण सुटल्याने अपघातात सावरगाव येथील २५ वर्षीय आकाश शेषराव शिंदे ,याचा जागीच मृत्यू झाला तर झरंडी येथील अजय चोंडकर, व किरण लढाड हे दोघे गंभीर जखमी झाले आहे. ही घटना सोमवारी २९ जून रोजीच्या दुपारी चार वाजताच्या सुमारास घडली.

आकाश शिंदे दुचाकीने सावरगावहून झरंडी येथे कामानिमित्त गेला होता. काम आटोपून घरी परत येत असताना झरंडी येथील दोन जण त्याच्या दुचाकीवर बसलेले होते. सावरगाव झरंडी दरम्यान वळणावर चालक आकाश शिंदे याचा दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला कोसळून



अपघात झाला. या अपघातात सावरगाव येथील आकाश शिंदे यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे, बीट जमादार दिनेश झटाळे, देशमुख बाप्पु, शिवानंद स्वामी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालय अकोला येथे पाठविले आहे. तसेच दोघे गंभीर जखमींना सुद्धा चान्नी पोलिसांनी उपचारासाठी अकोला येथे पाठविले. पुढील तपास चान्नी पोलीस करीत आहे.

## सुमिरमा फाउंडेशनच्या रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**अकोला :** रक्तदान हे जीवनदान आहे.या सूत्रास अनुसरून सामजिक व मानवीय सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिरास रक्तदात्याचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.स्थानीय जि प रोड वरील फाउंडेशनच्या कार्यालय परिसरात फाउंडेशनच्या अध्यक्ष व नेत्र रोग तज्ञ डॉ पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या पुढाकारात मार्गदर्शक व जेष्ठ समाजसेवी रमाकांत खेतान यांच्या मार्गदर्शनात संपन्न या शिबिरात समाजातील विविध युवकांनी सहभाग घेत रक्तदान केले.

# 'एक विद्यार्थी – एक झाड' अभियानाची तालुकाभर अंमलबजावणी करा

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रहार संघटनेचे तहसीलदारांना निवेदन



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

वाढते तापमान, अनियमित पाऊस, घटती भूजल पातळी आणि वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला असून, यावर प्रभावी उपाययोजना म्हणून तालुक्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये 'एक विद्यार्थी – एक झाड' अभियान सक्तीने राबविण्यात यावे, अशी मागणी प्रहार संघटनेचे अकोला जिल्हा महासचिव तथा छत्रपती शंभूराजे प्रतिष्ठानचे संस्थापक राजेश पाटील खारोडे यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये, ग्रामपंचायती, शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी 'झाडे लावा – झाडे जगवा' ही मोहीम लोकचळवळ म्हणून राबवावी, असे नमूद करण्यात आले आहे. 'एक नागरिक – एक झाड' हा संकल्प प्रत्येकाने स्वीकारून केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या

### वृक्षारोपणासोबत संगोपनावर भर

प्रत्येक रोपाचे संगोपन करण्यावरही विशेष भर देण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रत्येक शाळा व महाविद्यालयात सक्तीचे वृक्षारोपण, झाडांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र समित्यांची स्थापना, पर्यावरण जनजागृती रॅली, वृक्षदिंडी, व्याख्याने तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी राजेश पाटील खारोडे म्हणाले, 'आज झाडे वाचवली तरच उद्याचे जीवन सुरक्षित राहील. वृक्षारोपण हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता प्रत्येक लावलेले रोप जगविण्याची जबाबदारी समाजाने स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि नागरिकांनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्यासच हरित भवितव्य घडू शकते.' दरम्यान, तहसील प्रशासनाने या मागण्यांची सकारात्मक दखल घेऊन तालुकाभर व्यापक पर्यावरण संवर्धन अभियान तातडीने राबवावे, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.

## मराठी अस्मिता हा मनसेचा अजेंडा

**अकोला :** जिल्ह्यात विस्कटलेली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांची घडी सशक्त करून पक्ष बांधणीला अग्रक्रम देण्यात येणार असून जिल्ह्यात पक्षाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश सरचिटणीस तथा अकोला जिल्हा संपर्क अध्यक्ष हेमंत गडकरी यांनी दिली. स्थानीय शासकीय विश्रामगृहात शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मनसेच्या आगामी कार्यक्रमांची माहिती दिली.

### जाहीर सुचना

दि.२९.६.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मे. रेणुकाई मोबाईल तर्फे प्रो.प्रा. श्री नितेश मनोहर पवार यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे चिखली ता. चिखली जि बुलढाणा येथील सर्वे क्र ८५/२-ए. मधील मंजूर लेआऊट प्लॉट क्र १०. बाबतचे आधीचे दि ९.५.२०२४, दस्त क्र. ३८६०, दि ९.१.२०२४, दस्त क्र. ३११ व दि २०.८.२०२०, दस्त क्र. ३७४४ हे मुळ खरेदीखत हरवले / अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
शिशिर अरविंद देशपांडे
अधिवक्ता दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो ९८२३०९१३७७

**Change In Name**

I have Change
My Name Form
**MOHMAD SHABBIR AYYUB AMDANI**
-to-
**SHABBIR AYYUB AMDANI**
My passport Number - N4322195
My residential Address in
Plot no 1, Anand nagar
Akola 444001

**Change In Name**

I have Change
My Name Form
**YASEEN SHAIKH KASAM SHAIKH**
-TO-
**SHAIKH YASEEN SHAIKH KASAM**
Passport No-E7787981
My residential Address in
Chhbnama nagar, near
nasir kirana shop,
Khair mohammad plot
Akola 444001.

# मुंडगावात गटाराच्या पाण्याचा विळखा; शाळकरी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर संकट

## मंदिर, शाळा व बँक परिसरात साचलेल्या दूषित पाण्यामुळे नागरिक संतप्त; ग्रामपंचायतीविरोधात दुर्लक्षाचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील संतनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथे मंदिर, शाळा आणि बँक परिसरात गटाराचे दूषित पाणी साचल्याने परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या समस्येकडे ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

मुंडगावातील सोपीनाथ महाराज मंदिर, श्रीकृष्ण महाराज मंदिर, सेंट्रल बँक, जिल्हा परिषद शाळा आणि इंग्रजी कॉन्व्हेंट शाळा परिसरातील मोकळ्या जागेत मोठ्या प्रमाणात गटाराचे पाणी साचले आहे. या मार्गावरून दररोज शेकडो विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची ये-जा होत असते. मात्र साचलेल्या पाण्यामुळे रस्ता अक्षरशः बंद होण्याची वेळ आली असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दूषित



पाण्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत असून डेंग्यूसह इतर साथीच्या आजारांचा धोका वाढला आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून तातडीने स्वच्छता मोहीम राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे. या गंभीर समस्येबाबत ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सैय्यद नजाकत तसेच पदाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. दरम्यान, गावात अवैधरित्या आणण्यात आलेल्या गौण खनिजाचा योग्य वापर करून हा भाग भरून काढण्याची संधीही दवडल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात ही समस्या अधिक तीव्र होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायतीने तातडीने साचलेले दूषित पाणी काढून परिसराची स्वच्छता करावी, रस्त्याची दुरुस्ती करावी आणि शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मुंडगावातील नागरिकांनी केली आहे.

# आठवड्यात प्रश्न निकाली काढा; अन्यथा मनपात अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसू देणार नाही!

## आ. साजिद खान पठाण यांचा प्रशासनाला निर्वाणीचा इशारा; आयुक्तांसमोर शहरातील समस्यांचा पाढा

■ प्रतिनिधी | अकोला ■

पहिल्याच पावसात अकोला महानगरपालिकेच्या विकासकामांचे आणि नालेसफाईच्या दाव्यांचे अक्षरशः पितळ उघडे पडल्याने संतप्त झालेल्या पश्चिम अकोला मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी सोमवारी कॉँग्रेसच्या नगरसेवकांसह थेट मनपा आयुक्तांची भेट घेत प्रशासनाला धारेवर धरले. शहरातील रस्ते, नालेसफाई, भूमिगत गटार योजनेतील अनागोंदी आणि नागरिकांच्या हालअपेष्टांचा मुद्दा आक्रमकपणे मांडत, 'आठवड्याच्या आत सर्व प्रश्न निकाली काढा; अन्यथा संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या खुर्चीवर बसू देणार नाही,' असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला.

मनपा आयुक्तांच्या दालनात झालेल्या बैठकीत आमदार पठाण यांनी शहरातील विविध भागांतील गंभीर समस्या मांडल्या. पहिल्याच पावसात अनेक प्रभागांमध्ये नाल्यांचे पाणी थेट नागरिकांच्या घरात शिरल्याने प्रशासनाच्या नालेसफाईच्या दाव्याची



पोलखोल झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक ठिकाणी चिखलाचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाल्याची तीव्र नाराजी त्यांनी व्यक्त केली.

भूमिगत गटार योजनेअंतर्गत ज्या रस्त्यांच्या बांधकामासाठी कोणताही निधी मंजूर नाही, असे रस्तेही कंत्राटदाराने खोदून ठेवले आहेत. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या बेजबाबदार कारभाराची गंभीर दखल घेत संबंधित कंत्राटदाराला तातडीने समज द्यावी, विनाकारण रस्ते खोदण्यास मज्जाव करावा आणि खोदलेल्या रस्त्यांच्या पुनर्बांधणीसाठी त्वरित प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करावा, अशी मागणी त्यांनी केली. तोपर्यंत नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी अशा रस्त्यांवर तातडीने मुरूम टाकून वाहतुकीयोग्य करण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी प्रशासनाला केली.

याशिवाय शहरातील अनेक नाल्यांची सफाई अपुरी राहिल्यामुळे पावसाचे पाणी थेट घरांमध्ये घुसत असल्याचा मुद्दा उपस्थित करत, सर्व नाल्यांची युद्धपातळीवर पुन्हा स्वच्छता करण्यात यावी तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी नवीन आउटलेटची निर्मिती करण्यात यावी, असे निर्देशही आमदार पठाण यांनी दिले. यावर मनपा आयुक्तांनी सर्व बाबी गांभीर्याने ऐकून घेत चार दिवसांच्या आत संबंधित समस्या सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र, आश्वासनांची पूर्तता झाली नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल आणि निष्क्रिय अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या खुर्च्यांवर बसू दिले जाणार नाही, असा स्पष्ट आणि सणसणीत इशारा आमदार पठाण यांनी बैठकीनंतर दिला. या बैठकीला मनपाचे झोन अधिकारी, पाणीपुरवठा विभाग, स्वच्छता विभागासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच कॉँग्रेसचे नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २०३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नियमांना तिलांजली देत उभारली नेत्रा आयची टोलेजंग इमारत

## फ्रन्ट साईड मार्जिनच गिळले रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरातील बॅचलर रोड इंदिरा मार्केट परिसरात उभारण्यात आलेल्या सात मजली नेत्रा आय हॉस्पिटलच्या बांधकामावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, रुग्णालयासारख्या संवेदनशील इमारतीचे बांधकाम करताना फ्रन्ट तसेच उत्तर आणि दक्षिण बाजूचे आवश्यक मार्जिनच गिळल्याचा ठपका स्वतः नगरपालिकेने ठेवला आहे, एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष बांधकाम आणि मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या सुधारित नकाशात तफावत आढळल्याने पालिकेने परवानगीच नाकारली आहे, तरीही संबंधितांवर अद्याप ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाची सुई फिरू लागली आहे.

वास्तुविशारद अनुराग पशिने यांच्या देखरेखीत विनोद अदलखिया यांच्या मालकीची ही तब्बल २४.४६ मीटर उंचीची विशेष श्रेणीतील सात मजली इमारत उभारण्यात आली आहे नियमानुसार आवश्यक असलेली समोरील मोकळी जागा उत्तर बाजूची ५.४ मीटर आणि दक्षिण बाजूची ५.८ मीटर साईड मार्जिन न सोडताच बांधकाम करण्यात आल्याचा आक्षेप नोंदविण्यात आला आहे मागील जिन्याचाही उतार नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात आल्याचे निरीक्षणात स्पष्ट झाले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे वाहनतळात दुसऱ्या रुग्णवाहिकेसाठी आवश्यक जागाच उपलब्ध नाही, पार्किंगमध्ये पुरेसे व्हेंटिलेशन नसल्याचा आक्षेप असून तळमजल्याची उंचीही नियमांपेक्षा कमी असल्याचे समोर आले आहे पुढील संरक्षण भिंतीची उंचीही यूडीसीपीआर नियमांचे उल्लंघन करणारी असल्याचा आरोप आहे त्यामुळे आग किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दलाच्या वाहनांना प्रवेश मिळणेही कठीण होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या नियमबाह्य बांधकामाला पालिकेने परवानगी नाकारली असून प्रकरण सध्या नागपूर येथील नगररचना सहसंचालकांकडे अपीलमध्ये प्रलंबित आहे सहसंचालकांचा निर्णय आल्यानंतर परवानगी नाकारली गेल्यास नियमबाह्य बांधकामावर हातोडा चालविण्यासह दोषी वास्तुविशारदावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल अशी माहिती मुख्याधिकारी विजय देशमुख यांनी दिली आहे.

मात्र प्रश्न असा की पालिकेने स्वतः गंभीर अनियमितता



नोंदवूनही आजवर कारवाई का केली नाही रुग्णांच्या सुरक्षिततेशी थेट संबंधित असलेल्या या प्रकरणात प्रशासनाची ही संथ भूमिका अनेक प्रश्न निर्माण करत आहे आता नगररचना सहसंचालकांचा निर्णय काय येतो आणि नियमांना हरताळ फासणाऱ्यांवर खरोखरच कारवाई होते की पुन्हा एकदा सर्व काही कागदावरच राहते याकडे संपूर्ण वर्ध्याचे लक्ष लागले आहे.

# व्यसनाच्या विळख्याविरोधात गिरड पोलिसांची धडक मोहीम; दुचाकी रॅलीतून जनजागृती

**समुद्रपूर/जनमाध्यम**

अमली पदार्थांचे वाढते व्यसन हे समाजासमोरील गंभीर आव्हान ठरत असून त्याच्या विळख्यात अडकणाऱ्या तरुणांचे भविष्य धोक्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर गिरड पोलिस ठाण्याच्या वतीने शुक्रवारी अमली पदार्थविरोधात दुचाकी जनजागृती रॅली काढून व्यसनमुक्त समाजाचा संदेश देण्यात आला.

गिरड पोलिस ठाण्यातून निघालेल्या रॅलीला पोलिस निरीक्षक विकास गायकवाड, मोहगाव ग्रामपंचायतीचे प्रशासक विलास नवघरे, पत्रकार गजानन गारघाटे आणि पोलिस उपनिरीक्षक गोमेद पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर गिरडसह परिसरातील विविध गावांतून रॅली काढण्यात आली.

रॅलीदरम्यान पोलिस अधिकारी, कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान आणि पोलिस



पाटील यांनी अमली पदार्थांविरोधातील घोषणाबाजी करत नागरिकांमध्ये जनजागृती केली.

युवकांनी व्यसनापासून दूर राहावे, पालकांनी आपल्या पाल्यांवर लक्ष ठेवावे तसेच अमली पदार्थांची विक्री किंवा तस्करीची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले.यावेळी पोलिस निरीक्षक विकास गायकवाड यांनी अमली पदार्थांची विक्री, साठवणूक किंवा तस्करी करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी पोलिस प्रशासनासोबत नागरिकांचे सक्रिय सहकार्यही तितकेच आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या जनजागृती रॅलीत पोलिस अधिकारी, कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान, परिसरातील पोलिस पाटील तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. समाजातील तरुणाईला व्यसनाच्या विळख्यातून दूर ठेवून सुरक्षित, सुदृढ आणि व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

## संक्षिप्त

### धुऱ्याच्या वादातून शेतकऱ्यास मारहाण

**पुलगाव**-शेतीच्या धुऱ्यावर निंदणाचा कचरा टाकल्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. निमगाव धांदे शेतशिवारात तुकाराम धांदे वय ६६ हे शेतात निंदणाचे काम सुरू असताना मजुरांनी निंदणाचा कचरा धुऱ्यावर टाकला. यावरून शेजारील शेतकरी नीलेश गावंडे याने संताप व्यक्त करत तुकाराम धांदे यांच्याशी वाद घातला. दोघांमध्ये आधीपासूनच धुऱ्याच्या सीमारेषेवरून वाद सुरू असल्याचे सांगितले जाते. वाद वाढताच नीलेश गावंडे याने शिवीगाळ करत तुकाराम धांदे यांना मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. परिसरात या घटनेची चर्चा सुरू असून शेतजमिनीच्या वादातून तणाव वाढल्याचे दिसून आले.

### वाहन चालवण्याच्या कारणावरून दगडाने हल्ला

**हिंगणघाट**-भरधाव दुचाकी चालवण्याच्या कारणावरून संत ज्ञानेश्वर वार्डात दोन गटांमध्ये वाद होऊन दगडफेक व मारहाणीची घटना घडली. योगेश धोंगडे वय ३५ याला नयन राडे व त्याच्या दोन मित्रांनी दगडाने मारहाण करून जखमी केल्याची तक्रार पोलिसांत दाखल झाली. दुसरीकडे नयन राडे याने दिलेल्या तक्रारीत योगेश धोंगडे हा नेहमी भरधाव दुचाकी चालवत असल्याने लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी त्याला वाहन हळू चालवण्याची सूचना केली होती. याचा राग आल्याने योगेशनेच दगडाने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून पोलिसांनी परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल केले असून घटनेचा तपास सुरू आहे.

### गांजासह साडेतीस हजारांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा**-शहर पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करत गांजा विक्री करणाऱ्या संजय पांडे वय ३६ रा इतवारा याला अटक केली. आरोपीकडून एक किलो २७५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत २४ हजार ७८० रुपये आहे. याशिवाय विक्रीतून मिळालेले १० हजार २६० रुपये रोख व अन्य साहित्य असा एकूण ३५ हजार ३९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अंमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी ही कारवाई केली. आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली आहे. शहरात अंमली पदार्थांविरोधातील कारवाया आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### दहशत माजवणारा जेरबंद

**समुद्रपूर**-सार्वजनिक ठिकाणी धारदार शस्त्रे घेऊन फिरत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या गजानन खंडाळे वय ३३ रा परडा याला समुद्रपूर पोलिसांनी अटक केली. पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करत आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून एक धारदार चाकू व तलवार जप्त करण्यात आली.

# आमदारांच्या मतदारसंघातच गंगापूर स्मशानभूमीविना ग्रामस्थांचा संताप

## वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रश्न प्रलंबित खासदारांकडे पुन्हा साकडे

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील गंगापूर गावात आजही स्मशानभूमीसाठी जागा नसल्याने ग्रामस्थांना अंत्यसंस्कारासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. स्मशानभूमीसाठी जागा शेड आणि स्ट्रीट लाईटची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन महाजन यांनी ग्रामस्थांच्या वतीने वर्धा जिल्ह्याचे खासदार अमर काळे यांच्याकडे आजनसरा येथे श्री संत भोजाजी महाराजांच्या चरणी भेट घेऊन निवेदनाद्वारे केली.

गंगापूर हे कार्यसम्राट आमदार समीर कुणावार यांच्या विधानसभा मतदारसंघातील गाव असतानाही आजपर्यंत गावाला स्मशानभूमीची सुविधा मिळालेली नाही. या प्रश्नाबाबत आमदार समीर कुणावार यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी अखेर खासदार अमर काळे यांच्याकडे निवेदन देत प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. त्यावेळी खासदारांनी प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. मात्र ते आश्वासनही अद्याप पूर्ण झाले नसल्याने गंगापूर गावाची



मागणी नेमकी कधी पूर्ण होणार असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की गंगापूरमध्ये स्मशानभूमीसाठी राखीव जागा नसल्याने पावसाळा उन्हाळा आणि हिवाळ्यातही नागरिकांना शेतात किंवा मिळेल त्या ठिकाणी अंत्यसंस्कार करावे लागतात. अनेकदा योग्य जागा उपलब्ध नसल्याने मृतदेह घरी ठेवण्याची वेळ येते. त्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या मानसिक आणि सामाजिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.सन २०१५ २०१६ मध्ये स्मशानभूमी शेडसाठी शासनाने निधी मंजूर केला होता. मात्र जागा उपलब्ध नसल्याने तो निधी शासनाकडे परत गेला. सध्या जिल्हा वार्षिक योजनेतून चार लाख रुपयांचा निधी मंजूर असूनही जागेअभावी काम रखडले आहे.

या प्रश्नाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले वन विभाग नायब तहसीलदार विजय पवार तसेच इतर संबंधित प्रशासनाकडेही अनेक वेळा निवेदने देण्यात आली. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. आता तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी गंगापूरच्या या मूलभूत प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्मशानभूमीसाठी जागा शेड आणि स्ट्रीट लाईटची सुविधा उपलब्ध करून देणार का याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**समुद्रपूर** - चंद्रपूरहून जामकडे दुचाकीने जात असताना अज्ञात वाहनाच्या धडकेत प्रवीण पवार वय ३३ हे गंभीर जखमी झाले. गोविंदपूर फाट्याजवळ सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. धडक इतकी जोरदार होती की दुचाकीचे मोठे नुकसान झाले आणि प्रवीण पवार रस्त्यावर फेकले गेले. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य पुराव्यांच्या आधारे वाहनाचा शोध घेण्याचे काम सुरू असून आरोपीचा लवकरच माग काढला जाईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# सेलू रेल्वे स्थानकाजवळ ३४.८१ कोटींचा उड्डाणपूल मंजूर

## खा.अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**वर्धा/जनमाध्यम**

नागपूर वर्धा रेल्वे मार्गावरील सेलू रेल्वे स्थानकाजवळ सुकळी रोडवर ३४ कोटी ८१ लाख रुपयांचा रेल्वे उड्डाणपूल मंजूर झाला आहे. रेल्वे विभागाने याबाबत मंजुरी देत जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू केली असून



संकल्पचित्रालाही मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांचा अनेक वर्षांचा प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.सुकळी रोडवरील रेल्वे फाटक वारंवार बंद राहत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रेल्वे लाईनच्या पलीकडे शेती असलेल्या शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत होती. तसेच शाळकरी विद्यार्थी रुग्ण आणि अन्य नागरिकांनाही शहरात ये जा करताना मोठा विलंब सहन करावा लागत होता. विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत आणि गर्भवती महिलांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने परिसरातील नागरिकांनी खासदार अमर काळे यांच्याकडे उड्डाणपुलाची मागणी केली होती.

खा. अमर काळे यांनी या मागणीची दखल घेत रेल्वे विभागाकडे पत्रव्यवहार करत सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर रेल्वे विभागाने रेल्वे किलोमीटर ७७७ २४ २६ या ठिकाणी विद्यमान रेल्वे क्रॉसिंग हटवून ३४ कोटी ८१ लाख रुपयांचा उड्डाणपूल मंजूर केला. २५ जून रोजी रेल्वे विभागाने याबाबतची माहिती खासदारांना दिली आहे.

# आर्वीत अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली

## युवकांना व्यसनमुक्तीचा दिला संदेश



**आर्वी/जनमाध्यम**

आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आर्वी शहरात अंमली पदार्थांच्या वाढत्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. पोलीस स्टेशन येथून रॅलीला प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याजवळ रॅलीचा समारोप करण्यात आला.

रॅलीदरम्यान अंमली पदार्थांपासून दूर राहा, व्यसनमुक्त समाज घडवा असा संदेश देण्यात आला. विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्यसनमुक्त समाजासाठी जनजागृतीची शपथ घेतली.

यावेळी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अरुण पावडे यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, कुटुंबातील तणाव आणि सामाजिक अधोगती याविषयी मार्गदर्शन केले. युवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता शिक्षण, क्रीडा आणि सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करून समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला पोलीस उपविभागीय अधिकारी चंद्रशेखर ढोले, पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर, अनिल जोशी, राजाभाऊ तेलरांधे, अरुण ढोक, प्रा. रमेश जवजाळ, प्रमोद नांगरे, हरदेव साठे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.रॅलीत रेडक्रॉस सोसायटी शाखा आर्वी,आर्वी तालुका पत्रकार संघटना, मदत फाउंडेशन, गांधी विद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, शालेय वाहनचालक, पोलीस कर्मचारी, होमगार्ड आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर यांनी उपस्थितांचे आभार मानत अंमली पदार्थमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने जनजागृतीच्या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले.

# शब्दांचा पाऊस, कृतीचा दुष्काळ : हिंगणघाटला अपर जिल्हाधिकारी कार्यालय कधी?

## आमदार कुणावारांनी दिलेल्या जिल्ह्याच्या आश्वासनाचा जनतेचा हिशेब सुरू

**हिंगणघाट/जनमाध्यम**

पावसाळी अधिवेशनात राज्य शासनाने ११ अपर जिल्हाधिकारी कार्यालये आणि ६७ अपर तहसील कार्यालयांच्या स्थापनेसंदर्भात सूचना व हरकती मागविण्याचा निर्णय घेतला. मात्र, या यादीत हिंगणघाटचा समावेश नसल्याने शहरात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भौगोलिक, औद्योगिक आणि महसुली दृष्ट्या सक्षम असलेल्या हिंगणघाटकडे पुन्हा एकदा दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधी पक्षाचे आमदार नाना पटोले यांनी विधानसभेत हिंगणघाट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्यावेळी महसूल मंत्र्यांनी विशेष बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर स्थानिक आमदार समीर कुणावार यांनी या बैठकीसाठी पुढाकार का घेतला नाही, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत टाका ग्राउंडवर आणि इतर सार्वजनिक व्यासपीठांवर आमदार समीर कुणावार यांनी हिंगणघाटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.

दोन वेळा जनतेसमोर दिलेल्या या शब्दाची पूर्तता अद्याप झालेली नसल्याने आता नागरिकांकडून जाब विचारला




जात आहे. निवडणुकीत दिलेले आश्वासन केवळ मतांसाठी होते की प्रत्यक्षात त्यासाठी पाठपुरावा होणार, असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे.

चंद्रपूर जिल्ह्याची सीमा अवघ्या १५ किलोमीटरवर तर नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमा सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या हिंगणघाटला आजही छोट्या प्रशासकीय कामांसाठी जिल्हा मुख्यालयाचे खेटे मारावे लागतात. त्यामुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याची भावना वाढत आहे.

हिंगणघाट उपविभागात भविष्यात अल्लीपूर, सिंदी रेल्वे आणि मांडगाव या भागांना तहसीलचा दर्जा मिळाल्यास हा संपूर्ण परिसर स्वतंत्र जिल्ह्यासाठी सक्षम ठरू शकतो. अशा परिस्थितीत केंद्रस्थानी अपर जिल्हाधिकारी कार्यालय असणे अत्यावश्यक असल्याचे मत विविध संघटना आणि नागरिक व्यक्त करत आहेत.

जिल्हा सत्र न्यायालय, प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, औद्योगिक विकास, टेक्सटाईल पार्क, कापूस बाजारपेठ, जिनिंग, ऑईल मिल, दाल मिल आणि सोयाबीन उद्योगांमुळे हिंगणघाट महसुली उत्पन्नात जिल्ह्यात आघाडीवर आहे.

एवढी क्षमता असूनही प्रशासकीय स्वायत्तता न मिळणे हा या भागावरील अन्याय असल्याची भावना अधिक तीव्र झाली आहे.

नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांनी आता स्थानिक आमदारांनी मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांची तातडीने बैठक घेऊन हिंगणघाटसाठी अपर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर करून घ्यावे, अशी जोरदार मागणी केली आहे. केवळ आश्वासनांची आतषबाजी नको, तर प्रत्यक्ष निर्णय हवा. निवडणुकीपूर्वी दिलेल्या शब्दाला जागून हिंगणघाटला प्रथम अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि त्यानंतर स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा मिळवून द्यावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा स्थानिक नागरिक आणि विविध संघटनांनी दिला आहे.

# भरधाव दुचाकीच्या धडकेत एक जखमी

**सिंदी रेल्वे**-भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने मागून धडक दिल्याने शौकत शेख रमजान हे जखमी झाले. भोसा येथून सिंदी रेल्वेकडे जात असताना शिवमंदिराजवळ ही घटना घडली. शौकत शेख आपल्या दुचाकीने जात असताना मागून आलेल्या अनिल भोसकर यांच्या दुचाकीने जोरदार धडक दिली. अपघातात शौकत शेख यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. तक्रारीच्या आधारे सिंदी पोलिसांनी अनिल भोसकर यांच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिस पुढील तपास करत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २१३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# परतवाड्यात अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा दणका

## ३५ लाखांच्या ट्रकसह मुद्देमाल जप्त, दोघांना अटक

**परतवाडा/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलिसांच्या डीबी पथकाने अवैध रेती वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत १६ चाकी ट्रकसह एकूण ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत ट्रक चालक व सहचालकाला अटक करण्यात आली असून ट्रक मालक फरार असल्याने त्याचा शोध सुरू आहे.

अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना अवैध धंदे, रेती चोरी व अवैध रेती वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार परतवाडा पोलीस ठाण्याचे डीबी पथक २८ जूनच्या मध्यरात्री गस्त घालत असताना गोपनीय माहितीदारामार्फत एमएच-१२-यूएम-०००३ क्रमांकाचा १६ चाकी ट्रक अवैधरित्या रेती घेऊन मुघलाईपुरा परिसरातील गुलजार कॉलनीकडे येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.



या माहितीच्या आधारे डीबी पथकाने गुलजार कॉलनी परिसरात सापळा रचला. काही वेळातच संशयित ट्रक तेथे आल्यानंतर पोलिसांनी तो थांबवून चालक मोहम्मद इम्तीयाज मोहम्मद युसुफ (वय ४९, रा. गुलजार कॉलनी, परतवाडा) तसेच सहचालक गजानन गोंडुजी शेळके (रा. मोगरदा, ता. धारणी) यांना ताब्यात घेतले. वाहनाची तपासणी केली असता ट्रकमध्ये सुमारे १० ब्रास पिवळी रेती आढळून आली. या रेतीची किंमत सुमारे एक लाख रुपये असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी चालकाकडे रेतीची रॉयल्टी व वाहतूक परवान्याची मागणी केली असता कोणतीही वैध कागदपत्रे सादर करता आली नाहीत. त्यामुळे ही रेती चोरट्या मार्गाने वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी ट्रकसह रेती जप्त केली.

या कारवाईत सुमारे ३४ लाख रुपये किमतीचा १६ चाकी ट्रक आणि एक लाख रुपयांची १० ब्रास रेती असा एकूण ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४३९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियमाच्या कलम ९ व १५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात येणार असून फरार ट्रक मालक शोएब खान अख्तर खान (रा. टिचर कॉलनी, परतवाडा) याचा पोलीस शोध घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरेश म्हस्के, सपोनि. सलीम शेख तसेच डीबी पथकातील सचिन होले, सुधीर राऊत, सचिन कोकने, जितेश बाबील, घनश्याम किरोले व शुभम शर्मा यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# ग्रामपंचायतीची अतिक्रमणांवर धडक कारवाई

## -कांडली मार्ग मोकळा, पोलीस बंदोबस्तात मोहीम

**परतवाडा/प्रतिनिधीः-** कांडली मार्ग तसेच लगतच्या खाजगी भूखंडावर अनेक वर्षांपासून करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर ग्रामपंचायत प्रशासनाने सोमवार, दि. २९ रोजी पोलीस बंदोबस्तात धडक कारवाई करत परिसर अतिक्रमणमुक्त केला. यावेळी अनेक छोट्या व्यावसायिकांनी प्रशासनाच्या कारवाईपूर्वीच स्वतःहून आपली अतिक्रमणे हटविल्याने कारवाई शांततेत पार पडली.

कांडली मार्गावरील सार्वजनिक जागा तसेच खाजगी भूखंडावर काही छोट्या व्यावसायिकांनी अनधिकृतपणे अतिक्रमण करून व्यवसाय सुरू ठेवला होता. त्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते, तसेच परिसराचे नियोजनही विस्कळीत होत होते. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीने संबंधित अतिक्रमणधारकांना यापूर्वीच नोटिसा देऊन अतिक्रमणे स्वतःहून हटविण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सूचनेची मुदत संपल्यानंतर सोमवार, दि. २९ रोजी ग्रामपंचायत प्रशासनाचे अधिकारी जेसीबीसह घटनास्थळी दाखल झाले. पोलीस बंदोबस्तात सकाळपासूनच अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली. कारवाईची गंभीरता लक्षात घेऊन अनेक व्यावसायिकांनी कोणताही वाद न घालता स्वतःहूनच आपली अतिक्रमणे काढून घेतली. उर्वरित अतिक्रमणे जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आली.



या कारवाईमुळे कांडली मार्ग मोकळा झाला असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. भविष्यात सार्वजनिक रस्ते व इतर जागांवर अनधिकृत अतिक्रमण केल्यास अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा ग्रामपंचायत प्रशासनाने दिला आहे.

या कारवाईदरम्यान विस्तार अधिकारी ईश्वरदास सातंगे, ग्रामपंचायत अधिकारी विनोद मोरे, प्रशासकीय मंडळाचे सदस्य तसेच मोठा पोलीस बंदोबस्त उपस्थित होता. संपूर्ण कारवाई शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

# अप्पर वर्धा मच्छी केंद्रावर चोरट्यांचा डल्ला

## -लाखोंचे साहित्य गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील अप्पर वर्धा धरण परिसरातील झिरो पॉईंट मच्छी संकलन केंद्रावर चोरट्यांनी हात साफ करत तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीचे साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद घनश्याम साहु (वय ४७, रा. जवाहरनगर, मोर्शी) हे अप्पर वर्धा येथील झिरो पॉईंट मच्छी संकलन केंद्रात मत्स्य व्यवसाय करतात. व्यवसायासाठी आवश्यक साहित्य त्यांनी तेथील टिनाच्या शेडमध्ये सुरक्षित ठेवले होते. मात्र अज्ञातरीत्या तेथील साहित्य चोरीस गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली.

चोरीमध्ये १ लाख २० हजार रुपये किमतीचे १३५ फायबर कॅरेट तसेच २० हजार रुपये किमतीचे मच्छी मोजणीसाठी वापरले जाणारे ११ लोखंडी काटे असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल गायब झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी चेतन वासुदेव सुरजुसे (वय ३०), बाबुराव अमझरे (वय ४५) दोघे रा. राजुरा बाजार, नितीन ठाकरे (वय ४०, रा. हातुर्णा), सचिन (रा. बोरगाव बेडा, साहुर, जि. वर्धा) तसेच अन्य एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मत्स्य व्यवसायाशी संबंधित साहित्य चोरीला गेल्याने मच्छी व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान झाले असून, चोरीस गेलेला मुद्देमाल आणि आरोपींचा शोध घेण्यासाठी मोर्शी पोलीस पुढील तपास करीत आहेत.


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:** ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९


## सार्वजनिक जाहीर नोटीस

सार्वत्रिक लोकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील **सौ.वृंदा अरविंद राजूरकर,** वय ६१ वर्षे, व्यवसाय-गृहिणी, रा.वल्लभ नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे सोबत **१) विश्वास वसंत सिलगरे,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजुरी, **२) मालती विश्वास सिलगरे,** वय ४० वर्षे, व्यवसाय - गृहिणी, दोघेही रा.एम.आय.डी.सी.रोड, जनता कॉलनी, साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी दिनांक ०६.०७.२०२१ रोजी दस्त अ.क्र.३८७०/२०२१ नुसार खरेदी केलेला व तेव्हा त्यांचे एकमेव मालकी व ताब्यातील प्लॉट विकण्याचा सौदा केला असून त्या प्लॉटचे वर्णन पुढील प्रमाणे--

**मिळकतीचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीचे हद्दीतील मौजे आकोली, प्र.बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.६१/१ मधील जमिनीतील ३ हे.६८ आर जमिनीतील सहा.संचालक नगर रचना अधिकारी, मनपा अमरावती यांचे आदेश क्र.११६/१९९६ नुसार लेआऊट मंजूर झालेल्या व वि.जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं./एन.ए.पी.३४/अकोली-४२/१९९६-९७ नि.ता.१२.११.१९९७ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील खुला प्लॉट नं.३४-बी (चौतीस-बी) याची साईज ११ मी. X १४ मी. असून याचे एकुण क्षेत्रफळ १५४ चौ.मी. (१६५८ चौ.फुट) आहे. यापैकी पुर्व-पश्चिम वाटणीचा दक्षिणेकडील भाग याची साईज ५.५ मी.X १४ मी.असून याचे एकुण क्षेत्रफळ ७७.०० चौ.मी. (८२९ चौ.फुट) आहे. या प्लॉटची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - लेआउट मधील रोड
पश्चिमेस - प्लॉट नं.३९-ए
उत्तरेस - याच प्लॉटचा उर्वरित भाग
दक्षिणेस - प्लॉट नं.३४-ए
येणेप्रमाणे वरील चतुःसिमेतील खुला प्लॉट

या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तिचा मालकी हक्क, ताबा, गहाण, बोजा, वारसा हक्क, भाडे हक्क, करार, न्यायालयीन वाद, स्थगिती आदेश किंवा इतर कोणताही हक्क अथवा दावा असल्यास, त्यांनी या नोटीसच्या प्रसिध्दीपासून ०७ (सात) दिवसांच्या आत त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे व पुरावे खाली सही करणाऱ्या वकीलांकडे लेखी स्वरुपात सादर करावी. विहीत मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, कोणाचाही दावा अथवा हरकत नाही असे गृहित धरुन माझे अशील सदर मिळकत खरेदी करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दावा किंवा हरकतीची जबाबदारी स्विकारली जाणार नाही.

**स्थळ- अमरावती**
**दिनांक २८.०६.२०२६**

(ॲड.अमोल केशवराव हरणे)
पत्ता- केशवकुंज, शिवशंकर नगर,
अकोली रोड, अमरावती
मो.९०११८७४३४१

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०८५/२०२६
**कल्पना व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२७.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. कल्पना कृष्णराव मोहोकर, वय ६७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.३ टाकरखेडा संभू, ता.भातकुली, जि.अमरावती
२. रवी भीमराव सोनटक्के, वय ५६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.फ्लॅट नं.११, श्रध्दा अपार्टमेंट सुभाष नगर, विश्रांतवाडी, पुणे
३. वंदना सुखदेव नाठे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.१३, शिव मंदिराजवळ, संकेत कॉलनी, विमवि, अमरावती
४. विनोद भीमराव सोनटक्के, वय ५१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.फ्लॅट नं.५, ऋषी प्रसाद हाईटस् अष्टविनायक नगर, चुंपळे, ता.जि.नाशिक

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **भिमराव नारायणराव सोनटक्के आणि इंदुताई भिमराव सोनटक्के** हे अनुक्रमे दिनांक 15.03.2021 व 01.06.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **कल्पना व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कल्पना व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११६०/२०२६
**अमोल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Amol Avadhutrao Parade, Age 37 Yrs. Occu.: Business
R/o Near Gawande, Chakki, Belpura, Rukhmini Nagar,Amt.
2. Sunita Avadhutrao Parade, Age 50 Yrs. Occu.: Household
R/o Near Gawande, Chakki, Belpura, Rukhmini Nagar,Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अवधुतराव रामजी पारडे** हे दिनांक 02.11.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अमोल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अमोल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती
## चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.: ७४/१९/२०२६**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक - अवधुत महाराज देवस्थान, गव्हानिपाणी ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती**
**बाबत अर्जदार - श्री किसन विश्वेश्वर भगत**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,
सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - मौजा- गव्हानिपानी मालमत्ता क्र.५८२ मध्ये बांधकाम ३० X १४ = ४२० चौ.फुट व १५ X १५ = २२५ चौ.फुट जागा ज्याची चर्तुसिमा :-

पुर्वेस :- सरकारी रस्ता पश्चिमेस :- सरकारी रस्ता
उत्तरेस :- सरकारी रस्ता दक्षिणेस :- सरकारी रस्ता

प्रत्येक स्थावर मालमत्तेची किंमत : साठ हजार केवळ

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २५/०६/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**सही/-**
**अधीक्षक न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

प्रो.क्र.५९३/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**
**आर.एम.जे.सी.क्रमांक २१३/२०२६** **ने.ता.०५.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Kusum Diliprao Ronghe,** Age 60 Yrs. Occu.: Housewife
R/o. Kalamgavhan, Po. Saur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
2. **Dhanshri Ajayrao Davare**, Age 37 Yrs. Occu.: Housewife
R/o. At Post Ashtoli, Tq. Morshi, Dist. Amravati
3. **Bhagyashri Sanjy Atakre,** Age 35 Yrs. Occu.: Housewife,
R/o. Borgaon Dori, Po. Borgao Peth, Tq.Achalpur, Dist. Amravati
4. **Vanashree Sunilrao Thakare**, Age 33 Yrs. Occu.: Housewife,
R/o. Ward No. 3, Belaj, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati
5. **Gajanan Diliprao Ronghe**, Age 32 Yrs. Occu.: Private Job,
R/o. Kalamgavhan, Po. Saur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati

*विरुध्द*

**गैरअर्जदारः Nil**

ज्यापेक्षा **Dilip Bapuraoji Ronghe** **हे दि.०१.०५.२०२६ रोजी मयत झाले.** अर्जदार Kusum Diliprao Ronghe, Age 60 yrs, Occu- Housewife, R/o. Kalamgavhan, Po. Saur,Tq. Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**२२.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे.या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Dilip Bapuraoji Ronghe** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Dilip Bapuraoji Ronghe** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २४.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर), भातकुली**
**दि.२४/०६/२०२६**

प्रो.क्र.५९४/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**
**आर.एम.जे.सी.क्रमांक २१२/२०२६** **ने.ता.०५.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Lila Pralhad Gajbhiye,** Age 68 Yrs. Occu.: Housewife
R/o. Kawtha Bahale, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
2. **Minakshi Nilesh Gajbhiye**, Age 36 Yrs. Occu.: Housewife
3. **Ku. Simran Nilesh Gajbhiye,** Age 16 Yrs. Occu.: Education,
Minor through legal guardian Mother i.e.
**Minakshi Nilesh Gajbhiye**
4. **Ku. Samruddhi Nilesh Gajbhiye**, Age 15 Yrs. Occu.: Education,
Minor through legal guardian Mother i.e.
**Minakshi Nilesh Gajbhiye**
Applicant No. 2 to 4 C/o. Vitthalrao Kamble,
R/o. Sanjay Gandhi Nagar, No.2, Rukmini Nagar,
Amravati, Tq. & Dist. Amravati

*विरुध्द*

**गैरअर्जदारः** Nil

ज्यापेक्षा **Nilesh Pralhadrao Gajbhiye** हे दि.०७.०५.२०२६ रोजी मयत झाले. अर्जदार Lila Pralhad Gajbhiye, Age 68 yrs, Occu- Housewife, R/o. Kawtha Bahale, Tq. Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**२२.०६.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **Nilesh Pralhadrao Gajbhiye** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **Nilesh Pralhadrao Gajbhiye** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २४.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर), भातकुली**
**दि.२४/०६/२०२६**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
## वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज - ११४०/२०२६**
**सोनल व इतर विरुध्द निरंक**
**पुढील तारीख १०.०८.२०२६**

**अर्जदार :**
1) **Smt. Sonal Vipul Chhabada,** Age 52 yrs., Occu.- Nil
2) **Shri Naman Vipul Chhabda,** Age 25 yrs., Occu.- Business
3) **Jaslin Vipul Chhabda,** Age 21 yrs., Occu.- Student
All R/o. Raj Apartment, Flat No.4,
Infront of IMA Hall Magilal Plot, Camp, Amravati
4) **Smt. Santosh Rajan Chhabda,** Age 78 yrs., Occu.- Household
R/o. Barkat Behind IMA Hall Camp, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत विपुल राजन छाबडा** हे **दि.२०.०४.२०२६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सोनल व इतर विरुध्द निरंक** यांनी रा.वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोनल व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशान्वये,**
**सहायक अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७७/२०२६
**श्री.रविंद्र अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२१.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ravindra Madhukar Kalbande, Age 60 Yrs. Occu.: Agriculturist
R/o C/o Madhukar Kalbande Kathora Bk., Rahatgaon, Amt.
2. Jotsana Sriram Bhadake, Age 56 Yrs. Occu.: Homemaker
R/o Ward No.03, Sawaner, Amravati.
3. Gajanan Madhukarrao Kalbande, Age 76 Yrs. Occu.: Agril.
R/o C/o Madhukar Kalbande Kathora Bk., Rahatgaon, Amt.
4. Mangesh Madhukarrao Kalbande, Age 53 Yrs.Occu.: Agril.
R/o C/o Madhukar Kalbande Kathora Bk., Rahatgaon, Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मध्युकर शंकरराव काळबांडे** हे दिनांक 28.07.2015 रोजी **कठोरा, ता.जि. अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रविंद्र अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रविंद्र अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस
## विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.३०२/२०२५ ने.ता.०७.०७.२०२६

**अर्जदार :**
१. कमल गोविंद आमझरे, वय ७६ धंदा - घरकाम
२. ज्ञानेश्वर गोविंद आमझरे, वय ४७ धंदा - मजुरी
सर्व रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक गोविंद कृष्णाजी आमझरे** यांचा मृत्यू दिनांक **१९.०३.२०२०** रोजी ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२२.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**
आर.एम.जे.सी.क्र.३८६/२०२६ ने.ता.१०.०८.२०२६

**अर्जदार -** १. श्री.प्रल्हाद दामोधर पाळेकर
वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.अडगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **नामे दामोधर शामरावजी पाळेकर** हे दि.**२२.०३.१९९९** रोजी **अडगांव,** ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई नामे **अन्नपूर्णा दामोधरराव पाळेकर** ही दिनांक **१२.०२.२०१७ रोजी** अडगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २५.०६.२०२६

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, यांचे न्यायालय**
एम.ए.सी.पी. क्रमांक ४२५/२०२४ ने.ता.२७.०७.२०२६

**पिटीशनर - सुनिल सुंदरदास वाधवाणी**
**-- वि --**
**रिस्पांडंट - सागर सुनिल आहुजा व ईतर**

**बनाम** - 1.Sagar Sunil Ahuja
R/o Rampuri Camp, Dist. Amravati.

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **सुनिल सुंदरदास वाधवाणी** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०४, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **सागर सुनिल आहुजा**, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **२७.०७.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, यांचे न्यायालय**
एम.ए.सी.पी. क्रमांक ३८२/२०२४ ने.ता.२७.०७.२०२६

**पिटीशनर - कृष्णा गजाननराव तनवेस**
**-- वि --**
**रिस्पांडंट - अभिजीत संजय येवले व ईतर**

**बनाम** - 1.Piyush Rajesh Mishra
R/o C/o Nana R.Raut,
Near Teacher Gruha Nirman Society
Amravati.

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **कृष्णा गजाननराव तनवेस** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०४, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **पियुष राजेश मिश्रा**, यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **२७.०७.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०४, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २२.०६.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०४४/२०२६
**गिरीजा व चार -वि- निरंक**
पुढील ता.२७.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Girija Chandramani Sardar, Age 76 Yrs. Occu.: Household
2. Rajesh Chandramani Sardar, Age 49 Yrs. Occu.: Business
3. Mukesh Chandramani Sardar, Age 44 Yrs. Occu.: Business
All Appli.No.1 to 3 are R/o Chandramani Sardar, Sanjay Gandhi Nagar No.2, Near Dange Floor Mill, Rukhmini Nagar, Amravati
4. Bhavsar P.Sushma, Age 41 Yrs. Occu.: Housewife
R/o Alkananda Society, Mundra Kachchh, Gujarat

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Chandramani Shivaji Sardar हे दिनांक 03.04.2001 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Girija Chandramani Sardar + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Girija Chandramani Sardar + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २९२**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### रामकृष्ण चिखलकर यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार प्रदान

**लेहेगाव-** विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था अमरावतीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र शासन गुणवंत पुरस्कार प्राप्त रामकृष्ण विठ्ठलराव चिखलकर यांना बुलढाणा येथे राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी राजमाता जिजाऊ पुरस्कार विविध मान्यवरांच्या उपस्थित प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी सामाजिक न्याय भवन बुलढाणा येथे राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष विठ्ठलराव राजे जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेच्या नेत्या जयश्री शेळके, प्राचार्य विष्णुपंत पाटील, ज्येष्ठ पत्रकार महेशसेठ वाधवाणी, आयोजक निवृत्ती राजे जाधव आदींची उपस्थिती होती.याच कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात व महिलोन्नतीसाठी अग्रेसर असलेल्या अमरावती येथील रूपाली सुनिल खोब्रागडे, आ.प्रवीण गुजर, सीमा मेश्राम, वंदना खोब्रागडे,आ.स्मिता बुल यांनाही राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन पंजाब टेकाडे गुरुजी यांनी केले.



### ग्रामपंचायत मध्ये वार्डचे आरक्षण जाहीर

**शिराळा-** येथील ग्रामपंचायत मध्ये दुस-यादा वार्डचे आरक्षण जाहीर करण्यात आले. पहिले वार्डचे आरक्षणावर आरोप घेण्यात आल्यामुळे दुसऱ्यांदा वार्डचे आरक्षण काढण्यात आले त्यामुळे पहिले आरक्षण रद्द करण्यात आले.वार्ड नं १ मध्ये नामप्र, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण महिला, वार्ड नंबर २ मध्ये अनुसूचित जाती, सर्वसाधारण महिला, सर्वसाधारण, वार्ड नं ३ मध्ये अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती,सर्वसाधारण महिला, तर वार्ड नंबर ४ मध्ये नामप्र महिला व सर्वसाधारण, वार्ड नंबर ५ मध्ये नामप्र सर्वसाधारण महिला सर्वसाधारण तसेच वार्ड नंबर ६ मध्ये नामप्र महिला सर्वसाधारण महिला सर्वसाधारण असे वार्डचे आरक्षण काढण्यात आले. यावेळी निवडणूक अधिकारी तथा वडाळी मंडल अधिकारी ज्ञानेश्वर गावनेर, तलाठी आशिष निचित, ग्रामविकास अधिकारी अनितातार्इ नवले, ग्रामपंचायत सदस्य मिंलिद तायडे, जयंत आमले, सचिन देशमुख, राजु गंधे, मंगेश काळमेघ, रोशन कापसे, मुसाव्विरखा पठाण,सुरज फरतोडे, संजय लव्हाळे, बाळु आमले, पत्रकार डीआर वानखडे,झाकर्डे, नितलणे, ग्रामपंचायत कर्मचारी योगेंद्र तायडे मधुकरराव खेडकर, कोतवाल सागर देशमुख,अजिंक्य देशमुख, आदी उपस्थित होते.



### ३५४ बालकांना दिला पोलिओ डोस

**अंजनगाव बारी-** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत अंजनगाव बारी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने यशस्वीपणे लसीकरण मोहीम राबविण्यात आली.यावेळी शिवकुमार भुरे, सुजाता रोडगे (एएनएम), आशा वर्कर सुजाता तेटू, सुनिता भेंडारकर तसेच लाभार्थी पालक उपस्थित होते.यावेळी व्हिजिटर वैद्यकीय अधिकारी डॉ. रसिका धर्मे, प्रज्ञा चिंचोळे आणि ज्योती घुसे यांनी मोहिमेची पाहणी करून मार्गदर्शन केले. अंजनगाव बारी येथे जि.प. प्राथमिक मुलांची शाळा, जि.प. उर्दू शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्र अशा तीन लसीकरण बूथवर ही मोहीम राबविण्यात आली. अंजनगाव बारी व गोविंदपूर परिसरातील मिळून ३५४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस पाजण्यात आला.प्रत्येक बालकाला पोलिओमुक्त आणि निरोगी भविष्य देण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला पोलिओचा डोस देणे ही सामूहिक जबाबदारी आहे,' असा संदेश यावेळी आरोग्य विभागाने दिला. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांसह आशा सेविका व सर्वांनी परिश्रम घेतले.

## अचलपूरच्या ऐतिहासिक श्रीराम मंदिर संस्थानच्या
# दहा कोटीच्या जमिनीवरील कब्जेदाराचा दावा फेटाळला

■ 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'च्या पाठपुराव्याला यश ■ कुळ खरेदी प्रकरण खारिज करण्याचा राज्यातील पहिलाच ऐतिहासिक निर्णय!

**अमरावती/ का.प्र.**

अचलपूर (जि. अमरावती) येथील ऐतिहासिक व प्राचीन 'श्री सितारामचंद्र संस्थान उर्फ श्री राम मंदिर (बुंदेलपूरा)' या देवस्थानची मौजा- खेल त्र्यंबकनारायण येथील ३.५ एकर (१.४३ हेक्टर) दहा कोटीची मौल्यवान शेतजमीन हडप करण्याचा कब्जेदाराचा बेकायदेशीर डाव अचलपूरच्या महसूल न्यायालयाने पूर्णपणे उधळून लावला आहे.

अचलपूरचे तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरणाचे अध्यक्ष सुदर्शन शहारे यांनी देवस्थानचा प्राथमिक आक्षेप मंजूर करत अर्जदार महिला कब्जेदाराचे कुळ खरेदी प्रकरण कायदेशीर चपराक लगावत थेट खारिज केले आहे.विशेष म्हणजे, कोणत्याही देवस्थानच्या प्रकरणात केवळ प्राथमिक आक्षेपाची (Preliminary Objection) कायदेशीर बाजू ग्राह्य धरून संपूर्ण दावा सुरुवातीलाच फेटाळण्याचा आणि देवस्थानच्या बाजूने निकाल लागण्याचा हा महाराष्ट्र राज्यातील पहिलाच ऐतिहासिक निर्णय ठरला आहे.

सदर वादग्रस्त शेत जमीन (गट क्र. ६०/२) ही श्रीराम मंदिर संस्थानच्या मालकीची असून, तिच्या उत्पन्नातून मंदिराचा नैवेद्य, पूजा-अर्चा, जीर्णोद्धार व पुजारी यांचा खर्च होणे अपेक्षित आहे.७/१२ उताऱ्यावर नोंद असलेले जुने विश्वस्त मयत झाल्याचा गैरफायदा घेत, अर्जदार अनिता लखनसिंग



तरवले हिने खरी परिस्थिती लपवून जमीन स्वतःच्या नावे करून घेण्यासाठी (विक्री प्रमाणपत्र मिळवण्यासाठी) २४ फेब्रुवारी रोजी अचलपूर तहसीलदारांकडे कुळ कायदा कलम ४२ व ४३ अन्वये अर्ज दाखल केला होता.

विशेष म्हणजे, धर्मादाय आयुक्तालयाच्या आदेशानुसार मंदिरात नवीन विश्वस्तांची नियुक्ती झाली होती. तरीही नवीन विश्वस्तांना पक्षकार न करता, जाणीवपूर्वक केवळ मयत व्यक्तींच्या विरोधात हा दावा दाखल करण्यात आला होता, जी पूर्णपणे बेकायदेशीर बाब होती.

प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान १९६५ मधील न्यायालयीन आदेश सादर करण्यात आला. त्यावेळी मूळ कुळधारकाने मंदिराच्या हितासाठी जमीन खरेदी न करण्याची भूमिका घेतल्याने ते प्रकरण निकाली निघाले होते. त्यामुळे'रेस ज्युडिकाटा' (Res Judicata)या तत्त्वानुसार त्याच विषयावर पुन्हा दावा करता येत नसल्याचा युक्तिवाद संस्थानच्या वतीने करण्यात आला. तसेच देवस्थानची जमीन हस्तांतरित करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांची पूर्वपरवानगी आवश्यक असून अर्जदाराकडे ती नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

उभय पक्षांचा युक्तिवाद आणि कागदपत्रे तपासल्यानंतर, तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी स्पष्ट केले की, अर्जदार महिला कुळ कायद्याच्या अटींची पूर्तता करत नाही आणि देवस्थानची जमीन खरेदी करण्याचा तिला कोणताही अधिकार नाही. २ जून २०२६ रोजी पारित केलेल्या अंतिम आदेशात त्यांनी अर्जदाराचा अर्ज पूर्णपणे खारिज करून जमीन संस्थानच्याच मालकीची असल्याचा निर्वाळा दिला.

या संपूर्ण न्यायालयीन लढाईत संस्थानच्या वतीने नवीन विश्वस्त सर्वश्री मयुर दिक्षीत, अजय तिवारी, पुरुषोत्तम दुबे, राजकुमार मिश्रा, लोकनाथ वाजपेयी, सचिन (सतिष) अवस्थी आणि नितीन माहेश्वरी यांनी अतिशय भक्कमपणे कायदेशीर बाजू मांडली.

महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पाठपुराव्यामुळे आणि न्यायालयाच्या या न्यायोचित निर्णयामुळे अचलपूर परिसरातील तमाम रामभक्त आणि हिंदू धर्मीयांमध्ये अत्यंत समाधानाचे व आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## बालकांना पाजले पोलिओ डोज

**अमरावती-** बडनेरातील शहरी आरोग्य केंद्रांतर्गत अंगणवाडी, शाळा, बस स्टॉप, रेल्वे स्टॉप, झोपडपट्टी रोडवर व बुधवर बालकांना पोलिओ डोस पाजण्यात आले. यावेळी साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे यांनी बडनेरातील



विविध ठिकाणी भेटी दिल्या. दरम्यान बडनेरा येथील शहरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. इमरान खान, डॉ. शुभम गोसावी, डॉ. रोहिणी उदासी, पीएचएन शाहरुख खान यांनी बालकांना स्वतः च्या हाताने दोन डोस पाजले. तसेच हैदरपुरा येथे पल्लवी भुसाटे यांनी पर्यवेक्षण केले. सदर अभियानाला बडनेरा शहर वासियांनी चांगला प्रतिसाद दिला.

## मुसळधार पाऊस, तरीही धरणातील पाणीसाठा स्थिर
### जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांमध्ये ३९.४९ टक्के पाणीसाठा

**अमरावती/ का.प्र.**

जिल्ह्याभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांतील पाणीसाठ्यात वाढ होईल, अशी अपेक्षा होती. परंतु, अद्यापपर्यंत धरणातील पाण्याची स्थिती स्थिर असल्याचे दिसून येत आहे. २८ जून रोजीच्या प्राप्त अहवालानुसार, जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांमध्ये एकूण ४१३.५५ दशलक्ष घनमीटर (३९.४९ टक्के) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या १० जून रोजी ५६ प्रकल्पांमध्ये ४०.५२ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे सद्याचा पाणीसाठा थोडाफार कमीच असल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा ४१६.६५ दशलक्ष घनमीटर (३९.७९ टक्के) होता.

जिल्ह्यातील एकमेव मोठा प्रकल्प असलेल्या ऊर्ध्व वर्धा धरणात सध्या २४८.३१ दशलक्ष घनमीटर (४४.०२ टक्के) पाणीसाठा असून, धरण क्षेत्रात १ जूनपासून १६६ मिमी पाऊस नोंदविण्यात आला आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत धरणात २४१.८८ दशलक्ष घनमीटर (४२.८८ टक्के) पाणीसाठा होता. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ऊर्ध्व वर्धामध्ये अधिक जलसाठा उपलब्ध आहे. मध्यम प्रकल्पांमध्ये चंद्रभागा धरण सर्वाधिक ७६.२१ टक्के भरले असून, त्यापाठोपाठ सपन प्रकल्पात ३९.७२ टक्के, पूर्णा प्रकल्पात ६०.८३ टक्के आणि शहानूर प्रकल्पात ३३.४१ टक्के पाणीसाठा आहे. तर पंढरी प्रकल्पात २०.५१ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. गर्गा प्रकल्प मात्र अद्याप रिकामा असून त्यामध्ये उपयुक्त पाणीसाठा शून्य टक्के आहे.

जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पांमध्ये मिळून ९५.५८ दशलक्ष घनमीटर (३७.३० टक्के) पाणीसाठा उपलब्ध आहे.

याशिवाय ४८ लघु प्रकल्पांमध्ये ६९.६६ दशलक्ष घनमीटर (३०. ७१ टक्के) जलसाठा नोंदविण्यात आला आहे.

## विद्यापीठात 'एम.एस्सी.अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स' अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उपयोजित इलेक्ट्रॉनिक्स विभागामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत 'एम.एस्सी. अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स' या आधुनिक आणि रोजगारभिमुख पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. भविष्यकालीन तंत्रज्ञानविश्वाचे नेतृत्व करणारी कुशल पिढी घडविण्याचा संकल्प या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. दोन वर्षाच्या या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना केवळ सैध्दांतिक ज्ञान न देता, जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणारे व्यावसायिक म्हणून घडवले जाते. यामध्ये कोअर अभ्यासक्रम, रिसर्च प्रोजेक्ट, आयपीआर आणि रिसर्च मेथडॉलॉजीचा समावेश आहे.

**विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण :** कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय) व मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्स व डेटा सायन्स, व्हीएलएसआय डिझाईन व एम्बेडेड सिस्टीम्स डिझाईन, स्मार्ट सेन्सर्स, इमेज आणि व्हिडिओ प्रोसेसिंग, जनरेटिव्ह डीप लर्निंग आणि इंडस्ट्रियल ऑटोमेशन. इन्फोसिस, टीसीएस, कॉग्निझंट, आयबीएम, सॅमसंग, टेक महिंद्रा, एल ॲन्ड टी इन्फोटेक, बीएसएनएल, मार्व्हेल अशा कंपन्यामध्ये कार्यरत आहेत. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर उद्योग क्षेत्रात इंजिनिअर, सिस्टीम डेव्हलपर, सॉफ्टवेअर इंजिनिअर, सेल्स मॅनेजर आणि रिसर्च अँड डेव्हलपमेंट क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. प्रवेशासाठी पात्रता : बी.एस्सी (फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स इन्स्ट्रमेंटेशन) किंवा बीसीए (१०+२) (स्तरावर गणित विषयासह) किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स किंवा समकक्ष पदवी. खुल्या प्रवर्गासाठी किमान ५० टक्के आणि राखीव प्रवर्गासाठी किमान ४५ टक्के गुण आवश्यक आहे.

**असा करा ऑनलाईन अर्ज**

- प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर करण्यासाठी https://sgbauadm.samarth.edu.in/index.php/registration/user-new/register या पोर्टलवर जावून अथवा विद्यार्थी केंद्रीय प्रवेश समिती, वनस्पतीशास्त्र विभाग,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे प्रत्यक्ष भेट देऊनही संपर्क साधू शकतात. अधिक माहितीसाठी डॉ. एस.एन. काळे (विभाग प्रमुख) ९४२२९१७७१४, प्रा.डी. आर. सोळंके ७३८७८८८८७३, प्रा.के. डी. चिंचखेडे ९८९०९९७२४४ यावर संपर्क साधावा. विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे.

## वीज अंगावर पडून; शेतकऱ्याचा जागीच मृत्यू, एक गंभीर जखमी
### मृताच्या कुटुंबाला तातडीच्या मदतीची मागणी

**लेहेगाव/ वार्ताहर**

नेरपिंगळाई परिसरात रविवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी पावसासह विजांच्या कडकडाटामुळे एक दुर्दैवी घटना घडली. धानोरा शेतशिवारात विज पडून एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा शेतकरी गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

नेरपिंगळाई येथील शेतकरी अशोक जगजीवनराम भोजने (वय ६५) व अनुप वासुदेव कोकाटे (वय ३२) हे दोघेही नेरपिंगळाई नजीकच्या धानोरा शेतशिवारातील शेतात कपाशी पिकाच्या पेरणीचे काम करण्यासाठी गेले होते.शेतातील काम आटोपून दोघेही घरी परतण्याच्या तयारीत असतानाच त्यांच्या परिसरात अचानक विज कोसळली. या विजेच्या तडाख्यात अशोक जगजीवनराम भोजने यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनुप वासुदेव कोकाटे हे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत त्यांना उपचारासाठी सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दाखल केले.घटनेची माहिती मिळताच शिरखेड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मोर्शी येथील रुग्णालयात पाठविला. या प्रकरणाचा पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहेत.

दरम्यान, मृत अशोक भोजने यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबाचा कर्ता पुरुष गमावल्याने कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे शासनाने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, तसेच जखमी अनुप वासुदेव कोकाटे यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने उचलावा, अशी मागणी ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



या घटनेमुळे नेरपिंगळाई व परिसरात शोककळा पसरली असून पावसाळ्यात शेतकाम करताना हवामानातील बदल लक्षात घेऊन विजांचा कडकडाट सुरू झाल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## मासोदच्या २७ मागण्यांवर आज निर्णायक बैठक

**अंजनगाव बारी-** मासोद येथील ई-क्लास जागा वन विभागाकडे हस्तांतरित न करण्यासह २७ मागण्यांसाठी गिरीश चौधरी यांनी केलेल्या अन्नत्याग आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली आहे. तहसीलदार अमरावती यांनी सार्वजनिक बांधकाम, पंचायत समिती, महाराष्ट्र राज्य परिवहन, पाणीपुरवठा, महिला व बालविकास, आरोग्य, भूमी अभिलेख, कृषी आदी संबंधित विभागांना ३० जून रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयात संयुक्त बैठकीस उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. तहसीलदारांनी काढलेल्या पत्राची प्रतिलीपी खा.बळवंतराव वानखडे, जिल्हाधिकारी अमरावती तसेच उपविभागीय अधिकारी, अमरावती यांनाही माहितीसाठी पाठविण्यात आली असून, त्यामुळे या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

'हे आंदोलन वैयक्तिक नव्हे, तर गावाच्या हक्कांसाठी होते. आता केवळ बैठका नव्हे, तर प्रत्येक मागणीवर वेळबद्ध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे. अन्यथा जनतेच्या न्यायासाठी यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारले जाईल.'

**-गिरीश चौधरी**

## देवा,सात जन्म हाच कारभारी हवा; सौभाग्यवतींचे वटवृक्षाला साकडे

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

वटपौर्णिमेचा सण, सौभाग्यवती महिलांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.अनेक सावीत्रींनी गावातील पिढ्यान पिढ्यांचा, एकमेव साक्षीदार असलेल्या वटवृक्षाचे पूजन केले.श्रध्दावान सौभावतींनी, मंदिरांच्या आवारातील वटवृक्ष पूजला.तर शहरातील बर्याच महिलांनी घरातल्या कुंडीतील, बोन्साय वटवृक्षालाच साकडे घातले.तसेच काही सत्यवानांनी आपल्या सावित्रीला उन्हाचा त्रास नको, म्हणून वटवृक्षाची फांदीच तोडून घरी आणुन दिली.ती कुंडीत लावून त्याचे पूजन, आपल्या समक्ष घरीच सौभाग्यवती कडून करून घेतले.पर्याय कोणताही असला तरी सर्वच सौभाग्यवती सावित्र्यांचे, वटवृक्षाला एकच साकडे.' देवा सात जन्म हाच कारभारी हवा.'

अध्यात्मा नुसार पती ला परमेश्वर मानल्या गेले आहे.हे जरी सत्य असले तरी,'सत्यवान व सावित्रीची बोध कथा', सौभाग्यवती स्त्रीयांचे सामर्थ्य दर्शविते.स्त्रियांमध्ये असलेल्या अलौकिक ,असामान्य,शक्ती सामर्थ्य म्हणजे सावित्री-सत्यवानाची कथा होय. स्त्रियांमध्ये आपल्या कुटुंबावर कितीही संकटे आली तरी, कुटुंबाला त्यातुन बाहेर काढण्याचे शक्ती सामर्थ्य असते.प्रसंगी आपल्या मृतावस्थेत असलेल्या पतीला,यमाच्या पाशातून सोडवून आणण्याचे सामर्थ्य स्त्रियांमध्ये आहे.संकटेच काय यमा वर सुध्दा, मात करण्याची शक्ती



महिलांमध्ये आहे. हे वट सावित्रीच्या कथेतून श्रृत होते.खर तर महिलांना आपल्यातील कुटुंब वत्सल शक्तीच नव्हे, तर सर्वांगीण शक्तीचे सदैव स्मरण व्हावे. यासाठीच हा वटसावित्रीचा सण असावा. अन्यथा' जिचे हाती पाळण्याची दोरी,ती जगाला उद्धारी'असे उगाच म्हटले नसते.मात्र परंपरेने चालत आलेला हा सण,सात जन्म हाच नवरा पाहिजे.याच संकल्पनेत अडकला आहे.

तसेच अनादी काळापासून सात जन्म,हाच पती हवा याचा अट्टाहास का? हे कोडं आजवर कोणत्याही सौभावतीने, सोडवून दाखविले नाही.कदाचित एकदा मुठीत आलेला,भोळा सत्यवान कधीच मुठीतून सुटू नये. यासाठीतर हा महिलांचा अट्टाहास तर नसावा.मनातली कल्पना मनातच बरी.तीचा उहापोह नसावा.हे जरी सत्य असले तरी,महिलांनी जिजाऊ माँ साहेब, येशू बाई राणी साहेब सावित्रीबाई फुले,विरांगणा तारा राणी साहेब, डॉ.आनंदीबाई,राणी लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी,कल्पना चावला या महिलां मधील सामर्थ्य लक्षात घ्यावे.यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून यांचे साहस,शक्ती,धैर्य, कणखर बाणा आपल्यात येवो. असे साकडे वटवृक्षाला घालावे.तेव्हाच वटसावित्रीचा सण खर्या अर्थाने साजरा होईल.कारण फक्त एकट्या पती देवासाठी नव्हे,एका कुटुंबासाठी नव्हे,तर समाजासह एक बलशाली राष्ट्र घडविण्यासाठी,देशाला आज संघटीत महिला शक्तीची नितांत आवश्यकता आहे.

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी १ जुलैला रास्ता रोकोचा आंदोलन
### सरसकट कर्जमाफी, प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याची लोक विकास संघटनेची मागणी

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, अन्यथा १ जुलै रोजी कृषी दिनानिमित्त अमरावती जिल्ह्यात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा लोक विकास संघटनेने दिला आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफी, पीक विमा, हमीभाव व इतर प्रलंबित मागण्यांसाठी १ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अमरावती–परतवाडा मार्गावरील आसेगाव पूर्णा (चांदूरबाजार टी-पॉईंट, बुद्ध विहाराजवळ) येथे भव्य रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.यासंदर्भात मुख्यमंत्री यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले असून, राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करणे, पीक विम्याचा संपूर्ण लाभ देणे, विम्यातील जाचक अटी-शर्ती रद्द करणे, दर्जेदार बियाणे व खते उपलब्ध करून देणे, शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देणे तसेच कर्जमाफीनंतर तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, अपुरा पीक विमा आणि शेतीमालाला मिळणारा कमी बाजारभाव यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

३० जूनपर्यंत शासनाने मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास १ जुलै रोजी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या उपस्थितीत रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनात अमरावती जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन लोक विकास संघटना व सर्व शेतकरी, अमरावती जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# कर्जमुक्ती योजनेसाठी ३ लाख शेतकऱ्यांची माहिती सादर

## नियमित कर्ज भरणाऱ्या ९३ हजार शेतकऱ्यांना लाभ

### -जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा



**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ राज्य शासनाने जाहिर केली आहे. यात सुमारे तीन लाख शेतकऱ्यांची माहिती शासनाकडे सादर करण्यात आली आहे. यात १२ प्रमुख बँकांमधील २ लाख २ हजार थकीत कर्जदार आणि ९३ हजार नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्यात आली आहे. कर्जमाफीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जिल्ह्यातील १२ प्रमुख बँकांतर्गत एकूण २ लाख २ हजार १६७ शेतकरी खाती या योजनेत २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी पात्र ठरली आहेत. यातील रक्कम सुमारे २३३८ कोटी रुपये होणार आहे. तसेच वेळेवर कर्जाची परतफेड करणाऱ्या ९३ हजार १३९ शेतकरी खात्यांना ५० हजार रुपयांपर्यंतच्या प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी ५२४ कोटी रक्कम कळविण्यात आली आहे.

बँकनिहाय आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अंतर्गत सर्वाधिक ७१ हजार ६५५ खात्यांची ७०० कोटी रुपयांची रक्कम कळविण्यात आली आहे. त्याखालोखाल स्टेट बँक ऑफ इंडियातील ४१ हजार १३५ ☞(पान २ वर)

# पानोरा फाट्यावर दुचाकीची ट्रॅक्टरला धडक

## दोन जण जखमी, एकाची प्रकृती चिंताजनक

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील पनोरा फाट्यावर आज



दि.२९ जून रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास दुचाकी आणि ट्रॅक्टरच्या भीषण अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले असून एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहीती आहे.दुचाकीने ट्रॅक्टरला मागून जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

दुर्गवाडा येथिल अमोल भगवान इंगळे (वय ४९ ) व संतोष प्रकाश काकडे (वय ४२ ) हे दोघेजण दुचाकीने दर्यापूर कडे येत होते. पानोरा फाट्याजवळ समोरून जाणाऱ्या ट्रॅक्टरचा अंदाज न आल्याने त्यांच्या दुचाकीने ट्रॅक्टरच्या कल्टीवेटरला मागून जोरदार धडक ☞(पान २ वर)

# पेपर फुटी थांबवा...विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ बंद करा!

## जिल्हा युवक काँग्रेसचे तीव्र आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभरात NEET परीक्षेतील गोंधळ, विविध प्रवेशपूर्व पात्रता परीक्षांमधील गैरव्यवहार आणि आता TET परीक्षेचा पेपर फुटल्याच्या गंभीर प्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ सुरू असल्याचा संताप व्यक्त करत, महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने अमरावती येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

'पेपर फुटी थांबवा... विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ बंद करा!' अशी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश सचिव व प्रवक्ते अक्षय राऊत, नगरसेवक व तालुकाध्यक्ष वैभव वानखडे, प्रदेश सचिव उत्कर्ष देशमुख, प्रदेश सचिव परीक्षित जगताप, प्रदेश महासचिव नितेश वानखेड़े,सागर कलाने, ☞(पान २ वर)

# एचएसआरपी नंबर प्लेटसाठी ३० जून अंतिम मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतूद केली आहे. ही नंबर प्लेट बसविण्यासाठी ३० जून अंतिम मुदत आहे.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची अचूक ओळख पटविणे आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून




सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांसह शासकीय, निमशासकीय कार्यालये व बँकांनी त्यांच्या १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी ☞(पान २ वर)

# ८८.११ लाख रुपयाच्या घोटाळयात ऑडिटरला अटकपूर्व जामीन

### -मनपा सफाई कामगार संस्था प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका स्वच्छता कामगार मर्यादित संस्थेमध्ये ८८.११ लाख कोटीच्या घोटाळ्यामध्ये शासन मान्यताप्राप्त पॅनल ऑडिटर दिलीप गोविंदराव रोहनकर यांना जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश संजय भट्टाचार्य यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की प्रस्तुत लेखा विवरण अहवालमध्ये अनियमिततेचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोतवाली पोलीस ठाण्यात कलम ४०९,४२० व ३४ अन्वये १२ आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग एक यांच्या अहवालाच्या आधारावर ही कारवाई करण्यात आली होती. तक्रारीनुसार संस्थेचे तत्कालीन सचिव मनोज भिकाजी सिरसिया व इतर पदाधिकाऱ्यांवर आरोप आहे की त्यांनी आपले नातेवाईकांना लाभ देण्यासाठी ऋण वितरण प्रक्रियेमध्ये अनियमितता केली आणि संस्थेच्या ८८.११ लाख रुपयांचा दुरुपयोग केला. या प्रकरणात २०२२-२४ ऑडिट ☞(पान २ वर)

# पतीसोबत नंनदेकडे आलेली महिला बेपत्ता

### तखतमल कॉलेज परिसरातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** पती आणि



मुली सोबत अमरावतीमध्ये राहणाऱ्या नंनदेकडे आलेली चाळीस वर्षीय विवाहित महिला अचानक बेपत्ता झाल्याची घटना राजापेठ पोलीस ठाण्यातंर्गत घडली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेच्या आधारावर शोध सुरू केला आहे. डिंपल राहुल रुंगटा (वय ४०, राजपूतपुरा, अकोला) असे बेपत्ता महिलेचे नाव आहे. माहितीनुसार डिंपल रुंगटा ही महिला पती राहुल आणि मुली सोबत राजापेठ परिसरातील तखतमल कॉलेज क्षेत्रात राहणाऱ्या आपल्या नंनदेकडे आली होती. रविवारी सकाळी नऊ☞(पान २ वर)

# मेळघाटातील २० गावे संपर्काच्या बाहेर

## बीएसएनएलची सेवा टप्प

**धारणी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील अतिदुर्गम रेल्वे धुळघाट परिसरात आठवडाभरापासून बीएसएनएलचे मुख्य वायर तुटल्यामुळे मोबाईल नेटवर्क आणि इंटरनेट सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे रेल्वे धुळघाट सह परिसरातील सुमारे २० गावातील संपर्क तुटला आहे. यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. संपर्क व्यवस्था कोलमडल्याने शासकिय कार्यालय, विद्यार्थी ,व्यापारी तसेच ऑनलाइन व्यवहार करणारे




नागरिक अडचणी आले आहे. विशेषतः रेल्वे धूळघाट प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व ऑनलाईन कामकाज पूर्णपणे बंद पडले असून आरोग्य सेवेवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. रुग्णांची ऑनलाईन नोंदणी, आरोग्य ☞(पान २ वर)

# चाकू घेऊन दहशत निर्माण करणारा गजाआड




गुन्हे शाखेची कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** लक्ष्मी नगर परिसरात चाकू घेऊन दहशत पसरविणाऱ्या आरोपीला गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून दोन चाकू जप्त करण्यात आले आहे. प्रफुल उर्फ दादू सागर वानखडे (वय २४, कपिल वस्तू नगर) असे अटक आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकाला☞(पान २ वर)






















जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

**अमरावती जिल्ह्यातील अवैध सावकारीचा प्रश्न विधानसभेत**

# आ.सुलभा खोडके यांची वित्तीय संस्थांची कर्ज वितरण प्रणाली सुलभ करण्याचा मागणी

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील विशेषतः अमरावती जिल्ह्यात अवैध सावकारांचा सुळसुळाट वाढला असून शेतकऱ्यांना उच्च व्याजदराने कर्ज देऊन बळजबरीने वसुली होत आहे.परिणामी अवैध सावकारी पाशामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या सारखे पाऊल उचलले आहे.जिल्ह्यातील अवैध सावकारी विरुद्ध कठोर कारवाई करणे आवश्यक असून अमरावतीमध्ये अशी किती प्रकरणांची दफ्तरी नोंद आहे व आता पर्यंत किती गुन्हे दाखल करण्यात आले?असा प्रश्न अमरावती सुलभा खोडके यांनी विधानसभेत उपस्थित केला.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आ.सुलभा खोडके यांनी अमरावती जिल्ह्यातील अवैध सावकारी बाबतचा प्रश्न उपस्थित करून सभागृह दणाणून सोडले.अवैध सावकारीची समस्या केवळ अमरावती जिल्ह्यापुरती मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही वाढत आहे,वर्ष २०२६ मध्ये सुमारे २ लाख ३४ हजार १४९ शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले असून अनेक शेतकऱ्यांना उच्च व्याजदराने कर्ज वाटप करण्यात आले.

सद्यास्थित शेतकऱ्यांना पीक नुकसान व वाढते उत्पादन खर्च अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे.सावकारांकडून सुद्धा कर्ज भरणाबाबत तगादा लावला जात असल्याने आधीच अस्मानी व सुलतानी संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे झाले



झाले आहे.जिल्ह्यातील अवैध सावकारीबाबत शासनाने किती प्रकरणे नोंदविली गेली व कुठले गुन्हे दाखल केले असा सवाल उपस्थित करून आ.खोडके यांनी अवैध सावकारी प्रकरणात फौजदारी कारवाई करण्याची मागणी सभागृहासमक्ष केली.

तसेच शेतकऱ्यांनी अधिकाधिक प्रमाणात बँका व कायदेशीर वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावे यासाठी पीककर्ज वितरण सुलभ करणे व या बाबत शासनाने काय उपाययोजना केल्यात?विशेष सवलत योजना लागू करण्यात आल्या का? शेतकऱ्यांमध्ये जनजागृती संदर्भात कोणती मोहीम राबविण्यात आली? अमरावती जिल्ह्यात पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून किती शेतकऱ्यांना बँकांकडून किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली?याबाबत मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी मागणी सुद्धा आमदारांच्या वतीने विधानसभेतून करण्यात आली.

अमरावती जिल्ह्यातील ५७४ परवानाधारक सावकारांनी माहे एप्रिल २०२६ अखेर ४३,९३६ कर्जदारांना ५४.६३ लाख रुपये इतके (तारण व बिगर तारण) बिगर कृषी कर्ज वाटप केलेले आहे.

अमरावती जिल्ह्यात अवैध सावकारीच्या एकूण ३८४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्यापैकी २६६ प्रकरणात तथ्य आढळून आले नाही तर ३४ प्रकरणात तथ्य आढळून आल्याने संबंधितावर म्हणजेच ४८ आरोपींवर फौजदारी कारवाई करणार असल्याची घोषणा सहकार मंत्री- नामदार बाबासाहेब पाटील यांनी केली.

## मणिबाई गुजराती शाळेतील मित्र-मैत्रिणी ३५ वर्षानंतर एकत्र

**अमरावती/का.प्र.**

सन १९९१ वर्षात दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर तब्बल ३५ वर्षानंतर अमरावती शहरातील एक नामांकित मणिबाई गुजराती या शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थीनी मैत्र जिवांचे पुन्हा एकदा या टॅग लाइन अंतर्गत एकत्र आले. ज्या आपल्या शाळेत आयुष्याचे सहा वर्ष पूर्ण केले तिथे एकत्र येऊन जल्लोष करीत आपल्या शिक्षकांसोबत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अमेरिका, लंडन, चेन्नई, नोएडा, बंगलोर, मुंबई, ठाणे,पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अमरावती येथील स्थानिक मित्र आपल्या वर्गात बसून श्री.म्हाला, श्री. सालबर्डे, श्री. पंड्या, श्री. आचलीया, श्री. कलंत्री, श्री. गुल्हाने, श्रीमती देशमुख, श्रीमती कोष्टी, श्रीमती



मिश्रा या शिक्षकांना रोपटे व भेटवस्तू देत हितगुज करण्यात आले.. या स्नेहमिलन कार्यक्रमात सोनाली बापट, सोनाली जोशी, डॉ.मेघना सरोदे, अंजली महालक्ष्मे, डॉली सुळे, निता अवस्थी, नम्रता नावंदर, वैशाली जोध ,डॉ. शशांक देशमुख, सचिन हिर्लेकर, परिमल कुळकर्णी , आनंद गणोरकर, अमर देशमुख, संदीप देशमुख, निलेश वानखडे, अमित पांडे, वैभव कोरडे, अमित मळसने, योगेश राठी, नागेश जोशी, आनंद वानखडे, नीलेश गतफणे , डोईफोडे , अमर देशमुख, सुबोध पाटील, विक्रम मुलमले, डॉ.नितीन कोंडे इत्यादी उपस्थित होते. शाळेची वर्गखोली व शाळेचा परिसर उपलब्ध करून दिल्याबद्दल मणिबाई गुजराती शिक्षण संस्थेची कार्यकारिणी व मुख्याध्यापिका यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

## ११वी प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**अमरावती/का.प्र.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी इयत्ता ११वीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत बहुप्रतीक्षित विशेष प्रवेश टप्पा-१ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. हा विशेष टप्पा सर्व पात्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी खुला राहील. यामध्ये नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, अर्जाच्या भाग-१ मध्ये आवश्यक दुरुस्ती तसेच भाग-२ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांची प्राधान्यक्रम नोंदवण्याची प्रक्रिया २९ जून रोजी दुपारी ३ वाजल्यापासून सुरू होईल. विद्यार्थी कमीत कमी एक आणि जास्तीत जास्त दहा कनिष्ठ महाविद्यालयांचा पर्याय नोंदवू शकतील. अर्ज प्रक्रिया पूर्ण करून 'लॉक' करण्याची अंतिम तारीख १ जुलै संध्याकाळी ६ वाजता निश्चित केली आहे.

माध्यमिक शिक्षण मंडळाकडून पात्र विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका

### उद्या ६ वाजेपर्यत चालणार अर्ज प्रक्रिया

वितरित करण्यात आलेल्या नाहीत, हे लक्षात घेऊन स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत की केवळ मूळ गुणपत्रिका अथवा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसल्याच्या कारणावरून कोण त्याही विद्यार्थ्याचा प्रवेश रोखला जाऊ नये. विद्यार्थ्यांकडून हे लेखी आश्वासन घेतले जाईल की मूळ कागदपत्रे मिळताच ते संबंधित महाविद्यालयात जमा करतील. याच्या आधारे त्यांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

**३ ते ६ जुलै दरम्यान प्रवेश निश्चित करा**

ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय वाटप होईल, त्यांनी ३ जुलै (संध्याकाळी ४ वाजता) ते ६ जुलै (संध्याकाळी ६ वाजता) या कालावधीत संबंधित महाविद्याल यात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा लागेल. यासाठी पोर्टलवर 'प्रोसेस फॉर ॲडमिशन' वर क्लिक करावे लागेल, कागदपत्रांची पडताळणी करावी लागेल तसेच निश्चित केलेले शुल्क भरावे लागेल. याच कालावधीत इन-हाऊस, व्यवस्थापन तसेच अल्पसंख्याक कोट्याअंतर्गतही प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल. या टप्प्यानंतर शिल्लक राहिलेल्या रिक्त जागांची माहिती ८ जुलै रोजी जाहीर केली जाईल.

**३ जुलै रोजी प्रवेश यादी जाहीर होणार**

विद्यार्थ्यांनी नोंदवलेल्या प्राधान्यक्रमांच्या आधारे २ ते ३ जुलै दरम्यान गुणवत्ता आणि आरक्षणानुसार महाविद्यालय वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर ३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता वाटप केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची यादी अधिकृत पोर्टलवर प्रसिद्ध केली जाईल.

## संक्षिप्त

### सोमवारी लोकशाही दिन

**अमरावती -** महानगरपालिकेच्या क्षेत्रात राहणा-या सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, सोमवारी ६जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० पर्यंत मा. आयुक्त कक्षा लगतच्या कॉन्फरंन्स हॉल महानगरपालिका अमरावती येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

### जरूडमध्ये खरिपातील पेरणी शेवटच्या टप्यात

**जरूड -** परिसरात मृग नक्षत्राच्या शेवटच्या चरणात झालेल्या पावसाने, शिवाय सतत पाच ते सहा दिवसांपासून अधून मधून होणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणी केली. पाहता पहाता या परिसरातील खरीप हंगामातील पेरणी आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. सुरुवातीला पाऊस वेळेवर न आल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण तयार झाले होते. शेवटी देव तारी, त्याला कोण मारी, अशा परिस्थितीत पीक पेरणी पुरता पाऊस आल्याने येथील शेतकऱ्यांनी कपाशी, तूर, ज्वारी, मूग, सोयाबीन, तीळ, बरबटी, भुईमूग, एरंडी आदी पिकांची पेरणी केली. त्यामुळे जरुड परिसरात खरीप हंगामाची पेरणी शेवटच्या टप्प्यात आली आहे.

### नेत्रदान जनजागृती रॅलीतून 'प्रकाशदानाचा' संदेश

**अमरावती -** समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागृती निर्माण करून अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश फुलविण्याचा संदेश देत सौ. वसुधाताई देशमुख कृषि महाविद्यालय, बोडणा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नेत्रदान जनजागृती रॅली काढण्यात आली.विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत नेत्रदान संकल्प फॉर्म भरला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय व ग्राम बोडणा येथे नेत्रदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त स्वयंसेवकांनी गावामध्ये रॅली काढून नेत्रदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविले.यावेळी ग्रामपंचायत बोडणा येथे नेत्रदान संकल्प फॉर्म भरण्याची मोहिमही राबविण्यात आली. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कृषी अधिकारी जयश्री गजभिये, विस्तार अधिकारी पवनकुमार ढोमणे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी उत्साहाने नेत्रदान संकल्प फॉर्म भरून या उपक्रमाला पाठिंबा दर्शविला. प्रा. स्वाती देशमुख आणि सहकार्यक्रम अधिकारी सौरभ इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देशमुख, विनय चौधरी, प्रा. राहुल खडसे, प्रा. उदय देशमुख, प्रा. फिरोज खान, प्रा. रेणुका काळे, पवन चौहाण, हेमंत देशमुख, नितीन बाकडे, विक्रम देशमुख, मिलिंद इंगळे, विजया सारवे, अरविंद ढोले यांच्यासह अन्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रा.ममता पळसपगार पीएच.डी. पदवीने सन्मानित



**चांदुर रेल्वे -** स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूररेल्वे येथील प्राध्यापिका ममता पळसपगार यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत गणित विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'Study on Expansion of Universe in the Framework of Modified Theories of Gravity' या विषयावर केलेल्या संशोधनासाठी ही पदवी बहाल करण्यात आली.त्यांनी हे संशोधन कार्य विद्या भारती महाविद्यालय, अमरावती येथील गणित विभागाचे विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रमोद पी. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

नुकत्याच पार पडलेल्या मौखिक परीक्षेत त्यांनी आपल्या संशोधनाचे सखोल आणि प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या संशोधन कार्याची गुणवत्ता, विषयावरील प्रभुत्व आणि संशोधनातील नावीन्यपूर्ण दृष्टिकोन लक्षात घेऊन परीक्षकांनी आनंद व्यक्त केला. त्यानंतर विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी जाहीर केली. या यशाबद्दल आदरणीय अतुल विद्या मंदिर संस्था,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर, IQAC-समन्वयक प्रा. एस.ए.वाणी, गणित विभाग प्रमुख डॉ.आर.व्ही.केने तसेच महाविद्यालयांतील सर्व आदरणीय विभाग प्रमुख आणि प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी ,सहकारी यांनी स्वागत करून अभिनंदन केले.

## वीज टंचाई दूर करण्यासाठी 'स्वतंत्र फिडर' बसवा

### नकुल सोनटक्के यांचे खा.डॉ. बोंडे यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

दर्यापूर तालुक्यातील वडनेरगंगाई येथील विस्कळीत वीजपुरवठ्याची गंभीर समस्या तात्काळ सोडवण्यासाठी गावात महावितरणमार्फत स्वतंत्र फिडर बसवण्यात यावे, या मागणीचे निवेदन भाजपा अनुसूचित जाती मोर्चा (मेळघाट, अमरावती ग्रामीण) चे जिल्हाध्यक्ष नकुल देवराव सोनटक्के यांनी राज्यसभा खासदार मा. डॉ. अनिल बोंडे यांना सादर केले आहे.

वडनेरगंगाई हे गाव महावितरणच्या ३३ केव्ही सबसेंटर येवदा अंतर्गत येते. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात वारंवार विद्युत प्रवाह खंडित होणे, विद्युत स्ट्रीपिंग होणे व वीज पुरवठा विस्कळीत होण्याच्या समस्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सध्या खरीप हंगामाचे दिवस असल्याने शेतीसाठी वीज अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, ऐन वेळेवर वीज उपलब्ध होत नसल्याने पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतीसोबतच या अघोषित भारनियमानाचा मोठा फटका गावातील सामान्य नागरिक, विद्यार्थी आणि स्थानिक व्यापाऱ्यांनाही बसत असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. वडनेरगंगाई गावाची लोकसंख्या आणि विजेची वाढती मागणी पाहता, येथील वीजपुरवठा सुरळीत, नियमित आणि अखंडित ठेवण्यासाठी गावात 'स्वतंत्र फिडर' मंजूर करून बसवणे अत्यंत गरजेचे आहे, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

## सोनार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

**अमरावती/का.प्र.**

श्री नरहरी माळवी सोनार संघ, पूजा कॉलनी, अमरावती, येथे, दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा सोनार समाजातील इयत्ता १० वी व १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नरहरी महाराज प्रार्थना सभागृह, पूजा कॉलनी, अमरावती येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपद राजेश अनासाने, अध्यक्ष, श्री नरहरी माळवी सोनार संघ यांनी भूषविले.प्रमुख अतिथी तथा मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. पंकज वानखेडे मराठी विभाग, श्रीमती नरसम्मा महाविद्यालय, किरण नगर, अमरावती हे उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर या संस्थेचे माजी अध्यक्ष व अखिल भारतीय सोनार महासंघाचे विद्यमान अध्यक्ष नंदकिशोर गुंबळे, संस्थेचे उपाध्यक्ष राजू धरमठोक, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विनोद गुहे, कोषाध्यक्ष नितीन खांडेकर, सचिव प्रा. रवींद्र प्रांजळे, सहसचिव मंगेश नेरेकर, शिक्षण व तांत्रिक प्रशिक्षण समिती प्रमुख प्रा. डॉ. उमेश खांडेकर, महिला



समितीच्या सुमर्न कालबेंडे व युवा समिती अध्यक्ष महेश अष्टुनकर उपस्थित होते.या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून संस्थेचे सचिव प्रा. रवींद्र प्रांजळे यांनी संस्थेचे कार्य व संस्थेद्वारे वर्षभर राबविण्यात येणारे विविध समाजपयोगी कार्यक्रमांचा आढावा घेतला.

या कार्यक्रमात समाजातील ४० गुणवंत विद्यार्थ्यांचा सस्थेतर्फे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तसेच रजनी खांडेकर यांचे कडून भेट वस्तू व स्व. श्रीमती. मनोरमाबाई संपतसा विंचूरकर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ रजनी विंचूरकर यांचे कडून भेट वस्तू देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.संचालन शिक्षण समिती सदस्य प्रा. डॉ. प्रितेश गुंबळे आणि प्रा. डॉ. संजू विंचूरकर यांनी केले तर संगीता माथने यांनी भावपूर्ण असे सरस्वती स्तवन गायिले तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिक्षण समिती सदस्य प्रा. रवी रोठकर यांनी करून दिला.अध्यक्षीय भाषणातून राजेश अनासने यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक असे संबोधन करून त्यांना पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षण समितीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेऊन हा सोहळा यशस्वी केला.आभारप्रदर्शन प्रा.डॉ.उमेश खांडेकर यांनी मानले.या गुणगौरव सोहळ्यास संस्थेचे सर्व विद्यमान विश्वस्त, माजी विश्वस्त, समाजबांधव, गुणवंत विद्यार्थी त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात आणखी एक यशस्वी किडनी प्रत्यारोपण

### वडिलांनी दिली मुलाला किडनी दान

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे वडिलांनी आपल्या चाळीस वर्षीय मुलाला किडनी दान करून दिला पुनर्जन्म. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धानोरा शिक्रा येथील एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील प्रदीप वसंतराव चौधरी हा गेल्या पाच सहा महिन्यापासून किडनी आजाराने त्रस्त होता. शहरातील डॉ अविनाश चौधरी नेप्रोलॉजिस्ट यांच्याकडे तो उपचार घेत असताना, त्याला डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हा यावरील प्रभावी उपचार सुचविला, यात प्रदीप चे वडील आपल्या मुलाला किडनी दान देण्यास तयार झाले. सर्व तपासणीअंती आपल्या मुलाच्या भविष्याचा विचार करता खंबीर मनाने, स्वतः शेतकरी असलेले ६५ वर्षीय वसंतराव आप्पाजी चौधरी यांनी स्वतःची किडनी दान करून समाजासमोर अवयदानाचा आदर्श ठेवला. यात त्यांच्या सर्व नातेवाईकांनी देखील संमती दिली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली यूरोलॉजिस्ट डॉ राहुल पोटोडे, डॉ विशाल बाहेकर ,डॉ राहुल घुले,डॉ प्रतीक चिरडे, डॉ आचल सिंघल, नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी, बधीरीकरण तज्ञ डॉ दिपाली गोटे, डॉ रोहित हातगावकर, डॉ विद्या इसळ, डॉ अंजली माकोडे ,डॉ सोहिणी सोळंकी, डॉ शिवलीला मेंनकुंदे यांचा मोलाचा वाटा होता. चार-पाच तास चाललेली ही शस्त्रक्रिया यशस्वी पूर्ण झाली.रुग्ण व नातेवाईकांचे समुपदेशन, वैद्यकीय चाचण्या, पोलीस व्हेरिफिकेशन इतर कागदपत्राची पूर्तता करून प्राधिकरण समिती समोर सादर करणे व प्रत्यक्ष मुलाखती द्वारे शस्त्रक्रिये करीता मान्यता मिळवून घेणे या सर्व बाबी ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी यशस्वीरित्या पूर्ण केल्या. तसेच शस्त्रक्रिया पूर्व तयारीमध्ये रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मेट्रन चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहाय्यक आरती मोरांडे यांचे सहकार्य लाभले.

प्राधिकरण समिती अध्यक्ष डॉ अनिल देशमुख, सदस्य डॉ टी एस वारे, सहाय्यक संचालक, आरोग्यसेवा, अकोला, सिविल सर्जन डॉ विनोद पवार, सेवानिवृत्त




उपसंचालक डॉ अविनाश लव्हाळे, एनजीओ सदस्य आयएमए अध्यक्ष डॉ दिनेश वाघाडे, सदस्य डॉ शुभांगी वर्मा, डॉ पवन टेकाडे,डॉ मिलिंद जगताप,डॉकिशोर बनसोड यांनी रुग्ण व नातेवाईक यांची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे संवाद साधून व कागदपत्राची पडताळणी करून शस्त्रक्रिया करिता मान्यता दिली.ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिया पूर्व देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालय स्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला. नातेवाईकांनी शस्त्रक्रियाबाबत व मिळत असलेल्या सेवेबाबत समाधान व्यक्त केले. सध्या रुग्ण व डोनर किडनी आयसीयू मध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत असून प्रकृती स्थिर आहे.शस्त्रक्रिया दरम्यान व पश्चात परिचारिका संध्या वाघमारे, शितल अंबरते, प्रियंका मैंद, सुमित्रा गाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, राणी खेकडे, आशिष बोकडे, वैभव नासरे, प्रतीक्षा भिसेकर, अरविंना जांभेकर, स्नेहल खरात, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, शशिकांत ढिवर, नेहा घोरमाडे, ममता चव्हाण, शिवानी टापरे, रूद्रायणी खंडारे, वनशिका परिमल यांनी जबाबदारी पार पाडली.गोपाल सावरकर, मधुर भुयार, उमेश चव्हाण, उमेश सोनवणे, मंगेश गुडदे, वर्षा गाढवे, दर्शना खडसे, रेखा ढिवर, आकाश हंबर्डे,अशोक खुरकटे यांनी सहायक म्हणून कर्तव्य पार पाडले.किडनी प्रत्यारोपण सारखी अत्यंत अवघड व जटिल शस्त्रक्रिया डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात यशस्वी पूर्ण झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पदाधिकारी यांनी सर्व डॉक्टरांचे, नर्सिंग स्टाफ तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

# Mahatma Fule Urban Co-Operative Bank Ltd. Amravati

Annexure I

Form A

Balance Sheet

Balance Sheet of Mahatma Fule Urban Cooperative Bank Limited, Amravati.

Balance as on 31st March 2026

| | Schedule | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| **Capital and Liabilities** | | | |
| Capital and Liabilities | 1 | 12,69,98,702.00 | 11,26,93,677.00 |
| Reserve and Surplus | 2 | 41,47,34,265.34 | 42,83,24,529.58 |
| Deposits | 3 | 4,83,66,24,068.14 | 4,38,95,48,958.96 |
| Borrowings | 4 | - | - |
| Other liabilities and provisions | 5 | 10,80,82,155.83 | 8,94,86,729.28 |
| **Total** | | **5,48,64,39,191.31** | **5,02,00,53,894.82** |
| **Assets** | | | |
| Cash and balances with RBI | 6 | 15,41,13,251.00 | 18,74,37,663.00 |
| Balance with banks and money at call and short notice | 7 | 18,27,64,312.59 | 11,80,25,996.70 |
| Investments | 8 | 1,66,56,85,950.00 | 1,43,62,20,838.00 |
| Advances | 9 | 3,08,92,83,485.78 | 2,88,65,37,055.32 |
| Fixed Assets | 10 | 24,18,61,658.00 | 25,59,56,304.00 |
| Other Assets | 11 | 14,92,64,278.76 | 13,57,53,185.00 |
| **Total** | | **5,48,29,72,936.13** | **5,01,99,31,042.02** |
| Contingent Liabilities | 12 | 34,66,255.18 | 1,22,852.80 |
| Bills for Collection | | | |

Form B

Form of Profit and Loss Account for the year ended on 31st March 2026

| | Schedule | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Income | | | |
| Interest earned | 13 | 41,88,58,287.65 | 38,59,66,045.66 |
| Other income | 14 | 3,67,49,695.82 | 1,10,49,851.49 |
| **Total** | | **45,56,07,983.47** | **39,70,15,897.15** |
| II. Expenditure | | | |
| Interest expended | 15 | 30,33,65,398.00 | 22,88,23,009.40 |
| Operating expenses | 16 | 10,39,50,376.29 | 8,89,84,600.49 |
| Provisions and contingencies | 17 | 1,90,00,000.00 | 3,15,05,000.00 |
| Income Tax Paid Expenses | 18 | 2,15,00,000.00 | 2,16,60,073.00 |
| **Total** | | **44,78,15,774.29** | **37,09,72,682.89** |
| III. Profit / Loss | 19 | | |
| Net profit/loss(-) for the year | | 77,92,209.18 | 2,60,43,214.26 |
| Profit/loss(-) brought forward | | - | - |
| **Total** | | **77,92,209.18** | **2,60,43,214.26** |
| IV. Appropriations | | | |
| Transfer to statutory reserves (25%) | | 19,48,053.00 | 65,11,000.00 |
| Transfer to other reserves | | 2,09,472.18 | 99,99,408.00 |
| Transfer to Government/proposed dividend | | 56,34,684.00 | 95,32,806.26 |
| Balance carried over to balance sheet | | - | - |

J.U.Bhele, DY. CEO — A.M.Sinkar, Chief Executive Officer — H.S.Belokar, Director — A.K.Lande, Tech-Direct — P.V.Korde, Vic-Chairman — D.A.Lokhande, Chairman

For, K N D & ASSOCIATES
Chartered Accountants

K N D & ASSOCIATES AUDITED Chartered Accountants

K N D & ASSOCIATES NAGPUR Chartered Accountants

Partner
CA Sumit Kishor Agrawal
M.No.165871
FRN: 112180W
UDIN: 26165871URQIFE9680

Schedule 1 - Capital

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. For Nationalised Banks | | - | - |
| Capital (Fully owned by Central Govt. | | | |
| | | - | - |
| II. For Banks incorporated outside India | | | |
| Capital | | | |
| i) The amount brought in by banks by way of start-up capital as prescribed by RBI should be shown under this | | - | - |
| ii) Amount of deposit kept with the RBI under Section 11(2) of the Banking Regulation Act, 1949 | | - | - |
| Total | | - | - |
| III. For Other Banks | | | |
| Authorised Capital | | 18,00,00,000.00 | 12,00,00,000.00 |
| Issued Capital | | 12,69,98,702.00 | 11,26,93,677.00 |
| Subscribed Capital | | - | - |
| Called-up Capital | | - | - |
| Less : Calls unpaid | | - | - |
| Add : Forfeited Shares | | - | - |
| **Total** | | **12,69,98,702.00** | **11,26,93,677.00** |

Schedule 2 - Reserves and Surplus

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| **I. Statutory Reserves** | | | |
| Opening Balance | | 5,63,50,869.79 | 4,56,24,907.00 |
| Additions during the year | | 70,46,960.00 | 1,07,25,962.79 |
| Deductions during the year | | 1,11,162.00 | - |
| **Total** | | **6,32,86,667.79** | **5,63,50,869.79** |
| **II. Capital Reserves** | | | |
| Opening Balance | | 9,40,00,000.00 | 7,25,00,000.00 |
| Additions during the year | | 5,10,00,000.00 | 2,15,00,000.00 |
| Deductions during the year | | 3,20,00,000.00 | - |
| **Total** | | **11,30,00,000.00** | **9,40,00,000.00** |
| **III. Share Premium** | | | |
| Opening Balance | | - | - |
| Additions during the year | | - | - |
| Deductions during the year | | - | - |
| **Total** | | - | - |
| **IV. Revenue and Other Reserves** | | | |
| Opening Balance | | 25,19,30,445.53 | 21,96,29,962.83 |
| Additions during the year | | 66,73,456.54 | 3,24,36,604.24 |
| Deductions during the year | | 2,79,48,513.70 | 1,36,121.54 |
| **Total** | | **23,06,55,388.37** | **25,19,30,445.53** |
| **V. Balance in Profit and Loss Account** | | 77,92,209.18 | 2,60,43,214.26 |
| | | **77,92,209.18** | **2,60,43,214.26** |
| **Total (I, II, III, IV, V)** | | **41,47,34,265.34** | **42,83,24,529.58** |

Schedule 3 - Deposits

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| A. I. Demand deposits | | | |
| (i) From banks | | | |
| (ii) From others | | 17,58,48,604.73 | 14,46,20,909.36 |
| II. Savings Bank Deposits | | 70,33,94,418.93 | 57,84,83,637.44 |
| III. Term Deposits | | | |
| (i) From banks | | | |
| (ii) From others | | 3,95,73,81,044.48 | 3,66,64,44,412.16 |
| **Total (I, II, and III)** | | **4,83,66,24,068.14** | **4,38,95,48,958.96** |
| B. (i) Deposits of branches in India | | - | - |
| (ii) Deposits of branches outside India | | | |
| **Total** | | - | - |

Schedule 4 - Borrowings

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Borrowings in India | | | |
| (a) Reserve Bank of India | | - | - |
| (b) Other banks | | - | - |
| (c) Other institutions and agencies | | - | - |
| II. Borrowings outside India | | - | - |
| **Total (I and II)** | | - | - |
| Secured borrowings included in I and II above- Rs. | | | |

Schedule 5 - Other Liabilities and Provisions

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Bills payable | | - | - |
| II. Inter-office adjustment (net) | | - | - |
| III. Interest accrued | | 8,72,51,336.54 | 7,59,85,839.34 |
| IV. Interest Payable | | 61,43,891.00 | 64,91,905.00 |
| V. Provisions | | 4,04,370.00 | 19,00,000.00 |
| VI. Others Liabilities | | 1,42,82,558.29 | 51,08,984.94 |
| **Total** | | **10,80,82,155.83** | **8,94,86,729.28** |

Schedule 6 - Cash and Balances with Reserve Bank of India

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Cash in hand (including foreign currency notes) | | 6,40,13,251.00 | 6,73,37,663.00 |
| II. Balances with Reserve Bank of India | | | |
| (a) in Current Account | | 9,01,00,000.00 | 12,01,00,000.00 |
| (b) in Other Account | | | |
| Total (I and II) | | **15,41,13,251.00** | **18,74,37,663.00** |

Schedule 7 - Balances with Banks and Money at Call and Short Notice

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. In India | | | |
| (i) Balances with banks | | | |
| (a) in Current Accounts | | 18,27,64,312.59 | 11,80,25,996.70 |
| (b) in Other Deposit Accounts | | - | - |
| (ii) Money at call and short notice | | | |
| (a) with banks | | - | - |
| (b) with other institutions | | - | - |
| Total (i and ii) | | **18,27,64,312.59** | **11,80,25,996.70** |
| II. Outside India | | | |
| (i) in Current Accounts | | - | - |
| (ii) in Other Deposit Accounts | | - | - |
| (iii) Money at call and short notice | | - | - |
| Total (i, ii, and iii) | | - | - |
| **Grand Total (I and II)** | | **18,27,64,312.59** | **11,80,25,996.70** |

Schedule 8 - Investments

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Investments in India in | | | |
| (i) Government Securities | | 1,38,28,88,197.00 | 1,27,30,23,085.00 |
| (ii) Other approved securitied | | - | - |
| (iii) Shares | | 44,11,000.00 | 11,000.00 |
| (iv) Debentures and Bonds | | - | - |
| (v) Subsidiaries and/or joint ventures | | - | - |
| (vi) Others Mutual Fund, RF, BF & FD With Other Bank | | 27,83,86,753.00 | 16,31,86,753.00 |
| Total | | **1,66,56,85,950.00** | **1,43,62,20,838.00** |
| II. Investments outside India in | | | |
| (i) Government securities (including local authorities) | | - | - |
| (ii) Subsidiaries and/or joint ventures abroad | | - | - |
| (iii) Others investments (to be specified) | | - | - |
| Total | | - | - |
| Grand Total (I and II) | | **1,66,56,85,950.00** | **1,43,62,20,838.00** |

Schedule 9 - Advances

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| A. (i) Bills purchased and discounted | | | |
| (ii) Cash credits, overdrafts and loans repayable on | | 94,89,52,813.52 | 86,38,90,362.10 |
| (iii) Term Loans | | 2,14,03,30,672.26 | 2,02,26,46,693.22 |
| Total | | **3,08,92,83,485.78** | **2,88,65,37,055.32** |
| B. (i) Secured by tangible assets | | 3,00,34,60,409.40 | 2,82,59,15,720.39 |
| (ii) Covered by Bank/Government Guarantees | | - | - |
| (iii) Unsecured | | 8,58,23,076.38 | 6,06,21,334.93 |
| Total | | **3,08,92,83,485.78** | **2,88,65,37,055.32** |
| C.I. Advances in India | | | |
| (i) Priority Sectors | | 1,96,49,67,300.00 | 1,72,30,33,000.00 |
| (ii) Public Secor | | - | - |
| (iii) Banks | | - | - |
| (iv) Others | | 1,12,43,16,185.78 | 1,16,35,04,055.32 |
| Total | | **3,08,92,83,485.78** | **2,88,65,37,055.32** |
| C.II. Advances outside India | | | |
| (i) Due from banks | | - | - |
| (ii) Due from others | | - | - |
| (a) Bills purchased and discounted | | - | - |
| (b) Syndicated loans | | - | - |
| (c) Others | | - | - |
| Total | | - | - |
| Grand Total (C.I and II) | | **3,08,92,83,485.78** | **2,88,65,37,055.32** |

Schedule 10 - Fixed Assets

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| **I. Premises** | | **16,89,72,476.00** | **17,49,81,056.00** |
| At cost as on 31st March of the preceding year | | 17,49,81,056.00 | 9,39,15,359.00 |
| Additions during the year (Revalued During the year) | | 24,44,429.00 | 8,53,85,994.87 |
| Deductions during the year | | - | - |
| Depreciation to date | | 84,53,009.00 | 43,20,297.87 |
| **II. Other Fixed Assets (including furniture and fixtures)** | | **7,28,89,182.00** | **8,09,75,248.00** |
| At cost as on 31st March of the preceding year | | 8,09,75,248.00 | 3,59,20,874.00 |
| Additions during the year | | 56,39,183.86 | 5,62,73,323.76 |
| Deductions during the year | | - | - |
| Depreciation to date | | 1,37,25,249.86 | 1,12,18,949.76 |
| **Total (I and II)** | | **24,18,61,658.00** | **25,59,56,304.00** |

# Mahatma Fule Urban Co-Operative Bank Ltd. Amravati

**Schedule 11 - Other Assets**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Inter-office adjustments (net) | | - | - |
| II. Interest accrued | | - | - |
| III. Tax paid in advance/tax deducted at source | | 1,20,00,000.00 | 2,15,00,000.00 |
| IV. Stationery and stamps | 12 | - | - |
| V. Non-banking assets acquired in satisfaction of claims | | - | - |
| VI. Interest Receivable | 13 | 12,42,59,483.16 | 10,89,16,938.84 |
| VII. Others* | 14 | 1,30,04,795.60 | 53,36,246.16 |
| Total | | 14,92,64,278.76 | 13,57,53,185.00 |

*In case there is any unadjusted balance of loss the same may be shown under this item with appropriate foot-note.

**Schedule 12 - Contingent Liabilities**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Claims against the bank not acknowledged as debts | | | |
| II. Liability for partly paid investments | | | |
| III. Liability on account of outstanding forward exchange contracts | | | |
| IV. Acceptances, endorsements and other obligaions. | | | |
| VI. Others items for which the bank is contingently liable | | 34,66,255.18 | 1,22,852.80 |
| Total | | 34,66,255.18 | 1,22,852.80 |

**Schedule 13- Interest Earned**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Interest/discount on advances/bills | | 32,51,04,439.30 | 30,11,95,212.70 |
| II. Income on investments | | 9,37,53,848.35 | 8,47,70,832.96 |
| III. Interest on balances with Reserve Bank of India and other inter-bank funds | | - | - |
| IV. Others | | - | - |
| Total | | 41,88,58,287.65 | 38,59,66,045.66 |

**Schedule 14 - Other Income**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Commission, exchange and brokerage | | 6,29,610.84 | 1,47,970.82 |
| II. Profit on sale of investments | | - | - |
| Less : Loss on sale of investments | | - | - |
| III. Profit on revaluation of investments | | - | - |
| Less : Loss on revaluation of investments | | - | - |
| IV. Profit on sale of land, building and other assets | | - | - |
| Less : Loss on sale of land, buildings and other assets | | - | - |
| V. Profit on exchange transactions | | - | - |
| Less : Loss on exchange transactions | | - | - |
| VI. Income earned by way of dividends, etc. from subsidiaries/ companies and/or joint ventures abroad/in India | | - | - |
| V. Miscellaneous Income | | 3,61,20,084.98 | 1,09,01,880.67 |
| Total | | 3,67,49,695.82 | 1,10,49,851.49 |

*Note : Under items II to V loss figures shall be shown in brackets.*

**Schedule 15 - Interest Expended**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Interest on deposits | | 30,33,65,398.00 | 22,88,23,009.40 |
| II. Interest on Reserve Bank of India/ Inter-bank | | - | - |
| III. Others | | - | - |
| Total | | 30,33,65,398.00 | 22,88,23,009.40 |

**Schedule 16 - Operating Expenses**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Payments to and provisions for employees | | 3,19,77,363.00 | 2,62,29,776.00 |
| II. Rent, taxes and lighting | | 43,31,385.00 | 35,24,428.00 |
| III. Printing and stationery | | 13,76,654.94 | 13,08,497.10 |
| IV. Advertisement and publicity | | 9,25,219.16 | 10,55,495.61 |
| V. Depreciation on bank's property | | 2,21,78,258.86 | 1,55,39,247.63 |
| VI. Director's fees, allowances and expenses | | 5,20,000.00 | 5,26,000.00 |
| VII. Auditor's fees and expenses (including branch | | 8,47,000.00 | 8,41,000.00 |
| VIII. Law charges | | 10,00,000.00 | 7,01,000.00 |
| IX. Postages, Telegrams, Telephones, etc. | | 3,41,411.26 | 4,92,836.68 |
| X. Repairs and maintenance | | - | - |
| XI. Insurance | | 71,45,643.98 | 69,90,213.36 |
| XII. Commission Paid PIGMY Agents & MICRO Finance | | 1,84,43,943.26 | 1,35,74,326.12 |
| XII. Other expenditure | | 1,48,63,496.83 | 1,82,01,779.99 |
| Total | | 10,39,50,376.29 | 8,89,84,600.49 |

**Schedule 17 - Provisions and Contingenceies**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Provision for Bad & Doubtful Debts | | 1,75,00,000.00 | 2,00,00,000.00 |
| II.Provision for Standard Assets | | 15,00,000.00 | 15,00,000.00 |
| III.Provision for Special Reserve | | | 36,80,000.00 |
| IV.Provision for Dirrered Tax Liability | | | 11,10,000.00 |
| V.Provision for other fees | | - | - |
| VI.Provision for Investment Depreciation Reserve | | | 45,15,000.00 |
| VII.Provision for Gratuity | | | 7,00,000.00 |
| VIII.Provision for Leave Incashment | | - | - |
| Total | | 1,90,00,000.00 | 3,15,05,000.00 |

**Schedule 18 - Income Tax Expenses**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| I. Income Tax Paid Expenses | | 2,15,00,000.00 | 2,16,60,073.00 |
| Total | | 2,15,00,000.00 | 2,16,60,073.00 |

**Schedule 19 - Profit / Loass**

| | | As on 31-03-2026 | As on 31-03-2025 |
|---|---|---|---|
| III. Profit / Loss | | | |
| Net profit/loss(-) for the year | | 77,92,209.18 | 2,60,43,214.26 |
| Profit/loss(-) brought forward | | - | - |
| Total | | 77,92,209.18 | 2,60,43,214.26 |

Dy.CEO — Chief Executive Officer — Director — Tech-Director — Vic-Chairman — Chairman

For, K N D & ASSOCIATES
Chartered Accountants

Partner
CA Sumit Kishor Agrawal
M.No.165871
FRN: 112180W
UDIN: 26165871URQIFE9680

## Independent Auditors Report

**(As required under section 31 of the Banking Regulation Act.1949 as applicable to Cooperative Societies read with section 81 (5) (b) of the Maharashtra State Cooperative Societies Act.1960 and rule 69 Maharashtra Cooperative Societies rules 1961)**

**To,**
**The Members,**
**Mahatma Fule URan Cooperative Bank Ltd,**

**Report on financial statements**

**1.** We have audited the accompanying financial statements of Mahatma Fule URan Cooperative Bank Limited as on 31 March 2026, which comprise the balance sheet as on 31 March 2026, and the profit and loss account for the year then ended 31 March 2026, a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of nine branches and head office audited by us are incorporated in these financial statements.

**Management's responsibility for the financial statements**

**2.** Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of bank in accordance with banking regulation Act 1949(as applicable to cooperative societies), the guidelines issued by the Reserve bank of India and registrar of cooperative societies, Maharashtra, the Maharashtracooperative societies act 1960and Maharashtra cooperative societies rules 1961(as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the bank. The responsibility includes design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

**3.** Our Responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with standards on auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

**4.** An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the entity's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

**5.** We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**Qualified Opinion**

**6.** In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us , the financial statements together with the notes thereon give the information required by the banking regulation Act 1949(as applicable to cooperative societies), Maharashtra cooperative societies act 1961 and the guidelines issued by the National bank for agriculture and rural development (as applicable) and the guidelines issued by the Reserve bank of India and registrar of cooperative societies in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India, subject to our observations.

**(a)** In the case of Balance Sheet, of state of affairs of the bank as at 31st march 2026.

**(b)** In the case of Profit and Loss account, of the profit/loss for the year ended on the date; and

**(c)** In the case of the cash flow statement, of the cash flows for the year ended on the date.

**Report on other legal & Regulatory requirements.**

**7.** The Balance sheet and profit and loss account have been drawn up in forms 'A' and 'B' respectively of the third schedule to the Banking regulation Act 1949 and provisions of the Maharashtra co-operative societies act, 1960 and Maharashtra co-operative societies rules 1961.

**8. We report that:**

**(a)** We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory

**(b)** In our opinion, proper books of account as required by law have been kept by the bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches/offices.

**(c)** The transactions of the bank which have come to our notice are within the powers of the bank.

**(d)** The Balance sheet and profit and loss account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns, subject to our observations.

**(e)** The accounting standards adopted by the bank are consistent with those laid down by accounting principles generally accepted in India so far as applicable to banks.

9. The details as required by the rule 69(6) Maharashtra co-operative society's rules 1961 are given in the audit memorandum separately.

**Or**

**As per information and explanations given to us and based on our examination of books of account and other records, we have not come across material instances in respect of details mentioned in the rule 69(6) of Maharashtra co-operative societies rule, 1961.**

**10.** We further report that for the year under audit, the bank has been awarded **'A'** classification.

**Place: Nagpur**
**Date: 25/06/2026**

For M/s. KND & ASSOCIATES
Chartered Accountants

Partner
CA Sumit Kishor Agrawal
M.No.165871
FRN: 112180W
UDIN: 26165871URQIFE9680

**Note: The guidelines given in SA705, SA706 should be followed for the modified report or**

मंगळवार, दि. ३० जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज ज्यांना कळले त्यांना महाराष्ट्र नक्की कळेल -पालकमंत्री संजय राठोड यांचे प्रतिपादन

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त अभिवादन, जिल्हा परिषदेत सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची समाजसेवेची भूमिका आजही प्रेरणादायी आहे. त्यांचे जीवनचरित्र आजच्या युवा पिढीने वाचले पाहिजे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज ज्यांना कळले त्यांना महाराष्ट्र नक्की कळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी आज केले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या वसंतराव नाईक सभागृहात आयोजित सामाजिक न्याय दिन समारंभ आणि नशामुक्त सप्ताहाच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला उप मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, युवराज मेहेत्रे, जालिंदर आभाळे, समाज कल्याण सहायक आयुक्त मंगला मुन, शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, माजी जिप सदस्य यशवंत पवार, श्रीधर मोहोड, हरिहर लिंगमवार आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पालकमंत्री संजय राठोड यांनी राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करुन पुढे म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने प्रजेचे राजे होते. त्यांनी कायम प्रजा हितासाठी राज्यकारभार चालविला. सामाजिक न्याय आणि आरक्षणाचे खरे जनक होते. त्यांनी मागासवर्गीयांना शासकीय नोकरीत आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. शिक्षणाचा प्रसार आणि बहुजन समाजाचे सक्षमीकरण केले. तसेच अस्पृश्यता निर्मूलन, महिलांचा सन्मान, शेतकरी आणि दुर्बलांच्या आर्थिक उन्नतीसाठी कल्याणकारी उपाययोजना केल्या. यासोबतच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना कायम मदत केली,असे ते म्हणाले.

छत्रपती शाहू महाराजांची समाजसेवेची भूमिका आजही प्रेरणादायी आहे. शैक्षणिक संस्था, शाळा, वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना सुरु त्या आजही सुरु आहेत. आम्ही शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारानुसारच काम करत आहोत. त्यांचा वारसा जपणे हीच खरी आदरांजली ठरेल. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जीवनचरित्र आजच्या युवा पिढीने वाचले पाहिजे. ज्यांना छत्रपती शाहू महाराज कळले त्यांना महाराष्ट्र नक्की कळेल, असे मत पालकमंत्री संजय राठोड यांनी यावेळी व्यक्त केले.यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याबाबत माहिती विषद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक आयुक्त मंगला मुन यांनी तर आभार प्रदर्शन योगेश मेहेत्रे यांनी केले.

पालकमंत्र्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान समाज कल्याण विभागांतर्गत शाळांमधील यश संपादन करणाऱ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार वितरित करण्यात आले. तसेच स्वाधार योजनेतील लाभार्थी, तंटामुक्तीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात सामाजिक न्याय दिन साजरा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तत्पूर्वी आंतरराष्ट्रीय नशा मुक्ती व अवैध मादक पदार्थ तस्करी विरोधी दिनानिमित्त समाज कल्याण व मेरा युवा भारत कार्यालयामार्फत शहरात जनजागृती बाईक रॅली काढण्यात आली. तसेच मुख्य कार्यक्रमात उपस्थितांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी विद्यार्थी, पालक, अधिकारी व कर्मचारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# कौटुंबिक वादातून विवाहितेची विहिरीत आत्महत्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २९ :** कौटुंबिक वादातून विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना आनंदनगर(अनंतवाडी) येथे आज सोमवार (दि.२९जुन) रोजी सकाळी उघडकीस आली. असुन या हृदयद्रावक घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



महागाव तालुक्यातील आनंदनगर(अनंतवाडी) येथील सौ.साक्षी सेविदास जाधव (वय२५ वर्ष) हिचे व पतीचे नेहमीच माहेरावरून पैसे आणण्यावरून वाद होत असल्याने या वादाला कंटाळून साक्षीने टोकाचे पाऊल उचलुन आनंदनगर गावालगत असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपविली. या घटनेची माहिती पोलिस पाटील सुनील राठोड यांनी महागाव पोलिस व साक्षीच्या नातेवाईकांना दिल्यानंतर तिच्या माहेरच्यांनी आनंदनगर येथे सकाळीच पोहचून विहिरीत असलेली आपली मुलगी नसुन तिला बाहेर काढण्यास विरोध दर्शविला अखेर पोलिसांनी मृतदेहाची ओळख पटविणे आवश्यक असल्याचे सांगितल्याने अखेर गावातील धनराज राठोड, धम्मशील ठमके व हिवरा येथील शेख मुजीफ शेख हमजा या युवकांच्या मदतीने विहिरीत मृतदेहाचा शोध घेत दुपारी १वाजताच्या दरम्यान मृतदेह विहिरीच्या बाहेर काढला त्यानंतर नातेवाईकांनी जो पर्यंत पती व सासरच्या लोकांना अटक केल्या जाणार नाही तो पर्यंत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हलवू न देण्याचा पवित्रा घेतल्याने अखेर प्रभारी ठाणेदार सुनिल अंबुरे,सरपंच श्रीराम कवाने,उपसरपंच कुणाल राठोड, पोलिस पाटील सुनिल राठोड यांनी नातेवाईकांची समजुत काढल्यानंतर तब्बल दिड ते दोन तासांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सवना ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला.यावेळी गावात तणावपुर्ण वातावरण निर्माण झाल्याने पोलिसांचा तगडा बंदोबस्त गावात तैनात करण्यात आला होता.मृतक साक्षीचे वडील सुरेश जेता राठोड रा.मांडवा ता.पुसद यांच्या फिर्यादीवरून महागाव पोलिसांनी पती शिवा उर्फ सेविदास जाधव,सासरे श्यामराव जाधव, सासु रेणुका श्यामराव जाधव दिर विलास जाधव यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास प्रभारी ठाणेदार सपोनि सुनिल अंबुरे, हे. कॉं.गजानन एडतकर ,वसीम शेख व कर्मचारी करीत आहेत.

**चिमुकले झाले आईच्या मायेला पोरके**

सौ.साक्षी व सेविदास जाधव यांना तीन वर्षाची साहेश्वरी व दिड वर्षाचा साहिल अशी दोन चिमुकली मुले असुन त्यांच्या आईने कौटुंबिक वादाच्या रागातून आपले जीवन संपविल्याने ही दोन्ही चिमुकले आईच्या मायेला पोरकी झाली असुन आईने उडी घेतलेल्या विहिरीजवळील गर्दीत आपल्या आईला शोधणारी चिमुकली नजर उपस्थितांच्या हृदयाचा ठाव घेत होती.चिमुकल्यांना आईच्या मायेला पोरके करून साक्षीने आपली जीवन यात्रा संपविल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# राज्यमाता गोमाता संवाद यात्रेचे २ जुलैला यवतमाळात आगमन..!

## संत, मंत्री, खासदारांच्या उपस्थितीत भव्य जनसंवाद

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २९ :** पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि महाराष्ट्र गोशाळा महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राजमाता गोमाता संवाद यात्रा' राज्यभर जनजागृती करत २ जुलै रोजी यवतमाळात दाखल होणार आहे. २२ जूनपासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप ५ जुलै रोजी नागपूर येथे होणार असून, यवतमाळातील कार्यक्रमानिमित्त सायंकाळी भव्य जनसंवाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेने देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बंजारा समाजाचे धर्मगुरू संत बापूसिंग महाराज (पोहरादेवी) राहणार असून, महाकाली संस्थेचे धर्मगुरू गजानन माऊली प्रमुख उपस्थिती लावणार आहेत. विशेष अतिथी म्हणून यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख, पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांची उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा प्रमुख मार्गदर्शक म्हणून संबोधित करणार आहेत. यावेळी आमदार,बाळासाहेब मांगुळकर, आ.संजय देरकर,आ. राजू तोडसाम,आ.किसन वानखडे, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह अंकुश रायगडे, नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील गोभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. सुनील सूर्यवंशी, उद्धव नेरकर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त मंगेश काळे, सुहास सोनवणे तसेच सहआयोजक राजू खंडाळकर, अजय मुंधडा, अनिल पांडे, कैलास कासार, किसन सिंघानिया आणि राजकुमार भगत यांनी केले आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

# पुसद मध्ये पावसानंतर भूमिगत नाल्या तुंबल्या..!

## पंचायत समिती व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात दुर्गंधी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २९ :** शहरात २८ जून २०२६ रोजी दुपार व रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे पुसद–दिग्रस–यवतमाळ राज्य मार्गालगत असलेल्या भूमिगत नाल्या कचऱ्याने तुंबल्या.परिणामी नाल्यांतील साचलेले पाणी व कचरा पंचायत समिती तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात शिरल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून नागरिक व कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यापूर्वी नाल्यांची योग्य प्रकारे साफसफाई व नियोजन न झाल्याने शहरातील अनेक नाल्या कचऱ्याने भरल्या आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे या नाल्या ओव्हरफ्लो झाल्या असून नाल्यांतील घाण व कचरा रस्त्यावर आला आहे. विशेषतः पंचायत समिती व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालय परिसरात साचलेल्या दूषित पाण्यामुळे दुर्गंधी निर्माण झाली आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजासाठी येणाऱ्या नागरिकांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. साथीच्या आजारांचा धोका वाढू शकतो, अशी चिंताही नागरिकांनी व्यक्त केली आहे.सिमेंट रस्त्यालगत असलेल्या भूमिगत गटारातील पाणी थेट पंचायत समिती व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिसरात पसरल्याचे चित्र दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पुसद नगर परिषद प्रशासनाने तातडीने नाल्यांची साफसफाई करून परिसरातील कचरा हटवावा व नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी कर्मचारी व स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### शाळा प्रवेशोत्सवासाठी ७८ अधिकाऱ्यांची नियुक्ती

**यवतमाळ :** राज्य शासनाच्या 'शाळा प्रवेशोत्सव २०२६' उपक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील शाळांना भेट देण्यासाठी वर्ग-१ व वर्ग-२ मधील ७८ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी ३० जून २०२६ रोजी नियोजित शाळांमध्ये उपस्थित राहून नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करतील तसेच शाळांतील विविध सुविधांची पाहणी करणार आहेत. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी याबाबत आदेश जारी केले असून, राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करणे, शाळेतील उपस्थिती वाढविणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. नियुक्त अधिकारी शाळांमधील भौतिक सुविधा, खेळाची साधने, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, पुस्तक व्यवस्था, शालेय पोषण आहार, स्वच्छतेच्या सवयी आदी बाबींची तपासणी करणार आहेत. तसेच धोकादायक इमारती, वापराअभावी किंवा पाण्याअभावी बंद असलेली स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत समस्या आढळल्यास संबंधित यंत्रणांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत.जिल्हाधिकारी यांनी नियुक्त अधिकाऱ्यांना ३० जून रोजी सकाळी ११ वाजता नियोजित शाळेत उपस्थित राहून विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक आणि ग्रामस्थांच्या सहभागातून शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे.



### 'कागदावर वजन' ठेवल्याशिवाय व्यवहार नाही..!

**पुसद दुय्यम निबंधक कार्यालयातील दलालराजावर प्रश्नचिन्ह**

**पुसद :** पुसद येथील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी-विक्रीच्या व्यवहारांसाठी "कागदावर वजन" ठेवल्याशिवाय काम होत नसल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कार्यालयात केवळ दोन शासकीय कर्मचारी असून उर्वरित कामकाज दलाल आणि ऑनलाइन दस्तलेखकांच्या माध्यमातून होत असल्याची चर्चा आहे. मुद्रांक विक्रेते नियमबाह्य पद्धतीने दस्त तयार करून ग्राहकांकडून मनमानी शुल्क आकारत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी, जिल्हा मुद्रांक अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात आल्या असल्या तरी अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. तसेच संबंधित अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचीही नाराजी व्यक्त होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

# मुकुटबनचे आरो फिल्टर नावापुरतेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २९ :** पाच ते सहा आरो फिल्टर असून सर्व फिल्टर हे निव्वळ नावापुरतेच ठरलेले आहे .मागील वर्षी हे सर्व आरो फिल्टर ग्रामपंचायतीने लिलाव केले होते एक वर्षाकरिता कंत्राटदाराला दिले असून त्याचा कालावधी पूर्ण झाला मागील वर्षी काही फिल्टर बंद होते. पाण्याचा प्रश्न प्रभावित झाला होता. यंदाही सर्व फिल्टर लिलाव करून ही अजून पर्यंत संबंधित कंत्राटदाराने आरो फिल्टर ताब्यात न घेतल्याने पाण्याचा प्रश्न प्रभावित होत आहे ग्रामपंचायत कर्मचारी मनमानी कारभार करत असून जिकडे तिकडे पाईपलाईन फुटत असल्याचे कारण समोर करून पाणी व्यवस्थित सोडत नसल्याने आरोचे पाणी नागरिकांना व्यवस्थित मिळत नाही.

सध्या मुकुटबन ग्रामपंचायत हे वाऱ्यावर सोडल्याने ग्रामपंचायतला वाली नसून येणारा काळ हा नागरिकांसाठी मोठा अडचणीचा ठरणार आहे. यंदा आरो फिल्टर संबंधित ग्रामपंचायत सदस्याच्या मर्जीतील लोकांना मिळाल्याने अजून त्यांनी आरो फिल्टर सुरू केले नाही. तलावा जवळील आरोचे पाणी फिल्टर होत नसल्याची नागरिकांची ओरड असून तर कोंडवाडा जवळ असलेल्या आरोना वाटेल तेव्हा चालू वाटेल तेव्हा बंद होत व वार्ड नंबर पाच मधील आरो फिल्टर दोन वर्षापासून बंद पडले आहे. असल्याने नागरिकांना खाजगी आरो प्लांट मधून पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. नवीन ग्रामसेवक येऊन एक ते दीड महिन्याचा कालावधी झाल्याने अजून पर्यंत ग्रामपंचायतच्या कारभारावर त्यांचा वचक नसल्याचे बोलले जात आहे पावसाळ्यात शुद्ध पाणी मिळावे यासाठी एटीएम कार्ड घेतले. घेतलेले कार्डचा उपयोग होत नसून नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने दखल घ्यावी अशी नागरिकांची मागणी आहे.

# विदर्भा नदीतून रेतीची अवैध वाहतूक..!

## मुकुटबन पोलिसांची कारवाई ७.०६ लाखांचा ट्रॅक्टरसह मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**रेती तस्करीवर पोलिसांचा वाढता अंकुश**

**विदर्भा नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर अंकुश आणण्यासाठी मुकुटबन पोलिसांनी कारवाईचा धडाका कायम ठेवला आहे. या कारवाईमुळे अवैध रेती तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे अशाच कारवाया सातत्याने सुरू ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**

**झरी, दि. २९ :** विदर्भा नदीपात्रातून अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध मुकुटबन पोलिसांनी धडक कारवाई करत ट्रॅक्टरसह तब्बल ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. रविवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास वणी–घोन्सा मार्गावरील विदर्भा नदी पुलाजवळ सापळा रचून ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी किशोर सुरेश उलमाले (वय २८, रा. दहेगाव-घोन्सा) याच्याविरुद्ध मुकुटबन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे विदर्भा नदीपात्रातून अवैधपणे रेती उपसून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केली जात असल्याची खात्री झाल्यानंतर पोलिसांनी नदी पुलाजवळ सापळा रचला. यावेळी विना क्रमांकाचा ट्रॅक्टर अडवून चालकाकडे रेती वाहतुकीसंदर्भातील रॉयल्टी व इतर अधिकृत कागदपत्रांची मागणी करण्यात आली. मात्र, कोणतेही वैध दस्तऐवज सादर करता न आल्याने पोलिसांनी ट्रॅक्टर ताब्यात घेतला. तपासणीदरम्यान ट्रॅक्टरमध्ये सुमारे एक ब्रास रेती (अंदाजे किंमत ६ हजार रुपये) आढळून आली. ट्रॅक्टरसह एकूण ७ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहन पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दिलीप जाधव करीत आहेत.

# पेढोरा शाळेचा पहिलाच दिवस वर्ग सुरू..! मात्र विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची?

## डीपीडीसी अंतर्गत संरक्षण भिंत तातडीने उभारण्याची मागणी. काम न झाल्यास आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ वसीम मिर्झा





**नेर, दि. २९ :** नेर तालुक्यातील मौजा पेढोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संरक्षण भिंतीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे ३० जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिलाच दिवस असताना विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश केला. मात्र त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अद्याप अनुत्तरितच असल्याने पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे.

शाळेला लागूनच नाला असल्याने पावसाळ्यात या नाल्याला वारंवार पूर येतो. त्यामुळे शाळेच्या परिसराला आणि इमारतीला धोका निर्माण होत असून, विद्यार्थी,शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या जीवितालाही गंभीर धोका असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेर तालुका अध्यक्ष सुनील खाडे यांनी जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देत जिल्हा वार्षिक योजना (DPDC) अंतर्गत तातडीने संरक्षण भिंत उभारण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शाळे जवळील नाल्याच्या तीव्र प्रवाहामुळे संरक्षण भिंतीचा अभाव विद्यार्थ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. यापूर्वीही शाळेचे मुख्याध्यापक आणि ग्रामपंचायतीने संरक्षण भिंतीसाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. मात्र अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पेढोरा हे १०० टक्के आदिवासी बहुल गाव असल्याने येथील विद्यार्थ्यांना सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सुनील खाडे यांनी स्पष्ट केले आहे. पावसाळ्यापूर्वी संरक्षण भिंतीचे काम सुरू न झाल्यास गावकरी, पालक आणि विद्यार्थ्यांसह उपोषण आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. मात्र त्यानंतरही प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेतलेली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शाखाप्रमुख कादर पठाण, गणेश बेले आणि दीपक अंबुरे उपस्थित होते.

**"शाळा सुरू झाली, सुरक्षितता मात्र अद्याप कागदावरच!"**

**नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी पेढोरा येथील विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा श्रीगणेशा केला. मात्र संरक्षण भिंतीअभावी शाळेवर पावसाळ्यातील संभाव्य संकट कायम आहे. प्रशासनाने आता तरी तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे.**

# निष्ठावान शिवसैनिक आजही उद्धव ठाकरेंसोबतच – किशोर इंगळे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २९ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांच्या सामूहिक राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाप्रमुख किशोर इंगळे यांनी पक्षाची ठाम भूमिका मांडत, "कामे आणि नोकरीच्या आमिषा पोटी काही जणांनी पक्षांतर केले असले, तरी निष्ठावान शिवसैनिक आजही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वा सोबत खंबीरपणे उभे आहेत,असा दावा इंगळे यांनी केला.

इंगळे म्हणाले की, राजीनामा देणारे काही पदाधिकारी स्थानिक खासदारांनी पक्ष सोडल्यापासूनच संघटनेच्या कामात सक्रिय नव्हते. त्यामुळे त्यांच्या जाण्याचा पक्षाच्या संघटनात्मक ताकदीवर कोणताही परिणाम होणार नाही. उपजिल्हाप्रमुख व महिला आघाडीच्या तालुका प्रमुखांच्या कुटुंबीयांना नोकरीचे आमिष दाखविण्यात आले, तसेच काहींना विविध कामांची आश्वासने देण्यात आल्याचे संबंधितांनी यापूर्वी स्वतः सांगितल्याचा दावाही त्यांनी केला. राजीनामा देणाऱ्यांपैकी काही जण मूळचे मनसेचे कार्यकर्ते असून, विशिष्ट पदांच्या आशेने त्यांनी पक्षांतर केल्याचेही इंगळे यांनी नमूद केले. "स्वार्थासाठी काही जण दूर गेले तरी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची ताकद कमी होणार नाही. निष्ठावान कार्यकर्ते आणि जनतेच्या बळावर यवतमाळ जिल्ह्यात संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही जोमाने काम करू," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**'माझ्या राजीनाम्याचे पत्र बनावट, मी उद्धव ठाकरे सोबतच'**

**युवासेना उपजिल्हाप्रमुख गिरीजानंद कळंबे यांनी आपल्या नावाने प्रसारित झालेल्या राजीनामा पत्राला फेटाळून लावले आहे. प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की, त्या पत्रावरील स्वाक्षरी आपली नसून तो खोडसाळपणाचा प्रकार आहे. "मी कोणताही राजीनामा दिलेला नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर माझी पूर्ण निष्ठा असून, मी कायम त्यांच्यासोबतच राहणार आहे," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले.**